<u>सभापतीस्थानी - माननीय उपसभापती</u>

**पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे.**

**उपसभापती** : आता प्रथमत: दिनांक 23 जुलै 2008 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. 42107 चर्चेला घेण्यात येईल.

**कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याबाबत**

**(७) * ४२१०७ श्री. रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, श्री. विनोद तावडे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. प्रकाश शेंडगे, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. जयंत पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.सुमंत गायकवाड, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री.प्रतापरावसोनवणे, श्री.सय्यद पाशा पटेल, श्री.मधुकर चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायम विनाअनुदानित तत्त्वावर शाळांना अनुदान देण्याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात येऊन, एका महिन्याच्या आत निर्णय घेण्याबाबत शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने घेतलेल्या निर्णयाचे व कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व केव्हा घेण्यात आला आहे,
(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व सदर निर्णय केव्हापर्यंत अपेक्षित आहे ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) व (२) राज्यातील बिगर आदिवासी क्षेत्र व आदिवासी क्षेत्रातील कायम विनाअनुदानित तत्त्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानावर आणणे संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. माननीय मंत्री (वित्त) यांच्या निर्देशानुसार आवश्यक माहिती संकलित करून प्रस्ताव फेरसादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न 23 जुलै 2008 रोजी या सभागृहात चर्चेला आला होता आणि त्यावेळी शासनाकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने माननीय सभापतींच्या निर्देशानुसार राखून ठेवण्यात आला होता, त्याबद्दल जरूर मी माननीय सभापतींना धन्यवाद देतो. त्यानंतर आज हा राखून ठेवण्यात आलेला प्रश्न येथे चर्चेस आलेला आहे. राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याबाबतचा हा प्रश्न अनेकदा या ना त्या कारणाने या सभागृहात चर्चेला आलेला होता. या बाबत आम्ही दोन महिनत निर्णय घेऊ असे आश्वासन देखील शासनाने यापूर्वी दिले होते. 21 जून 2007 ला या बाबत माननीय मंत्री महोदयांकडे बैठक झाली आणि

..... ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते (पुढे चालू....) ता.प्र.क्र.42107 ....

तातडीने याबाबत निर्णय घ्यावा असे निदेश माननीय सभापतींनीही मंत्री महोदयांना दिले हाते. तेव्हा 4.4.2007 ला देखील यातील 'कायम' हा शब्द वगळून आम्ही कॅबिनेटसमोर जाऊन याबाबत धोरणात्मक निर्णय घेतो असे मंत्री महोदयांनी सांगितले असता यावर एक महिन्याच्या आत निर्णय घ्या असे माननीय सभापतींनी सांगितल्यानंतर देखील त्याबाबत अद्यापपर्यंत काहीही केलेलेनाही. वारंवार तेच ते उत्तर येथे याबाबत दिले जात आहे. न्यायालयात हा प्रश्न गेला असता न्यायालयाने देखील यातील 'कायम' हा शब्द काढून टाकण्यास सांगितले आहे. पण तरीही याबाबत शासनाकडून त्यादृष्टीने काहीही कारवाई करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, जवळपास 60 हजार शिक्षकांच्या रोजीरोटीचा हा प्रश्न आहे. म्हणून यातील 'कायम' हा शब्द काढून टाकण्याबद्दल आणि या शाळांना अनुदान दण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा असे न्यायालयाने देखील सांगतले आहे. तेव्हा यापूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार, माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार आणि न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन याबाबत निश्चितपणे निर्णय घेणार काय ?

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा .. )

श्री. विनोद तावडे : हे अधिवेशन संपण्यापूर्वी नाही तर आताच्या आताच याबाबत निर्णय मंत्र्यांनी जाहीर करावा. आता शालेय शिक्षण विभागाला नामदार डॉ.पतंगराव कदम यांच्यासारखे डायनॅमिक मंत्री लाभले आहेत तेव्हा या प्रश्नावर त्यांनी आताच्या आता निर्णय जाहीर केला पाहिजे.. ...

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत सविस्तर माहिती सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी आताच येथे दिली आहे. शासन याबाबत अतिशय गंभीर आहे आणि यातील 'कायम' हा शब्द काढण्यासदेखील तत्त्वत: शिक्षण विभागाची मान्यता आहे. परंतु शेवटी हा प्रश्न मंत्रिमंडळापुढे अंतिम निर्णयासाठी जाऊन मगच त्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. ...

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा .. )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकार टोलवा टोलवीची उत्तरे कृपा करून देऊ नयेत. ...

..... ए 3 ....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42107 ....

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, कृपा करून मला माझे बोलणे पूर्ण करू द्यावे. ... सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकून घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, या प्रश्नावर आपण जो जुना पॅटर्न घेतलेला होता ....

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा .. )

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... बी 1 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42107...

**उपसभापती** : माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण अगोदर मंत्रिमहोदयांचे संपूर्ण उत्तर ऐकून घ्यावे व त्यानंतर आपण प्रश्न विचारावेत.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे संपूर्ण उत्तर ऐकून घ्यावे. त्यानंतर माननीय सदस्यांकडून विचारण्यात येणाऱ्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची माझी तयारी आहे. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी या प्रश्नाची पूर्वीची पार्श्वभूमी सांगितली. यासंबंधात पहिल्यांदा आदिवासींचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या प्रश्नाबाबत मंत्रिमंडळाने पुन्हा प्रस्ताव सादर करण्यास सांगितले....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न राखून कां ठेवला ? याबाबतचे प्रोसेडिंग माननीय मंत्रिमहोदयांना पहाता येत नाही काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, विभागाने या प्रस्तावाची पूर्ण छाननी केली आहे. आणि कायम विनाअनुदानित हा शब्द काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. पाच वर्षापूर्वी 20:40 या पध्दतीचा पॅटर्न स्वीकारण्यात आला होता. त्यामुळे हा प्रस्ताव एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे नेऊन यासंबंधी फायनल निर्णय जाहीर केला जाईल.

(अनेक मा. सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. विक्रम काळे : "कायम" हा शब्द आपण काढून टाकला काय? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे.

(गोंधळ)

**उपसभापती** : सन्माननीय. सदस्यांनी कृपया शांत व्हावे....

(गोंधळ)

श्री. विक्रम काळे : "कायम" हा शब्द काढण्याचा निर्णय झाला पाहिजे....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विचारलेल्या प्रश्नावर मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले. त्यानुसार "कायम" हा शब्द वगळण्याबाबत विभागाचा निर्णय झाला आहे असे त्यांनी सांगितले. तेव्हा आता फक्त प्रश्न एवढाच आहे की, यासंबंधीचा प्रस्ताव घेऊन त्यांना मंत्रिमंडळापुढे जावे लागेल...

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र.42107...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण यासंबंधी काही सांगण्यापूर्वी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

(गोंधळ)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, "कायम" हा शब्द काढणार काय? हे मंत्रिमहोदयांनी जाहीर करावे...

डॉ. पतंगराव कदम : याबाबतचा निर्णय आमच्या विभागाने घेतला आहे. आता फक्त फायनल निर्णयाकरिता आपल्याला मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव घेऊन जावे लागेल.

(गोंधळ)

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय,...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. त्यापूर्वी या संदर्भात त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासंदर्भात मा. सदस्यांचे शिष्टमंडळ काल माझ्या दालनामध्ये मला भेटले. सर्व मा. सदस्यांना ही गोष्ट माहीत आहे की, ज्यावेळी कायम विनाअनुदानित असे म्हटल्यानंतर त्या शाळांना अनुदान दिले जाणार नाही असे स्पष्टपणे सांगूनच त्या शाळांना शासनाने मंजूरी दिली होती. तसेच, या शाळांना शासन अनुदान देऊ शकत नाही अशाप्रकारे स्टँप पेपरवर त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र देखील लिहून घेण्यात आले होते. त्यामुळे या शाळांना अनुदान न देण्याचा निर्णय हा शासनाने नंतर घेतलेला नाही. यामुळे शासनाच्या तिजोरीवर मोठया प्रमाणात आर्थिक बोजा पडणार आहे. अशाप्रकारच्या आर्थिक मर्यादा लक्षात घेऊनच शासनाने हा निर्णय घेतला आहे. हा प्रश्न 60 हजार शिक्षकांचा आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42107.... श्री. अशोक चव्हाण ....

अशा परिस्थितीमध्ये एखादा निर्णय जाहीर करण्याच्या अगोदर यामध्ये फायनान्शिअल इम्प्लिकेशन्स काय आहेत, त्यामध्ये आर्थिक भार किती पडणार आहे आणि नेमके आपण ते करु शकतो की नाही याचा विचार गांभीर्याने करावा लागेल. काल सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे येऊन एक तोडगा काढण्यासंबंधी चर्चाही झाली. त्याबाबत सभागृहात सांगण्यास हरकत नाही. त्यांच्या पाच सात मागण्या आहेत त्यातील काही गोष्टी करण्यासारख्या आहेत. त्या गोष्टींसाठी वेगळा निर्णय घेता येईल. आणि याबाबतीत एक अभ्यासगट निर्माण करुन याबाबतीत आर्थिक तरतुदीच्या बाबतीत काय करणे शक्य आहे ते तपासून घेण्यात येईल. येत्या तीन ते चार महिन्यामध्ये तातडीने यामध्ये मार्ग काढण्याची माझी तयारी आहे. परंतु हा प्रश्न मोठा आहे. यामध्ये मोठा आर्थिक भार पडणार आहे हे लक्षात घेऊन याचा निर्णय घ्यावा लागेल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री स्वत: सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्याला विनंती केली होती की, निदान आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. याबाबतीत वस्तुस्थिती माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली गेलेली नाही. माननीय शिक्षण मंत्र्यांच्या सुध्दा वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली गेलेली नाही. मी ती वस्तुस्थिती लक्षात आणून देऊ इच्छितो. सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 42107 ला माननीय शिक्षण मंत्र्यांनी काय उत्तर दिलेले आहे ते पहावे. कायम अनुदानित असा शब्द परवानगीपत्रात वापरल्याने अशा शाळांना अजिबात अनुदान देता येणार नाही, असा अर्थ लावता येणार नाही असा निर्णय माननीय मुंबई उच्च न्यायालयाने 2003 च्या याचिका क्रमांक 138 मध्ये दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी दिला हे खरे आहे काय ? 38050 क्रमांकच्या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिलेले आहे. तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी हे लेखी उत्तर दिलेले आहे. दुसरा प्रश्न असा होता की, केवळ विनाअनुदान असा शब्द वापरल्याने असा भेदभाव करता येणार नाही व सर्व व्यावहारिक प्रयोजनासाठी परवानगी देताना वापरण्यात आलेली कायम विनाअनुदान तत्वावरील मान्यता ही शब्दरचना विनाअनुदान तत्वावरील मान्यता अशीच वाचली पाहिजे व अशीच समजली पाहिजे असाही निर्णय मुंबई उच्च न्यायलयाने

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42107 ...... प्रा. बी. टी. देशमुख ....

सन 2005 च्या याचिका क्रमांक 8736 मध्ये दिला हे खरे आहे काय ? या प्रश्नालाही "होय" असे उत्तर दिलेले आहे. हे दोन्ही निर्णय 2005 मधील आहेत. त्याच्या पुढची एक गोष्ट मी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय शिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. माननीय सभापतींनी स्वत: या ठिकाणी निर्देश दिले की, आपण एक महिन्याच्या आत निर्णय घ्या. त्यालाही सहा महिन्याच्या वर काळ होऊन गेलेला आहे. मी जेव्हा उभे राहून त्यांना विचारले की, आपण एक महिन्याच्या आत निर्णय घ्याल ना ? त्यावर माननीय शिक्षण मंत्री एवढे रागावून म्हणाले की, आता एकदा होय म्हटले, कितीदा होय म्हणू ? हे रेकॉर्डमधील शब्द आहेत. गेल्या वेळी हा प्रश्न राखून ठेवण्यात आला. एक महिन्याच्या आत तुम्ही पुन्हा एक महिना सांगाल तर ती गोष्ट आम्ही ऐकणार नाही. एक म्हणजे हायकोर्टाचा निर्णय आहे आणि दुसरे म्हणजे सभागृहात दोन चार वेळा एक महिना सांगून झालेले आहे. खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित असल्यानंतर याच ठिकाणी तो निर्णय जाहीर व्हावयास पाहिजे. जर नसेल तर उद्यापर्यंत हा प्रश्न राखून ठेवा आणि उद्या निर्णय करा. मागच्या वेळी ही गोष्ट राखून ठेवलेली आहे. अशा प्रकारे शेकडो लोकांच्या जिवाशी, हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर आपण खेळ करणे योग्य नाही. माझे स्पष्ट म्हणणे आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. मुश्रीफ साहेब या ठिकाणी बसलेले आहे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री स्वत: या ठिकाणी बसले होते. मी विद्यमान मुख्यमंत्र्यांना एक गोष्ट सांगू इच्छितो की, सभागृहातील चर्चेवरचा लोकांचा विश्वास उडून जाईल अशा प्रकारचे वर्तन कोणीही करता कामा नये. मुश्रीफ साहेबांनी असे वाक्य उच्चारले होते की, मी आताच मुख्यमंत्र्यांशी बोललो आणि मुख्यमंत्री असे म्हणतात की, ती फाईल जशी असेल तशी फायनान्सकडून करा, आपण निर्णय घेऊ. मुश्रीफ साहेबांनी ते सांगितले पण मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सांगितले. पुन्हा पुन्हा हा खेळ बरोबर नाही. या ठिकाणच्या चर्चा निरर्थक आहेत अशा प्रकारची भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण होणे बरोबर नाही. दुर्दैवाने मागच्या वेळी काय झाले ते आपल्याला सांगतो. आम्ही भाबडेपणाने विश्वास ठेवला की, प्रश्न राखून ठेवला आहे तो पुढच्या आठवड्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42107...... प्रा.बी.टी.देशमुख.........

त्यावेळी एक मंत्री महोदय मला हसत हसत म्हणाले होते की, बी.टी.देशमुखसाहेब पुढील आठवडयात अधिवेशनच होणार नाही आणि तसेच घडले. आज पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाने पुन्हा पुन्हा लोकांच्या भावनांशी खेळ करणे उचित नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी ठामपणे याबाबतचा निर्णय जाहीर करावा. हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे 'कायम' हा शब्द काढला जाईल आणि विना अनुदानित तत्वावरील शाळांना जी वागणूक दिली जाते त्यानुसार त्यांना अनुदान दिले जाईल असा शासन निर्णय दोन दिवसात, आठ दिवसात निर्गमित केला जाईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी सुरुवातीपासून म्हटले आहे की, विनाअनुदानित यासंदर्भात हायकोर्टाचे निर्देश आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या म्हणण्याप्रमाणे एक महिन्याऐवजी एक आठवडयाच्यामध्ये यासंबंधीचा अनुकूल निर्णय घेतला जाईल आणि कोर्टाचे निर्देश तंतोतंत पाळले जातील.

प्रा.बी.टी.देशमुख : शासन निर्णय 8 दिवसात निर्गमित केला जाईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : होय. 8 दिवसाच्या आत शासन निर्णय निर्गमित केला जाईल.

श्री.वसंतराव काळे : रेकॉर्डवरुन 'कायम' हा शब्द काढला जाईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : 'कायम' हा शब्द काढला जाईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दुधाने ओठ भाजले की, ताक सुध्दा फुंकून प्यावे लागते. दुर्दैवाने ती वेळ माझ्यावर आलेली आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत अतिशय समाधानकारक आश्वासन दिलेले आहे. त्यांनी स्पष्टपणे असे उत्तर दिले आहे की, 'कायम' हा शब्द काढला जाईल. विनाअनुदानाप्रमाणे त्यांना अनुदान देणारा शासन निर्णय 8 दिवसात काढला जाईल असेच आपण सभागृहाला सांगितलेले आहे ना ?

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी अतिशय महत्वाच्या प्रश्नाचा उल्लेख केला आहे. त्यांनी या प्रश्नाबाबत सभागृहात चर्चा झाली आहे असे ते सांगितले आहे. हे प्रकरण कोर्टामध्ये होते. त्यामुळे कोर्टानेही याबाबत निर्देश दिलेले आहेत. कोर्टाच्या

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.अशोक चव्हाण.....                                                  ता.प्र.क्र.42107.....

निर्देशाप्रमाणे 8 दिवसाच्या आत बैठक घेण्यात येईल आणि त्या बैठकीला माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना बोलविले जाईल. त्याबद्दल काही अडचण नाही. कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे शासन निश्चितपणे कार्यवाही करील. या विभागाच्या सचिवांनी हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट दाखल केलेले आहे. त्यामध्ये शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना कोर्टाने जे काही निर्देश दिलेले आहेत त्याला अनुसरुन पुढील कार्यवाही निश्चितपणे केली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दुर्दैवाने माननीय मंत्री महोदय आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये फरक आलेला आहे. मंत्री महोदय असे म्हणाले की, 8 दिवसाच्या आत 'कायम' हा शब्द काढून त्यांना अनुदान देणारा शासन निर्णय काढण्यात येईल. हे प्रकरण न्यायप्रविष्ट नाही. याचे निर्णय झालेले आहेत, मी निर्णयाच्या तारखा सांगितलेल्या आहेत. सभागृहामध्ये झालेली चर्चा निरर्थक असते असे 4-4 वर्षे लोकांना आम्हाला सांगणे जड जात आहे. आज ते लोक बेमुदत उपोषणाला बसले आहेत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. माननीय मंत्री महोदयांनी आता सभागृहात आश्वासन दिलेले आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांची क्षमा मागतो. आपल्या उत्तरात आणि माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरात फरक आलेला आहे. हा फरक राहता कामा नये. अन्यथा आम्ही येथे थांबणार नाही. लोकांच्या जीवनाशी खेळ खेळण्याचा हा अधिकार आम्ही मान्य करु शकत नाही. माननीय शिक्षण मंत्र्यांनी 8 दिवसामध्ये जी.आर.निर्गमित होईल असे सांगितले आहे. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, मला बैठकीला बोलविण्यात येईल. मला त्या बैठकीला बोलविले नाही तरी चालेल. पण 'कायम' हा शब्द काढून 8 दिवसाच्या आत त्यांना अनुदान देण्याचा जी.आर.इश्यू केला जाणार आहे काय, असा माझा पॉईन्टेड प्रश्न आहे. आपण दिलेल्या उत्तराबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

( थोडा वेळ थांबल्यानंतर )

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी कोणीही उभे रहात नाही. प्रश्नाला उत्तर दिले जात नसेल तर आम्ही कोठे न्याय मागावयाचा ? हे योग्य नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 42107....

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी पुन्हा पुन: सांगतो की, "कायम" शब्द काढून टाकला जाईल. 8 दिवसांच्या आत या संबंधीचा निर्णय कोर्टाच्या आदेशाप्रमाणे तंतोतंत घेतला जाईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : या प्रश्नावर 20 मिनिटे चर्चा झालेली आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : कोर्टाने काय निर्णय दिलेला आहे ? या प्रश्नाला सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. कोर्टाच्या निर्णयामध्ये असे म्हटलेले आहे की,....

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी 2005 मधील कोर्टाचा निर्णय वाचून दाखविला. त्याप्रमाणे आपण करणार काय? असे सन्माननीय सदस्यांनी विचारले असता तत्कालीन शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी शब्द दिला होता की, कोणत्याही परिस्थितीमध्ये 1 महिन्यामध्ये कायम हा शब्द काढून टाकू. या दोन मुद्यासंबंधीचा आग्रह सन्माननीय सदस्यांनी धरलेला आहे. शासनाने देखील हे मान्य केलेले आहे. हे दोन आग्रह शासनाने मान्य केल्यानंतर आणखी किती वेळ सदनाचा घेतला जाणार आहे ? या एकाच प्रश्नावर 22 मिनिटे चर्चा झालेली आहे. हे काय चालले आहे ?

(सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख हे बोलत असतात.. विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती**: मी आता पुढच्या प्रश्नाकडे वळतो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभागृहाचे कामकाज आम्ही चालू देणार नाही. आम्ही वेलमध्ये उभे राहू.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर सभागृहाने मान्य केलेले आहे.या प्रश्नावर 23 मिनिटे चर्चा झालेली आहे. Now, enough is enough. This is too much.. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील या प्रश्नावर शासनाची भूमिका अत्यंत सुस्पष्ट केलेली आहे. मला





Formatted: Left, Line spacing: single

Formatted: Left, Line spacing: single

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मा. उपसभापती

असे वाटते की.सभागृहात एखादी गोष्ट सांगितल्या नंतर त्यावर विश्वास ठेवणे क्रमप्राप्त आहे. म्हणून या प्रश्नावरची चर्चा संपलेली आहे...

श्री. अशोक चव्हाण : सदरील प्रश्नासंदर्भात शासन गंभीर आहे हे मला मुद्दाम सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. हा विषय मी हाताळत नव्हतो.परंतु राज्याचा प्रमुख म्हणून या प्रश्नाची मी नव्याने माहिती घेतली. या प्रश्नामध्ये मार्ग कढता आला पाहिजे ही आमची मनापासून भावना आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. कोर्टाने या संदर्भात निर्देश दिलेले आहेत. सचिवांनी देखील कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे. या अनुषंगाने 8 दिवसात पॉझिटिव्ह भूमिका घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील.

----

.. नंतर श्री. गिते..

Formatted: Font: Not Bold

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकण विभागासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक**

**शिक्षण मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(१) * ४६७५० श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. सुभाष चव्हाण , श्री. यशवंतराव गडाख , श्री. गोविंदराव आदिक , श्री.मोहन जोशी , श्री. जयप्रकाशछाजेड , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. सुरेश नवले , श्री.जैनुद्दीन जव्हेरी : तारांकित प्रश्न क्रमांक ३७५७७ ला दिनांक १९ मार्च, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागासाठी नविन एस.एस.सी.बोर्ड देण्याची घोषणा राज्य शासनाने एका वर्षापूर्वी केली होती, हे खरे आहे काय,

(२) याबाबत राज्य शासनाने अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(३) प्रश्नोक्त विषयाबाबत त्वरित कार्यवाही करण्याच्या दृष्टीने राज्यशासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. नाना पंचबुध्दे,डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) मा. मुख्यमंत्री यांचे समावेत दि. २८ जुलै, २००६ रोजी झालेल्या बैठकीत कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी स्वतंत्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ स्थापन करण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे.

(२) व (३) कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. नाना पंचबुध्दे : माननीय सभापती महोदय, कोकण विभागासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करण्याबाबत सन 2006 मधील पावसाळी अधिवेशनामध्ये नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करण्यात आली होती. सदर लक्षवेधी सूचना दिनांक 13.7.2006 रोजी विधान परिषदेमध्ये चर्चेला आली होती. त्या सूचनेवरील चर्चेच्या दरम्यान माननीय मंत्री शालेय शिक्षण यांनी कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन करता येणार नाही असा निर्णय सन 1998 मध्ये झालेला आहे असे सांगितले आहे. त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या शब्दांचे मी स्मरण करुन देतो व यासंबंधी योग्य ती माहिती सादर करतो. सदर मंडळ

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 46750...

श्री. नाना पंचबुध्दे....

स्थापन केले तर खर्च येणार नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते. परंतु त्याबाबतीत सांगू इच्छितो की, परंतु हे मंडळ स्वायत्त असल्यामुळे त्या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांवर आर्थिक भूर्दंड पडेल. त्यामुळे सध्या सदर मंडळ स्थापन करता येणार नाही....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय शिक्षण राज्यमंत्री महोदय हे आपले उत्तर वाचून दाखतिव आहेत.

डॉ. पतंगराव कदम : नवीन मंत्री असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यांना समजून घ्यावे.

डॉ.दीपक सावंत : या ठिकाणी शिक्षण मंत्री उपस्थित आहेत, त्यांनी सभागृहाला उत्तर दिले ते संयुक्तिक होईल असे मला वाटते.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. सदरहू शिक्षण मंडळ रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदूर्ग या तीन जिल्हयासाठी असून त्याचे कार्यालय रत्नागिरी येथे सुरु होईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री हे कोकणातील जनतेचा एक प्रकारे अपमान करीत आहेत. माझ्याकडे सभागृहात या विषयी चर्चा झाल्याचे इतिवृत्त उपलब्ध आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी 2006 च्या पावसाळी अधिवेशनात सांगितले की, 2007 या वर्षातील मार्च महिन्यातील परीक्षा कोकणातील शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घेतल्या जातील. त्यानंतर माननीय माजी शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांनी डिसेंबर, 2007 महिन्यातील अधिवेशनात सांगितले की, कोकण विभागासाठी शिक्षण मंडळ स्थापन करण्याची सरकारची इच्छा आहे, परंतु या शिक्षण मंडळासाठी सरकारला जागा मिळवून द्यावी. सदर शिक्षण मंडळाच्या इमारतीसाठी सरकारकडे जागा नाही. त्यानंतर 2007 या वर्षात झालेल्या तिन्ही अधिवेशनामध्ये आम्ही या शिक्षण मंडळासाठी आवश्यक असणारी जागा दाखविली. परंतु त्याबाबतची दखल मात्र घेतली गेली नाही. कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ असावे यासाठी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णीसह अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात उभे राहून एकमताने मागणी करीत होते. परंतु त्या मागणीचा देखील सरकारने अद्यापर्यंत गंभीर दखल घेतली नाही. या सरकारला कोकण विभागास कायम स्वरुपी उपेक्षित ठेवावयाचे आहे काय ? कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 46750..

श्री. मधुकर चव्हाण...

करण्यासाठी एक महिन्यात जागा मिळवून घेऊन येत्या ऑक्टोबर महिन्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा कोकणातील शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घेतली जाईल अशा प्रकारचे ठोस आश्वासन माननीय शिक्षण मंत्री देतील काय ?

श्री.जितेंद्र आव्हाड : डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे महसूल विभाग आहे, तसेच त्यांच्याकडे शिक्षण विभागही आहे. महसूल विभाग त्यांच्याकडे असल्यामुळे जागेचा प्रश्न उपस्थित होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा नागपूर येथे असे जाहीर केले आहे की, नव्या दमाचे आणि तरुणांचे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले आहे, त्यामुळे आम्ही प्रत्येक निर्णय तातडीने घेणार आहोत आणि जुनी सर्व प्रकरणे निकालात काढणार आहोत व अशा प्रकारचा चांगला संदेश संपूर्ण महाराष्ट्रात देणार आहोत. 2006 साली कोकणातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा या शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घेण्यात येतील असे मान्य केल्यानंतर, तसेच या मंडळास आवश्यक असणाऱ्या इमारतीस जागा दाखविल्यानंतर त्यासंदर्भात काहीही कार्यवाही केली गेली नाही. 2006 या वर्षी दिलेल्या आश्वासनांची 2008 हे वर्ष संपत आले असताना सुध्दा त्याची पूर्तता होत नाही ही दुर्देवाची बाब आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या भाषेत सांगावयाचे झाले तर या सदनामध्ये होणा-या चर्चेवरील लोकांचा विश्वास उडेल.

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46750........... श्री.दिवाकर रावते....

आणि म्हणून आमची अशी विनंती आहे की, हा विषय वित्त विभागाकडे आहे, अमुक आहे, तमुक आहे असे न करता येत्या आठ दिवसात मंडळ नेमण्यात येईल आणि पुढील आठवड्यात सदनामध्ये तसे जाहीर केले जाईल असे मंत्रीमहोदय सांगतील काय?

डॉ.पतंगराव कदम : मी स्पष्टपणाने सांगितले की, मंडळ स्थापन केले जाईल आणि येत्या मार्चच्या परीक्षा या मंडळाच्या वतीने घेतल्या जातील.

श्री.विनोद तावडे : ही घोषणा यापूर्वीही झाली होती. परंतु जी.आर.निघाला नाही, त्यामुळे कोकणातील शिक्षण विभागाचे प्रतिनिधी सांगतात की, जी.आर. न निघाल्यामुळे निधी नाही, त्यामुळे जागा घेऊ शकत नाही, स्टाफ पाठवू शकत नाही. महसूल खात्याच्या 800 फाईल्स थांबवावयास जेवढा वेळ लावता आहात त्यापैकी काही वेळ शिक्षण विभागासाठी दिला तर हा प्रश्न मार्गी लागेल.

डॉ.पतंगराव कदम : महसूल खात्याची एकही फाईल माझ्याकडे आलेली नाही. प्रशासनाची पध्दत अशी आहे की, अगोदर फाईल्स विभागाकडे जातात आणि नंतर त्या सादर केल्या जातात.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ओरोस (जि.सिंधुदूर्ग) येथील शिक्षणसेवकांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(२) * ४९६०३ श्री. सुरेश नवले , श्री.राजन तेली :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओरोस (जि.सिंधुदूर्ग) येथील १५० शिक्षणसेवकांना माहे नोव्हेंबर, २००२ रोजी नियुक्ती दिल्यानंतर सदर शिक्षणसेवक माहे नोव्हेंबर, २००५ मध्ये कायम झाल्यामुळे त्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजनेपासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सदर १५० शिक्षणसेवकांचा या योजनेत समावेश करुन घ्यावा अशी लेखी मागणी माहे ऑगस्ट, २००८ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर १५० शिक्षणसेवकांना अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नाना पंचबुध्दे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१),(२),(३) व (४) अंशदान निवृत्तीवेतनाबाबत शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेंनिवे-१००८/१६/सेवा-४, दिनांक २६ फेब्रुवारी,२००८ अनुसार करार पध्दतीने / मानधनावर शासन सेवेत नियुक्त होऊन त्यानंतर शासन सेवेत नियमित झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास तो ज्या दिनांकास नियमित आस्थापनेवार येईल त्या दिनांकास अस्तित्वात असलेले महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ किंवा नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल असे नमूद केले आहे. यामुळे नियमित झाल्या दिनांकापासून शिक्षण सेवकांना निवृत्तीवेतन लागू करण्यात येत आहे. याबाबत शिक्षणसेवक हे मानधनावर असले तरी त्यांची सेवा निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य असल्याने वित्त विभागाच्या वरील आदेशात सुधारणा करण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, विभागास हा प्रस्ताव केव्हा सादर करण्यात आला आणि येत्या आठ दिवसात या प्रस्तावाला मान्यता दिली जाईल का?

श्री.नाना पंचबुध्दे : शिक्षण सेवक मानधनावर असले तरी त्यांची सेवा सेवानिवृत्तीसाठी ग्राहय असल्याचे आदेश सुधारणा करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, वित्त विभागास हा प्रस्ताव केव्हा सादर करण्यात आला आणि आठ दिवसाच्या आत प्रस्तावाला मान्यता दिली जाईल का?

श्री.नाना पंचबुध्दे : नोव्हेंबर, 2008 मध्ये वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आजचे दोन प्रश्न आणि कालची गृहखात्याशी संबंधित विषयावरील चर्चा लक्षात ध्यावी. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी बसलेले आहेत. प्रत्येक विषय विभाग मान्य करतो. परंतु वित्त विभाग मान्यता देत नाही. वित्त विभाग म्हणजे वेगळे मंत्रिमंडळ आहे असे चित्र उभे राहिले आहे. विभागाचे कॅबिनेट मंत्री, सचिव निर्णय घेतात. सभागृहात निर्णय घोषित होतो. माननीय सभापती निर्देश देतात. असे असताना वित्त विभागाकडून अडवणूक का केली जाते? वित्त विभागास घटनेने काही विशेष अधिकार दिले आहेत का? फाईल्स अडतात त्यामुळे निर्णय अंमलात येत नाही. आजच्या प्रश्नपत्रिकेतील आठ प्रश्नांच्या उत्तरात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे असेच म्हटले आहे. ही पळवाट आहे की कॅबिनेट मंत्र्यांना कळत नाही अशी स्थिती आहे? वित्त विभागाकडून येत्या आठ दिवसात जी.आर.काढला जाईल का? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. असाच प्रश्न कोकण शिक्षण मंडळाचाही आहे. आठ दिवसात वित्त विभागाची मान्यता घेतली तर प्रश्न मिटेल. परंतु निर्णय घेऊ शकत नाही. मंत्री महोदय वित्त विभागासमोर हतबल आहेत ही वस्तुस्थिती आहे.

डॉ.पतंगराव कदम : परिस्थितीचा आणि तिजोरीचा विचार करण्याचे वित्त विभागाचे काम आहे. परंतु ज्या निकडीच्या गोष्टी आहेत त्यावर त्वरित निर्णय घेतला जातो. यासंबंधीचा प्रश्न अद्याप न्यायालयात प्रलंबित आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 49603......

श्री. विक्रम काळे : शिक्षण सेवकांच्या निवृत्ती वेतनाचा हा प्रश्न आहे. या शिक्षण सेवकांना निवृती वेतन योजना ही सेवेत आल्यापासून लागू होणार आहे काय ? तसेच त्यात सुधारणा करण्यासंबंधी शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : शिक्षण सेवक सेवेत कायम झाल्यानंतर त्याला पेन्शन मिळते परंतु त्यासंदर्भात आम्ही वित्त विभागाकडे असा प्रस्ताव दिलेला आहे की, जे शिक्षण सेवक म्हणून सेवेत रुजू झाले त्यांना गृहित धरुन कायम झाल्याचा फायदा द्यावा व पेन्शन योजना लागू करावी. त्यामुळे जसजसे हे शिक्षण सेवक कायम होतील तसतसा त्यांना फायदा मिळेल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, शिक्षण सेवकांचे मानधन किती आहे हे प्रथम आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यात प्राथमिक शाळेवरील शिक्षण सेवकांना 3000 रुपये, माध्यमिक शाळेतील शिक्षण सेवकांना 4000 आणि ज्युनियर कॉलेजच्या शिक्षकांना 5000 रुपये एवढेच मानधन असते. यासंदर्भात प्रश्न असा आहे की, यापूर्वी शालेय शिक्षण विभागाने एक शासन निर्णय निर्गमित केला होता तो म्हणजे 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी जे शिक्षण सेवक सेवेत होते त्यांनाच ही पेन्शन योजना लागू होणार. पण त्यानंतर सहा महिन्यांना हा निर्णय रद्द केला. आमची मागणी अशी आहे की, अगोदरचा जो शासन निर्णय होता तोच योग्य असून तो शासन निर्णय शासन पुनरुज्जीवीत करणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : जो जुना निर्णय होता त्याचीच अंमलबजावणी व्हावी म्हणून शालेय शिक्षण विभागाने दि. 31 ऑक्टोबर, 2008 रोजी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, हा निर्णय घेण्याच्या संदर्भात ठराविक मुदत मंत्री महोदयांनी घालून द्यावी व त्या मुदतीतच हा निर्णय घेणे आवश्यक आहे, तो घेतील काय ?

डॉ. पतंगराव कदम : यासंबंधीचा निर्णय दोन महिन्यात घेतला जाईल.

श्री. रामनाथ मोते : अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या संदर्भात 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी सेवेत आलेल्यांना ही योजना लागू नाही, असा निर्णय होता. तथापि शिक्षण विभागाने जे शिक्षण सेवक सन 2005 पूर्वी सेवेत आले असतील परंतु नियमित वेतनश्रेणीमध्ये 1 नोव्हेंबर, 2005 नंतर आले, त्यांच्याबाबत या नवीन परिपत्रकामुळे वाद निर्माण झाला. म्हणून या अनुषंगाने मी सभागृहात अर्धा-

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ........

तास चर्चा सुध्दा उपस्थित केली होती. त्या चर्चेला उत्तर देण्यात आले. शासनाने त्यानंतर परिपत्रक काढले आणि दि. 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी एंटरिंग सर्व्हिसमध्ये आलेल्यांची सेवेत आल्याची तारीख गृहित धरावयाची असेही त्यात म्हटले होते. परंतु याचा विचार न करता त्यांना पेन्शन योजना लागू करावयाची नाही असा निर्णय घेण्यात आला. परंतु आमची मागणी अशी आहे की, या शिक्षण सेवकांना शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या जी.आर. प्रमाणे सन 1982 ची पेन्शन योजनाच लागू करावी आणि त्याला छेद देणारे जे परिपत्रक वित्त विभागाने काढले ते रद्द करावे. कारण शिक्षण विभागाच्या निर्णयाचा आधार घेऊन काही शिक्षकांनी भविष्य निर्वाह निधीचे खाते काढले, त्यांना ती खाती नंतर बंद करावी लागली. म्हणून शिक्षण विभागाचा निर्णय योग्य असून एक महिन्याच्या आत हा पूर्वीचाच निर्णय कसा लागू होईल याचा विचार करावा आणि 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षण सेवकांना त्या निर्णयाप्रमाणेच पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा निर्णय पुन्हा शासन घेणार काय ?

डॉ. पतंगराव कदम : महोदय, हा प्रश्न न्यायालयात प्रलंबित आहे.......

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता मघाशीच सांगितले की, दोन महिन्यात असा निर्णय घेतला जाईल आणि आता हा प्रश्न न्यायालयात प्रलंबित असल्याचे ते सभागृहात सांगत आहेत.

डॉ. पतंगराव कदम : होय, हा प्रश्न न्यायालयात जरी प्रलंबित असला तरी आम्ही तो पर्स्यु करीत आहोत आणि न्यायालयाचा निकाल आल्यानंतर दोन महिन्यात हा निर्णय घेऊ असे मी सांगितले.

-----------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या स्वातंत्र्य सेनानींच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३) * ४५८८० श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे :**
सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्याच्या मुक्तीसंग्रामासाठी प्राणाचे बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांची व स्वातंत्र्य सैनिकांच्या लढ्याची माहिती होण्यासाठी मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला व स्वातंत्र्य सेनानींच्या मानधनात वाढ करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे.

(२) स्वातंत्र सेनानींना देण्यात येत असलेल्या दरमहा रु. ४०००/- या मानधनात दि. २४.०९.२००८ पासून दरमहा रु. २०००/- इतकी वाढ करण्यात आली असून त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यांसदर्भात शालेय शिक्षण विभाग अधिकची माहिती प्राप्त करुन घेत असून याबाबत राज्यमंडळ व बालभारती या प्राधिकरणातील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येऊन त्या प्रमाणे निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, विचारण्यात आलेल्या प्रश्न क्रमांक दोनच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "स्वातंत्र सेनानींना देण्यात येत असलेल्या दरमहा रु. 4000/- या मानधनात दि. 24.09.08 पासून दरमहा रु. 2000/- इतकी वाढ करण्यात आली आहे." परंतु शासनाने स्वातंत्र सेनानींना जी वाढ दिलेली आहे ती महागाईच्या काळात अत्यंत कमी आहे त्यामुळे शासन स्वातंत्र सेनानींच्या मानधनात अजून वाढ करणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या सेनानींना 2000/- रुपयांची वाढ 24.9.08 पासून केलेली आहे. त्या व्यतिरिक्त आपण दर वर्षी 10 हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपूर्तीसाठी देत असतो तसेच स्वातंत्र सेनानींच्या मुलींच्या लग्नासाठी 5 हजार रुपये देत असतो, अजून काही सहाय्य देतो. याकरिता शासनाने 20 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद केलेली आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.45880...**

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या सेनानींचा इतिहास अभ्यासक्रमामध्ये केव्हा पासून समाविष्ट केला जाणार आहे?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या सेनानींच्या इतिहासाचा इयत्ता 5,8 व 12 च्या पाठयपुस्तकात उल्लेख करण्यात आलेला आहे. हा उल्लेख हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या संदर्भातील असून त्यामध्ये बदल करुन इयत्ता 8 वीच्या पाठयपुस्तकात येत्या 2009-10 या शैक्षणिक वर्षात तो केला जाईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, स्वातंत्र सेनांनी आणि मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या सेनानींच्या मानधनात या वर्षी वाढ करण्यात आलेली आहे, असे या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु वाढणारी महागाई विचारात घेता स्वातंत्र सेनानींच्या मानधनात, निवृत्तीवेतनात तसेच वैद्यकीय खर्चात दर तीन वर्षांनी वाढ केली जाणार आहे काय व यापूर्वी ही वाढ कधी करण्यात आली होती ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, स्वातंत्र सेनानींना या आधीची वाढ 2.11.2006 मध्ये देण्यात आली होती व त्यावेळेस त्यांचे मानधन 3000/- रुपयांवरुन 4000/- रुपये करण्यात आले होते. परंतु दोनच वर्षात म्हणजे दि.24.9.2008 पासून त्यांच्या मानधनात 2000/- रुपयांनी अजून वाढ करण्यात आलेली आहे. ही वाढ जवळ जवळ 50 टक्के एवढी आहे.परंतु स्वातंत्र सेनानींच्या मानधनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी जी सूचना केली आहे, त्याप्रमाणे प्राईस इंडेक्सनुसार पुढील काळात यांसदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

----------

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई परिसरातील पाच डंपिंग ग्राऊंडपैकी तीन**
**डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपल्याबाबत**

**(४) * ४७६९२ श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री.रमेश शेंडगे , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे : दिनांक १७ जुलै, २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १६ जुलै, २००८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादितील प्रश्न क्रमांक ४३०४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपत असल्याने गंभीर बनत चाललेल्या डंपिंगच्या प्रश्नाबाबत ५० वर्षाकरिता घनकचरा व्यवस्थापनासंबंधी उपाययोजना करण्यासाठी एमएमआरडीए कडून सार्वजनिक भराव भूमी विकास योजनेचा प्रस्ताव तयार करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) मुंबई महानगर प्रदेशातील बहूतेक महानगरपालिका / नगरपरिषदांच्यातील क्षेपणभूमीचे व्यवस्थापन व विकास ही एक जटील समस्या आहे. या समस्या विचारात घेता शास्त्रोक्त पध्दतीने सार्वजनिक भरावभूमीचा विचार करण्यासाठी प्राथमिक सर्वेक्षणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नुकतेच हाती घेतलेले आहे व ते प्रगती पथावर आहे. त्यास काही कालावधी अपेक्षित आहे.
(२) प्राथमिक स्वरुपात असल्याने सार्वजनिक भरावभूमीचा विकास योजनेचा प्रस्ताव तयार करणे तूर्तास शक्य नाही.
(३) दूरगामी योजना असल्याने टप्याटप्याने हाती घेण्यात येईल व या कामास अग्रक्रम देण्यात आलेला आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय सभापती महोदय, मुंबई,ठाणे परिसरात डंपींग ग्राऊंडच्या संदर्भात अत्यंत महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मध्यंतरीच्या काळात मुलूंड डंपीग ग्राऊंड, गोराई डंपीग ग्राऊंडमुळे प्रचंड गदारोळ व प्रक्षोभ जनतेमध्ये उसळला होता. डंपीग ग्राऊंडमुळे पसराणारी दुर्गंधी, त्यातून होणारे प्रदूषण व त्याचा जनतेच्या स्वास्थ्यावर होणारा परिणाम यामुळे मोठया प्रमाणात जनतेमध्ये प्रक्षोभ उसळला होता. या डंपींग ग्राऊंडची कपॅसीटी संपल्यामुळे त्याचा वापर करणे योग्य नाही अशी परिस्थिती मुंबईत निर्माण झाल्याची आमची माहिती आहे. याबाबत शासनाची काय भूमिका आहे, याबाबत शासन जनतेच्या हिताचा कोणता निर्णय घेणार आहे यासंदर्भातील माहिती सभागृहापुढे ठेवण्यात यावी. दुसरी गोष्ट अशी आहे की, ठाण्यामध्ये तर

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :47692....

श्री. जितेंद्र आव्हाड......

डंपीग ग्राऊंडच नाही. जेथे जागा दिसेल त्या ठिकाणी महानगरपालिकेचे अधिकारी डंपींग करते त्यामुळे जनता त्यावर आक्षेप घेते त्यामुळे ते डंपींग ग्राऊंड होते व पुन्हा दुसरीकडे डंपींग ग्राऊड तयार होते अशी परिस्थिती आहे.मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, अशा प्रकारची परिस्थिती असतांना जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून ठाणे महानगरपालिकेने येत्या महासभेत एक प्रस्ताव आणला असून त्यामध्ये जेएनएनयुआरएमचे 90 कोटी रुपये घ्यावयाचे व मग डंपींग ग्राऊंडचा प्रश्न सोडवायचा. हे सांगत असतांना मला आपल्या निदर्षनास असेही आणून द्यावयाचे आहे की, मागील काळात ठाणे महानगरपालिकेने कचरा कुंडयांची संख्या 150 वरुन 80 वर आणल्यामुळे, घनकच-यामध्ये चांगले काम असल्यामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर पारितोषीक सुध्दा मिळाले होते. परंतु या वेळच्या कमिशनरांनी घन कच-याच्या कुंडयांची संख्या परत 80 वरुन पुन्हा 150 पर्यंत नेण्याचा प्रस्ताव आणला आहे. कमिशनरांनी कुंडयांची संख्या का वाढवली, हा प्रस्ताव कमिशनरांनी का आणला हे आम्हाला काही समजले नाही. घनकच-याच्या संदर्भात मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महानगरपालिकेने जो बट्टयाबोळ केलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात शासन नेमकी काय भूमिका घेणार आहे?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.47692....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेश विकास अंतर्गत 7 महानगरपालिका आणि 13 नगरपरिषदा आहेत. रोज जवळपास 10 ते 12 हजार मेट्रीन टन घन कचरा गोळा होत आहे. हा कचरा कुठे टाकायचा असा प्रश्न आहे कारण ज्या ठिकाणी डंपिंग ग्राऊंड करावयाचे झाल्यास तेथील लोकांचा विरोध होतो. आता एमएमआरडीएने 1-2 शहरांसाठी आणि 2-3 महानगरपालिकेसाठी एकूण 6 जागा प्रस्तावित केलेल्या आहेत. त्यामध्ये ऐरोली पुलाजवळ भिवंडी-नाशिक रोड, कल्याण शीळफाटा, तळोजा औद्योगिक वसाहत, पनवेल, उल्हासनगर, पुणे द्रुतगती मार्ग याठिकाणी काही मोकळ्या जागा आहेत. त्याठिकाणी डंपिंग ग्राऊंड करण्यासाठी सर्व्हे करण्यात आलेला आहे. याठिकाणी काही शासनाच्या जमिनी असल्यामुळे त्या संपादित करण्यात काही अडचण येणार नाही. परंतु ज्या खाजगी जमिनी आहेत त्या संपादित करण्याबाबतची कार्यवाही सुरु करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे शहराचा उल्लेख केला. ठाणे शहरातील कचरा डंपिंग करण्यासाठी डायघर येथे 18 एकर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. त्याठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर 600 मेट्रीक टन क्षमतेचा प्रकल्प 2009 पर्यात सुरु करणार आहे. 6 महानगरपालिका आणि 13 नगरपालिकेतील कचऱ्याचा जो डंपिंग प्रश्न आहे तो प्राधान्याने सोडविण्याबाबत एमएमआरडीएने प्रयत्न सुरु केलेला आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिका बी.ओ.टी.चा प्रकल्प बाजूला ठेवून जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून 90 कोटी रुपये मागत आहे. त्यावर कर्ज स्वरुपात 25 टक्के परत द्यायचे आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या महासभेत 120 रुपये प्रति घर कचऱ्यावर कर बसविण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, डायघर येथे बी.ओ.टी.तत्वावर प्रकल्प सुरु करणार आहोत. असे असताना ठाणे महानगरपालिका जेएनएनयुआरएमकडून 90 कोटी कर्जाचा डोंगर कशाला घेत आहे ? एकीकडे बी.ओ.टी.तत्वार प्रकल्प सुरु होणार आहे तर दुसरीकडे ठाणे महानगरपालिका जेएनएनयुआएमच्या माध्यमातून 90 कोटी रुपये कर्ज घेत आहे. तेव्हा या संदर्भात शासन चौकशी करणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.47692....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संदर्भात चौकशी करण्यात येईल. तसेच संबंधितांची बैठकही घेण्यात येईल....

**उपसभापती** : प्रश्न ठाणे महानगरपालिकेचा असल्यामुळे मी याठिकाणी सूचना करु इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त आणि संबंधित अधिकारी यांना सर्व कागदपत्रे घेऊन पुढील 1-2 दिवसांत शक्य झाल्यास अन्यथा पुढील सोमवारी बैठक धेऊन मग सभागृहात भूमिका विशद करावी.

श्री.दिवाकर रावते ( बसून ) : हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रश्न राखून ठेवण्याचा प्रश्न नाही. एमएमआरडीएच्या अंतर्गत 6 महानगरपालिका आणि 13 नगरपरिषदा आहेत त्यातील कचरा डंपिंग करण्यासाठी काही जागांचा सर्व्हे केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी ठाणे शहराबाबत तक्रारी मांडल्या..... आपण हा प्रश्न राखून न ठेवता... उद्या किंवा परवा ठाणे महापालिकेचे महापौर आणि आयुक्त आणि संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊ...

**उपसभापती** : मी प्रश्न राखून ठेवलेला नाही. आपण पुढील सोमवारी बैठक घ्यावी.

श्री.हसन मुश्रीफ : ठीक आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, कचऱ्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी सर्व महानगरपालिकांचे एकत्रिकीकरण करुन एखादे वेगळे प्राधिकरण निर्माण करणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही विचार करु. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे ठाणे शहरातील डंपिंग ग्राऊंड संबंधी ठाणे महानगरपालिकेचे महापौर व आयुक्त यांच्याबरोबर बैठक घेणार आहोत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आपण जी बैठक बोलाविली त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंड हलविण्यासाठी आंदोलने झाली आणि ती सातत्याने होत असतात. मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंड अनधिकृत आहे. त्यास केंद्र सरकारने परवानगी दिलेली नाही. तरी सुध्दा अजूनही मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंडचा वापर अजून सुरु आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 47692.. श्री.संजय केळकर...

माजी नगरविकास राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी मागच्या अधिवेशनात सभागृहात असे सांगितले होते की, एक महिन्याच्या आत मुलुंड येथील डंपीग ग्राऊन्डवर कचरा टाकण्याचे बंद करण्यात येईल आणि कांजूरमार्ग किंवा त्या पुढच्या ठिकाणच्या जागेवर डंपीग ग्राऊन्डवर कचरा टाकण्यास सुरु करण्यात येईल. परंतु अजूनही मुलुडच्या डंपीग ग्राऊन्डवरच कचरा टाकण्यात येतो त्यामुळे कचरा मुलुंडमध्ये टाकण्यात येते आणि त्याच्या दुर्गंधीचा त्रास ठाण्याजवळ राहणा-या लोकांना होत असतो म्हणून माननीय राज्य मंत्र्यांना मला असे विचारावयाचे आहे की, मुलुंड येथील डंपीग ग्राऊन्ड बंद करण्याचे ठोस आश्वासन आपण देणार आहात काय ?

श्री.अशोक चव्हाण :सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेशामध्ये डंपीग ग्राऊन्डच्या जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे काही ठिकाणी अनधिकृत डंपीग ग्राऊन्ड चालू असेल हे मी नाकारीत नाही परंतु या प्रश्नाच्या संदर्भात कायम स्वरुपी तोडगा निघावा म्हणून 13 महानगरपालिकेच्या बाबतीत काही जागा आयडेन्टीफाय करण्यात आल्या असून त्यानुसार ऐरोली येथे 305 हेक्टर्स जागा यासाठी आयडेन्टीफाय झालेली आहे, भिवंडी येथे 352 हेक्टर्स पडीक जागा आयडेन्टीफाय झांलेली आहे. कल्याणरोड शिळ फाटा येथे 259हेक्टर्स जागा आयडेन्टीफाय झालेली आहे. तळोजा येथे 643 हेक्टर्स जागा आयडेन्टीफाय झाली आहे. पनवेल येथे 207 आणि उल्हासनगर येथे 1225 हेक्टर्स जागा आयडेन्टीफाय झाली असून अशा प्रकारे 3 हजार हेक्टर्स जागा आयडेन्टीफाय करण्यात आलेली आहे. या पैकी 60 टक्के शासकीय जमीन असल्यामुळे तातडीने या 13 महानगरपालिकेच्या क्षेत्रात डंपींग सुरु होऊ शंकेल. मुंबई महानगर प्रदेशामध्ये जमिनीचे प्रश्न आहेत परंतु या 13 ठिकाणी जागा आयडेन्टीफाय करण्यात आल्या असून 3 हजार हेक्टर्स जागा ताब्यात येणार आहे. त्यापैकी 60 टक्के शासकीय जमीन आहे त्यामुळे जी जागा संपादित करण्यामध्ये काही वेळ लागणार नाही. या जागेचा उपयोग आपल्याला तातडीने या कामासाठी करता येईल आणि 2009 पर्यत आपल्याला या जागेवर तातडीने डंपीग सुरु करता येईल. ज्या खाजगी जागा आहेत त्या सुध्दा तातडीने ॲक्विझिशन करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 47692....

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, हा प्रश्न फक्त मुलुंड आणि ठाण्यापुरताच मर्यादित नाही तर भविष्य काळात सर्वत महानगरांच्या शहरामध्ये हा प्रश्न निर्माण होणार आहे. जशी लोकसंख्या वाढत जाईल तसा कचरासुध्दा वाढत जाईल त्यामुळे डंपीग ग्राऊन्ड कमी पडणार आहेत. परदेशामध्ये या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी एक पृथकरण यंत्राचा वापर केला जातो.त्या यंत्राच्या व्दारे कच-याचे रासायनिक पृथकरण केले जाते तशाच प्रकारची यंत्रणा मुंबई आणि ठाणे या शहरात प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येणार आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण :त्यासबंधीची माहिती घेऊन शक्य असेल तर निश्चित त्याप्रमाणे केले जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विकास नियंत्रण नियमावलीमध्ये केलेल्या बदलामुळे गिरणी कामगारांच्या घरांसाठी कमी जमीन उपलब्ध होत असल्याबाबत**

**(५) * ४६४१९ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४५४२४ ला दिनांक २३ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००१ मध्ये शासनाने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये केलेल्या बदलामुळे गिरणी कामगारांच्या घरांसाठी १०० एकर ऐवजी केवळ २४ एकर एवढीच जमिन उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच एनटीसीच्या सात गिरण्यांमधील ६३३८ कामगारांसाठी फक्त ३५५० घरेच तयार होऊ शकतात, हे खरे आहे काय,

(३) श्रीराम मिल बंद होताना पटावरील संख्या ४०११ होती, त्यापैकी फक्त २८६ कामगारांसाठी घरे तयार होणार आहेत, हे खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे, प्रभादेवी शिवडी येथील स्टँडर्ड मिलमधून अनुक्रमे २११५ आणि १४३६ गिरणी कामगारांनी नोकऱ्या गमावल्या आहेत, तर घरे फक्त १७८ व १९८ मिळू शकतात, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सर्वच गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता:** (१) १९९१ च्या बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ५८ नुसार कापड गिरण्यांच्या जमिनीच्या पुनर्विकास करताना खुली जागा व विद्यमान बांधकाम पाडून विकास केल्यास त्या जमिनीची साधारणत: १/३ जमीन महानगरपालिकेस, म्हाडास व मालकास उपलब्ध होत असे. सदर नियमातील तदतुदीमुळे अस्तित्वातील बांधकामे न पाडता त्याचे वापरात बदल करण्यात येत होता व संपूर्ण जागेचा एकत्रित पुनर्विकास होत नव्हता त्यामुळे म्हाडास व महानगरपालिकेस जमिनी उपलब्ध होत नसे तसेच मिलच्या जागेचा पुनर्विकास होत नसल्याने गिरणी कामगारांना त्यांच्या देणी प्राप्त होत नव्हत्या त्यामुळे शासनाने सन २००१ मध्ये नियम ५८ सुधारित केला त्यात शिल्लक चटई क्षेत्र निर्देशांक व खुल्या जमिनींचे म्हाडा, महानगरपालिका व मालकास अनुक्रमे साधारणत: १/३ जमीन उपलब्ध होत आहे. मूळ नियम क्र.५८ व सुधारित नियम क्र.५८ मध्ये अस्तित्वातील बांधकाम क्षेत्राचा वापर हा औद्योगिक/वाणिज्य वापरासाठी अनुज्ञेय असून सुधारित नियमानुसार अस्तित्वातील बांधकाम क्षेत्राच्या प्रमाणात म्हाडास जागा उपलब्ध होणार असल्याने म्हाडास प्राप्त होणारे निश्चित क्षेत्र काढता येत नाही.

(२) एनटीसी ७ गिरण्यांच्या एकत्रित पुनर्विकासात म्हाडासाठी न्यू हिंद मिलमधील जागा प्राप्त झाली असून त्यामध्ये एकूण ५२२० सदनिकासाठी बांधकाम सुरु झालेले आहे.

(३) श्रीराम मिलमध्ये २८६ सदनिकांचे नकाशे मंजूर करण्यात आले आहे.

(४) प्रभादेवी व शिवडी येथील स्टॅण्डर्ड मिलमध्ये अनुक्रमे १७९ व १९२ सदनिकांचे नकाशे मंजूर करण्यात आले आहे.

(५) गिरण्यांच्या चाळीतील जागेत ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित करण्यात आला असून चाळीतील रहिवाश्यांव्यतिरिक्त अजून काही गिरणी कामगारांना घरे प्राप्त होवू शकतात.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, माननीय मुंख्यमंत्र्यांचे मी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की पूर्वीच्या माननीय मुख्यमंत्र्यानी जे उत्तर दिले ते दिशाभूल करणारे होते.मुंबईच्या गिरणी कामगाराला देशोधडीला शासनाने लावले असून दिलेल्या आश्वासनाला सुध्दा हरताळ फासला जात आहे. आपल्याला 100 एकर जमीन मिळणार होती त्या ऐवजी 24 एकर जमीन मिळणार आहे हे खरे आहे काय असा मी प्रश्न विचारला होता त्यासंबंधी दिशाभूल करणारे उत्तर देण्यात आलेले आहे वास्तविक पाहाता होय किंवा नाही अशा प्रकारचे उत्तर द्यावयास पाहिजे होते.सभापती महासेदय, आपल्या मार्फत मी माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष एका बाबीकडे वेधू इच्छितो. ज्या ठिकाणी गिरण्या असतात त्या ठिकाणची 1/3 जमीन म्हाडाला दिली पाहिजे परंतु शासनाने असे केले आहे की, ज्या चांगल्या वस्तीतील गिरण्या होत्या त्या ठिकाणी श्रीमंतासाठी गगनचुंबी इमारत बांधण्यासाठी जमीन द्यावयाची होती परंतु त्या सगळया गिरण्यांच्या अतिरिक्त जमिनी एकत्रित केल्या आणि घोडपदेव येथे तुकाराम भिकाजी कदम मार्ग आहे त्या ठिकाणी न्यू हिंद मिलमध्ये एकत्रित घरे बांधण्याचे ठरवून गिरणी कामगारांची फसवणूक करण्याचे ठरविले आहे. हे खरे आहे काय असा मी दुसरा प्रश्न विचारला होता. सभापती महोदय, त्या नंतर मी तिसरा प्रश्न विचारला होता की, श्रीराम मिलमध्ये 4 हजार 11 कामगार आहेत आणि त्यापैकी 286 घरे बांधण्यात येणार आहेत उरलेल्या कामगारांना घरे का बांधून देण्यात येणार नाही त्याचबरोबर प्रभादेवी येथील स्टॅन्डर्ड मिलमध्ये 2 हजार 115 कामगार आहेत त्या सर्व कामगारांना घरे का बांधून देणार नाहीत.. माजी मुख्यमंत्र्यांनी सभागृहात असे सांगितले होते की सर्व गिरणी कामगारांसाठी घरे बांधून देण्यात येतील व त्याचा प्लॅन तयार आहे . परंतु स्टॅन्डर्ड मिलमध्ये 2 हजार 115 कामगार आहेत त्यापैकी 189 घरे बांधून देण्यात येणार आहे उरलेल्या कामगारांना घरे बांधून का दिली जाणार नाहीत त्यानंतर दुसरी जी मिल आहे त्या ठिकाणी 1 हजार 436 कामगार असतांना 192 घरे बांधून देण्यात येण्ार आहे उर्वरित कामगारांना घरे बांधून का दिली जाणार नाहीत ? त्याचप्रमाणे आपल्याला 100 एकर जमीन मिळणार होती त्यापैकी 24 एकर जमीन घेऊन उरलेली 66 एकर जमीन बिल्डर्सना का दिली ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46419....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, विकास नियम 58 मध्ये, जेव्हा पहिल्यांदा आपण हे नियम केले तेव्हा त्यात ही जी मूळ जमीन होती त्यातील एक तृतियांश जमीन म्हाडाला गिरणी कामगारांच्या घरांसाठी म्हणून द्यायची असे नव्हते. परंतु त्यात आपण बदल केला. तो बदल केल्यानंतर नियम 57 च्या तरतुदीनुसार गिरणी मालक त्या गिरणीतील अस्तित्वात असलेल्या इमारती कायम ठेवून तेथील जमिनीचा वाणिज्यिक वापर करण्याच्यादृष्टीने विकास होत नव्हता. त्यामुळे आपण या नियमात दुरूस्ती केली. त्या दुरूस्तीनुसार आपण तेथे ज्या इमारती आहेत त्या पाडण्यासदेखील आपण गिरणी मालकांना वा विकासकांना परवानगी दिली. पूर्वी या संदर्भात ते काय करत होते ? तर तेथील मूळच्या इमारती पाडत नव्हते. मात्र तेथे मॉल वगैरे करीत होते आणि जी मूळ रिकामी जागा आहे त्यामुळे आपला प्रश्न सुटत नव्हता. आता येथे सन्माननीय सदस्यांनी जी व्यथा व्यक्त केली की, तेथे एकूण 68 हजार गिरणी कामगार मुंबईत आहेत या 58 गिरण्यांमध्ये. सभापती महोदय, हा नियम बदलल्यानंतर आता जवळजवळ 30 गिरण्यांचे प्रस्ताव आपल्याकडे आले. 58 कापड गिरण्यांच्या जमिनीत म्हाडाला आता 30 हेक्टर जमीन प्राप्त होणार आहे. त्या ठिकाणी आपण त्यांना 4 एफएसआय दिल्यामुळे प्रति हेक्टरी विकसित होणाऱ्या सदनिका 1070, 30 हेक्टर जमिनीत विकसित होणाऱ्या सदनिका 32 हजार आणि गिरण्यांतील चाळींचा विकास करून उपलब्ध होणाऱ्या एकूण सदनिका 8 हजार अशा नियम 33(5) मध्ये प्रस्तावित आहेत. त्यासाठी आपण त्यांना 4 चटई क्षेत्र कामगारांसाठी देणार आहोत. त्यामुळे तेथे एकंदर 15 हजार सदनिका प्राप्त होणार आहेत. सभापती महोदय, एकूण 55 हजार सदनिका या लवकरात लवकर करून या गिरणी कामगारांना देण्याचा आमचा प्रस्ताव आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मुंबईतील गिरणीनिहाय माहिती विचारली आहे त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, न्यू हिंद, स्वदेशी, चायना स्क्वेअर, श्रीराम वरळी, स्टॅण्डर्ड, पिरामल आणि सिंप्लेक्स ....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा सरळ प्रश्न आहे की, या नवीन नियमानुसार .. आपल्याकडे त्याचे प्रोसिडींग उपलब्ध आहे, .. म्हाडाला 100 एकर जमीन मिळणार आहे. पण आता ती 24 एकरच घेण्याचे कारण काय आणि उरलेली जमीन 76 एकर जमीन बिल्डर्सना का दिली ? खरे तर ती जमीन देखील म्हाडाकडे यायला पाहिजे. माननीय

...... एल 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 46419 .....

राज्यमंत्री महोदयांना मी सांगून की, आपण अशा प्रकारे उत्तर देऊन आमची दिशाभूल करू नका. सभापती महोदय, समजा ही गिरणी आहे आणि यापूर्वी असे केले जात होते की, या गिरणीती सगळी जमीन एकत्रित केली जात नव्हती. त्या गिरणीमध्ये मूळचे जे बांधकाम आहे, ज्या इमारती आहेत त्यामध्ये कंपौंड वॉल आणि बांधकामाची वॉल ... आता आपण हे गृहीत धरा की ती शेवटची वॉल कंपौंड वॉल आहे आणि माननीय मुख्यमंत्री बसतात तेथे बांधकामाची वॉल आहे. त्याच्या मधीलच जी मोकळी जमीन आहे ती एक तृतियांश धरली होती. ती धरूनही 100 एकर जमीन म्हाडाला मिळणार होती. पण तुम्ही त्यातील केवळ 24 एकर जमीन घेतली आहे आणि या ठिकाणी लेखी उत्तरात आपण म्हटले आहे की, किती जागा उपलब्ध होणार आहे ते आताच सांगता येत नाही. म्हणजे याचा हिशोब करताना तुमचे गणित चूक येते आहे की तुमचे आयएएस अधिकारी बसले आहेत त्यांचे गणित कच्चे आहे ? तेथे नेमकी किती जमीन आपल्याला मिळणार आहे याचा हिशोब आपल्याला गणित करून काढता येत नाही का ? तेव्हा मिळणाऱ्या 100 एकरापैकी 76 एकर जमीन तुम्ही बिल्डर्सना का दिली ? यामध्ये करोडो रूपयांचा गैरव्यवहार झालेला आहे असा माझा आपल्यावर आरोप आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी हेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, प्रत्येक गिरणीनिहाय किती जमीन आम्हाला मिळणार आहे आणि किती सदनिका आपण तेथे देणार आहोत. न्यू हिंद गिरणीमध्ये 33727 इतकी एरिया आपल्याला प्राप्त झाली आहे. त्यामध्ये 5220 सदनिका आपल्याला मिळणार आहेत. स्वदेशी गिरणीमध्ये 25224 स्क्वे.मी. इतकी जमीन आपल्याला मिळालेली आहे व तेथे 1644 सदनिका मिळणार आहेत. सभापती महोदय, मी हे अशासाठी सांगतो आहे की, नवीन नियमाप्रमाणे या जागा उपलब्ध झालेल्या आहेत. आता सन्माननीय सदस्य म्हणताहेत की, तेथे 100 एकर जमीन आपल्याला मिळणार होती त्यापैकी 24 एकरच आपल्याला मिळाली. सभापती महोदय, या सपूंर्ण गिरण्याची जी जमीन आपल्या ताब्यात मिळणार आहे त्याबाबत मी आपल्याला सांगेन की, आता 58 गिरण्यांतून सुमारे 30 हेक्टर म्हणजे 75 हेक्टर जमीन ही आपल्याला मिळालेलीच आहे. फक्त 25 एकरचाच प्रश्न राहिलेला आहे. या 55 हजार गिरणी कामगारांना आम्ही लवकरात लवकर सदनिका देणार आहोत. त्याशिवाय रोखीची देणी म्हणून 1 हजार कोटीच्या रकमा आपण त्यांना दिल्या आहेत. तेव्हा कामगारांच्या हिताचाच निर्णय यातून शासनाने घेतलेला आहे.

..... एल 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46419 .....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी जे लेखी उत्तर दिलेले आहे ते त्यांनी वाचले असेल तर सुधारित नियमातील तरतुदीमुळे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्राच्या प्रमाणात जागा उपलब्ध होणार असल्याने म्हाडाला प्राप्त होणारे निश्चित क्षेत्र काढता येत नाही. असे आपण म्हटले आहे. तर हे क्षेत्र आपल्याला का काढता येत नाही ? आपल्याला याचा नियम तर माहिती आहे, एकूण जागा किती आहे तेही माहिती आहे, म्हाडाला त्यातून किती मिळणार आहे तेही आपल्याला माहिती आहे. आता या आधीच्या मंत्र्यांनी यामध्ये काही केले असेल तर कृपया त्याच ओझ आपण आपल्या खाद्यांवर घेऊ नका. प्रामाणिकपणे सांगा. यातील किती जागा गिरणी कामगारांना मिळाली पाहिजे ? या संदर्भात गिरणी कामगारांचा मोर्चा आल्यानंतर त्याला सामोरे जाऊन गिरणी कामगारांच्या शिष्टमंडळाबरोबर बोलताना स्पष्ट शब्दात जी आपण दिलेली आश्वासने आहेत, शिवाय या सभागृहात दिलेली आश्वासने आहेत, असे असताना अशा प्रकारचे उत्तर येथे येतेच कसे ? ही तर केवळ आकडेवारी काढायची आहे. ती देखील आपल्याला काढता येत नाही का ?

( यानंतर श्री. सरफरे ..... एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46419...

श्री. विनोद तावडे...

ती आकडेवारीसुध्दा आपल्याला काढता येत नाही काय? झालेले वाटप नियमात कसे बसवावयाचे हे अजून ठरत नाही म्हणून आपण याठिकाणी आकडेवारी दिलेली नाही. यामधून म्हाडाला किती जागा मिळणार आहे याचे आपण उत्तर देणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले आहे की, 58 गिरण्यांची 30 हेक्टर म्हणजे 75 एकर जागा म्हाडाला मिळेल.

श्री. मधुकर चव्हाण : राहिलेली 25 एकर जागा आपण कां ताब्यात घेणार नाही?

श्री. हसन मुश्रीफ : याबाबत आपण कायद्यात दुरुस्ती केल्यानंतर प्रत्येक मिलनिहाय किती जमीन मिळणार आहे याची आकडेवारी मी याठिकाणी वाचून दाखविली. त्याप्रमाणे आपल्याला 75 एकर जमीन मिळणार आहे. त्यामधून 55 हजार गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न मिटणार आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार दिनांक 15 डिसेंबर, 2008 व मंगळवार दिनांक 16 डिसेंबर, 2008 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : सोमवार दिनांक 15 डिसेंबर, 2008 व मंगळवार दिनांक 16 डिसेंबर, 2008 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक 1 ते 28 सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक 1 ते 28 सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक 1 ते 28 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चा अध्यादेश क्रमांक 6 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चा अध्यादेश क्रमांक 7 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील : सभापती महोदय, सन 2008 चा अध्यादेश क्रमांक 9 - मुंबई पोलीस (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. सुरेश वरपुडकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चा अध्यादेश क्रमांक 5 - महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.मंत्रिमहोदयांनी हा अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे सांगितल्यानंतर हेच विधेयक मागे घेण्यासंबंधीचा प्रस्ताव आणण्यात येत आहे. एकदा अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आल्यानंतर त्याचे विधेयक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

संमत करण्यात येते व त्यानंतर त्याला कायद्याचे स्वरुप प्राप्त होते. त्यासाठी ही सर्व प्रक्रिया पूर्ण करावी लागते. असे असतांना हे विधेयक मागे घेण्याची आपण परवानगी कशासाठी मागत आहात? आणि हा अध्यादेश आपण कशासाठी सभागृहासमोर ठेवीत आहात?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये हा अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला होता. त्यासंबंधीचे विधेयक विधानसभागृहामध्ये पारीत झाले होते, परंतु विधानपरिषदेमध्ये ते विधेयक पारीत झाले नव्हते. मधल्या कालावधीमध्ये त्या विधेयकाचा कालावधी संपल्यामुळे ते विधेयक अंमलात आणता आले नाही. त्यामुळे शासनाला नव्याने अध्यादेश काढावा लागला. आणि तसेच कापसाच्या किंमतीमध्ये आणि वितरणाच्या संदर्भात फार मोठी तफावत होती. त्याकरिता शासनाला अध्यादेश काढावा लागला. त्यामुळे विधानसभा विधेयक क्रमांक 34 आपण मागे घेणार आहोत, आणि त्यासाठी नव्याने पुन्हा अध्यादेश काढावा लागला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेमध्ये हे विधेयक गोंधळात संमत करण्यात आले. तरीही पुन्हा ते कार्यक्रम पत्रिकेवर दाखविण्यात आले आहे.

श्री. सुरेश वरपुडकर : ते विधेयक विधानपरिषदेत मंजूर झाले नव्हते.

श्री. दिवाकर रावते : परंतु ते विधानसभेच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आले आहे?

श्री. सुरेश वरपुडकर : पुन्हा नव्याने अध्यादेश काढावा लागल्यामुळे ते विधेयक पुन्हा चर्चेसाठी घ्यावे लागत आहे.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2006-07 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2006-07 चा दहावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2006-07 या कालावधीच्या लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांवचा सन 2006-07 चा नववा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. सुरेश वरपुडकर ( सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 चा 28 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधान परिषदेच्या सन 2008 च्या दुसऱ्या अधिवेशनात दिनांक 16 जुलै, 2008 ते 26 जुलै, 2008 या कालावधीत माननीय मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 301 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी )

------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण
सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधान परिषदेच्या सन 1986 च्या दुसऱ्या अधिवेशनापासून ते सन 2008 च्या पहिल्या अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या 976 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीची विवरणपत्रे मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : विवरण सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : गृपया येथे सोबत जोडलेले विवरण छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेय मद्य ( किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण ) ( सुधारणा ) नियम, 2008 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए 1108/सीआर-23/इएक्ससी-3, दिनांकित 4 ऑगस्ट, 2008 सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

श्री. नितीन राऊत ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धुळे माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचा सन 2000-2001 चा बारावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन 2006-07 चा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 1996-97, 1997-98, 1998-99, 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे बारावा, तेरावा, चौदावा, पंधरावा, सोळावा, सतरावा, अठरावा व एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत.....

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे 27 वा, 28 वा, 29 वा व 30 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, औरंगाबाद यांचा सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006 व 2006-2007 चा अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा व पाचवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.नितीन राऊत : सभापती माहदेय, सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सातारा यांचा सन 1995-1996, 1996-1997 व 1997-1998 चा अनुक्रमे पाचवा, सहावा व सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.नितीन राऊत : सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सांगली यांचा सन 1994-1995 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचा सन 2004-2005 चा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन 2007-2008 चा 19 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाच्या मान्यतेने हे अहवाल मंत्रिमहोदयांनी पटलावर ठेवले आहेत. श्री.गोविंद स्वरुप यांनी केलेल्या भ्रष्टाचारासंबंधीचा उल्लेख असलेल्या एका अहवालावर बोलत असताना मी आणि माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आणि इतर काही सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली होती की, सभागृहात सादर होणाऱ्या अहवालापैकी एका अहवालावर तरी सभागृहात चर्चा झाली पाहिजे. कारण हे अहवाल सभागृहात सादर केले जातात, ते तसेच राहतात, त्यांचे पुढे काय होते ते निश्चितपणे कळत नाही. माननीय सभापतींनी एखाद्या अहवालावर सभागृहात चर्चा केली जाईल असे संकेत दिले होते. त्याबाबत आपण पुन्हा एकदा विचार करावा. मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात अशा अहवालांवर 1-2 दिवस चर्चा केली पाहिजे. अन्यथा, असे अहवाल सादर झाले, ते धुळ खात पडले असे होईल, त्याचे उत्तरदायित्व ना सरकारवर ना विरोधी पक्षावर आहे असे होईल. याबाबत आपण निर्णय घ्यावा.

**उपसभापती** : उद्या कामकाज सल्लागार समितीची बैठक होणार आहे. त्या बैठकीमध्ये हा मुद्दा घेतला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, नागपूर येथे हे हिवाळी अधिवेशन होत आहे. मेळघाट आणि धारणी येथे माननीय राज्यपाल दौऱ्यावर आलेले आहेत. त्या आदिवासी भागामध्ये जे बालमृत्यू झालेले आहेत त्याचा ते आढावा घेणार आहेत. गेल्या 4 महिन्यामध्ये 220 बालमृत्यू झाल्याची बातमी समोर आलेली आहे. आरोग्य खात्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे. माननीय आरोग्य मंत्र्यांनी सुदृढ बालक स्पर्धा आयोजित करुन या भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी भागातील आश्रमशाळांची परिस्थिती दयनीय आहे. त्यामुळे विदर्भाच्या व उत्तर महाराष्ट्राच्या दृष्टीने हा संवेदशनशील विषय आहे. सभागृहामध्ये इतर अनेक विषयांवर चर्चा होत असताना आदिवासी आश्रमशाळांच्या स्थितीबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. महामहिम राज्यपाल महोदयांचा विदर्भात दौरा चालू आहे. या अधिवेशनाचा कालावधी किती शिल्लक राहिला आहे हे मला माहीत नाही. परंतु या अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण थोडा वेळ द्यावा. आरोग्य विभाग, आदिवासी विभाग आणि कुपोषण रोखण्यासाठी काही विभाग एकत्रित केले आहेत त्या सर्व विभागांचा आढावा घेण्यासाठी सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण कृपया वेळ द्यावा, धन्यवाद.

-------

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:  विधेयकांना संमती व अधिसंमती

**उपसभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती व राज्यपाल यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : विधान परिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

(अ) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-

सन 2008 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 11 - महाराष्ट्र उच्च न्यायालय ( खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जाची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पध्दती रद्द करणे ) ( सुधारणा ) विधेयक, 2008.

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

(1) सन 2008 चे विधानसभा विधेयक क्रमांक 48 - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2008.

(2) सन 2008 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 14 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते ( सुधारणा ) विधेयक, 2008.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जाती कल्याण समितीचा आठवा अहवाल (2008-2009) सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा आठवा अहवाल (2008-2009) सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा आठवा अहवाल (2008-2009) सभागृहाला सादर झाला आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

**पृ.शी./मु.शी.**: नियम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. अरुण गुजराथी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : नियम समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित करण्याबाबत सदस्य-नियम समिती यांचा प्रस्ताव

श्री. अरुण गुजराथी ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो. :-

"विधानपरिषद नियमातील नियम 289 अन्वये नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील नियम 219 (1) व 219 (3) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत पाच दिवसांची करण्यात यावी."

यामध्ये तीन बाबी आहेत. आपण 4 तास काम करीत होतो त्याऐवजी ते 5 तास काम करावे अशा प्रकारची सुधारणा आहे. राज्यपालांच्या अभिभाषणाला फक्त 10 सुधारणा देण्यात याव्यात अशा प्रकारची दुसरी सुधारणा आहे. भटक्या विमुक्त जाती समितीची सदस्य संख्या 7 वरुन 15 आणि विशेष हक्क समितीची सदस्य संख्या 9 वरुन 11 करण्याच्या संदर्भात सुधारणा केलेली आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--

**उपसभापती** : नगर विकास राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी दोन विधेयके मांडण्याची परवानगी मागितलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

**पृ. शी.** : महानगरपालिका व नगरपरिषदा (पाचवी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XVI OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949. THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965).

श्री. हसन मुश्रीफ (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 16 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 16 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : महानगरपालिका व नगरपरिषदा (सहावी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XVII OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYAT AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965).

श्री. हसन मुश्रीफ (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 17 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 17 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**उपसभापती** : आता मुंबईतील 26 नोव्हेंबरच्या धटनेसंबंधीची चर्चा पुढे सुरु होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या महत्वाच्या चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये माननीय मुख्य मंत्री किंवा संबंधित खात्याचे मंत्री हजर नाहीत.

**उपसभापती** : महत्वाच्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये राज्याचे मुख्यमंत्री अथवा गृहमंत्री व गृहराज्यमंत्री हजर नाहीत असे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले. अशा चर्चेच्या वेळी ते सभागृहामध्ये हजर राहाणे अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी स्थगित करीत आहेत.

( दुपारी 12.19 ते 12.29 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

--

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी.**: दिनांक 26 नोव्हेंबर,2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी अतिरेक्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला.

**मु.शी.**: दिनांक 26 नोव्हेंबर,2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी अतिरेक्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, प्रकाश शेंडगे, पाशा पटेल, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर, ॲड. अनिल परब व श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( चर्चा पुढे सुरु...)

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल जवळपास 7.30 तास आपण या विषयावर चर्चा केली. या घटनेच्या सर्व पैलूंवर अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रकाश टाकलेला आहे. त्यामुळे मी काही फार बोलणार नाही. परंतु गटनेत्यांच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे हा जो नियम 289 चा प्रस्ताव आहे, खरे म्हणजे हा प्रस्ताव स्थगनच्या स्वरुपात सभागृहात यायला पाहिजे होता. परंतु सरकार आणि विरोधी पक्ष यांनी हे जे संकट आहे, हा जो हल्ला झाला हा कोण्या एका व्यक्तीवरचा हल्ला नव्हता. हा या राज्यावर झालेला हल्ला असल्यामुळे विरोधी पक्षाने सुध्दा सामंजस्याची व सहकार्याची भूमिका घेतली. म्हणून सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे न करता सामंजस्याच्या भूमिकेतून याठिकाणी चर्चा व्हावी, या गोष्टीला आम्ही सहमती दर्शविली आणि त्याच स्तरावर या सभागृहात या विषयावर चर्चा झाली. 26 नोव्हेंबरला जी घटना आपल्या राज्यात मुंबई शहरामध्ये घडली, मला असे वाटते की हिंदुस्थानातील अशा प्रकारची ही पहिलीच घटना असावी. 26 नोव्हेंबरचा दिवस हा मुंबईच्या इतिहासातील काळा दिवस म्हणून नोंद होणार आहे. हा हल्ला इतका भयंकर होता की, 1993 च्या बॉम्बस्फोटापेक्षाही महाभयंकर अशा प्रकारचा अतिरेकी हल्ला होता. फक्त 10 अतिरेक्यांनी संपूर्ण मुंबई शहर 59 तास वेठीस धरले होते.

सभापती महोदय, या हल्ल्याचा प्रतिकार करीत असताना आमच्या पोलीस दलातील महत्वाचे अधिकारी शहीद झाले. हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, शशांक शिंदे, तुकाराम ओंबळे या सर्वांना मी पहिल्यांदा अभिवादन करतो. कर्तव्यावर नसतानाही ज्यावेळी त्यांना या घटनेची खबर मिळाली त्यावेळी हातातील सर्व कामे बाजूला सारुन हे शूर वीर रस्त्यावर आले आणि अतिरेक्यांशी मुकाबला करण्यास सिध्द झाले. मी अभिवादन यासाठी करतो की, त्यांनी आपल्या प्राणाची पर्वा केली नाही. कुठलेही शस्त्र हातात नसताना अवघ्या एका पिस्तुलासोबत त्यांनी एके-47, एके-56 सारख्या अत्याधुनिक शस्त्राला आपणाला तोंड द्यावे लागणार आहे हे माहिती असतानाही त्यांनी कोणतीही पर्वा न करता मुंबई शहराला वाचविण्याचा प्रयत्न केला. अतिरेक्यांचे उद्दीष्ट हे फक्त ताज, ओबेरॉय हॉटेल्स किंवा नरिमन हाऊस येथे गोळीबार करणे, रक्तपात घडविणे, काही लोकांना ठार करणे एवढ्यापुरते मर्यादित नव्हते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे.......

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

ही आर्थिक राजधानी उद्ध्वस्त करुन भारत देशाला कमजोर बनविण्याचा एक मोठा कट होता. हिंदुस्थानला कमजोर बनवित असताना, हिंदुस्थानातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था, समाजव्यवस्था खिळखिळी करण्याचाच हा एक डाव होता. हा हल्ला केवळ मुंबईवरच नव्हे तर संपूर्ण देशावरील हल्ला होता, एक प्रकारे आपल्या देशाविरुध्द पुकारलेले हे छुपे युध्दच आहे, अघोषित युध्दच त्यांनी सुरु केले आहे. गेल्या दीड वर्षात देशातील 11 राज्यांमध्ये 27 ठिकाणी बॉम्बस्फोट झाले आणि त्यात 2000 च्या वर लोक मृत्यू पावले तसेच 20 हजार कोटीचे नुकसान झाले. म्हणून ही देशाची लढाई आहे, केवळ मुंबईपुरतीच मर्यादित नाही, अशा छुप्या शक्तींचा मुकाबला करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येण्याची गरज निर्माण झाली आहे, सर्वांनी कटिबध्द होण्याची आवश्यकता आहे. या देशाला अशा प्रकारचे हल्ले हे नवीन नाही तर देशात इंग्रजांनी 150 वर्षे राज्य केले, ही इंग्रजांची राजवट घालविण्यासाठी देशात स्वातंत्र्यासाठी समर झाले आणि ते समर जवळपास 100 वर्षे चालली. हजारो लोकांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली, बलिदान केले आणि हिंदुस्तानला इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त केले. ही अतिरेक्यांची जी लढाई आहे ती लवकर संपणारी लढाई नसून प्रदीर्घ काळ आपल्याला त्यांच्याशी लढावे लागणार आहे. नुकतीच मुंबईत जी घटना घडली त्यासंदर्भात माननीय पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांनी मान्य केले, देशाची माफी सुध्दा मागितली. या देशाचे नवे गृहमंत्री मुंबईत आले आणि त्यांनी सुध्दा कबूल केले की हे आय.बी. चे फेल्युअर आहे असा मनाचा मोठेपणाही त्यांनी दाखविला. परंतु या राज्यात एवढी भीषण घटना घडली त्या अनुषंगाने राज्याच्या माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जनतेची माफी सुध्दा मागितली नाही, याचे मला दुःख वाटते. खरे म्हणजे त्यानंतर जो जनप्रक्षोभ उसळला, संतापाची एक लाट निर्माण झाली ती लाट त्यांनी माफी मागितली असती तर कदाचित निर्माण झ ाली नसती. दुर्दैवाने आम्ही कर्तव्यामध्ये चुकलो हे मान्य करायला पाहिजे. ज्या रात्री ही घटना घडली त्यासंदर्भात मी प्रथम आपले कौतूक करतो की आपल्या बंगल्याच्या जवळपास अतिरेकी आले आणि आपण आवाज ऐकला व त्यानंतर रात्रभर मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील कंट्रोल रुममध्ये जाऊन बसला, पोलिसांना सहकार्य केले, यंत्रणांना सहकार्य केले. त्याचबरोबर आणखी काही मंत्री सुध्दा जागतच राहिले होते आणि जे जे करता येईल ते सर्व

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

आपण केले. हे कौतुक फक्त आम्हीच केले नाही तर मुख्य सचिवांनी व त्यांच्या कार्यालयाने देखील आपले कौतुक केले. त्यांनी आपल्याला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले की, मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यामध्ये राज्य पोलीस दलाचे व सुरक्षा जवानांचा मृत्यू झाला त्या धक्क्यातून आपण सावरतो तोच दिनांक 26.11.2008 रोजी, ज्या दिवशी घटना झाली त्या दिवशी आपण स्वत: माझ्या कार्यालयात राहून सर्वांचे मनोबल वाढविले व जातीने सर्वांची काळजी घेतली ते कधीच विसरु शकणार नाही. ज्याप्रमाणे आपल्याला आपले कर्तव्य समजले त्याप्रमाणे ही घटना घडत होती त्यावेळेस डझनभर मंत्री देखील मंत्रालयात होते पण कुठलाही अधिकारी किंवा मंत्री तिकडे गेला नाही, याचे मला दु:ख वाटते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात या सभागृहात जवळ जवळ 7.30 ताच चर्चा काल झाली तसेच अजून सुध्दा याच विषयावर चर्चा सुरु असून माननीय मंत्रीमहोदयांकडून उत्तर येणे बाकी आहे. मुंबईत अनेकदा बॉम्बस्फोटाच्या घटना घडलेल्या आहेत. सन 2006 मध्ये मुंबईतील रेल्वेमध्ये जे बॉम्बस्फोट झाले होते त्यासंदर्भात या सभागृहात चर्चा झाली होती त्यावर या ठिकाणी अनेक उपाय सुचवले गेले होते, आतंकवाद्यांचा बंदोबस्त करण्याचा निर्धार या ठिकाणी व्यक्त केला गेला परंतु त्यातील काहीही घडले नाही. मी सांगू इच्छितो की, मुंबईच्या रेल्वेत जेव्हा बॉम्बस्फोट झाल्यानंतर मी माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच श्री. डी.के.शंकरन्, ए.पी.सिन्हा तसेच पोलीस आयुक्त अनामी रॉय यांना पत्र लिहिले होते. त्या पत्रात या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर शहरात अनेक ठिकाणी धोका निर्माण झालेला असून मुंबईतील नाईट लाईफ एरिया अनेक पर्यटकांना आकर्षित करीत असतो त्यामुळे पर्यटकामध्ये दहशत पसरवण्यासाठी नाईट लाईफ चालणा-या शहरातील पब व डिस्कोथेकला अतिरेकी लक्ष बनवण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे याकडे लक्ष देऊन संभाव्य अतिरेकी कारवाया, डिस्को थेक व पब वरील हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे असे मी त्या पत्रात लिहिले होते.

सभापती महोदय, दिल्लीच्या आयबीने अशाच प्रकारचे एक पत्र 18 तारखेला डी.जी.पी. मुंबई, पोलीस कमिशनर मुंबई यांना लिहिले होते. या पत्राचे उत्तर श्री. पसरिचा साहेबांनी अनामी रॉय यांना लिहिले होते. त्यामध्ये म्हटले होते की, "Intelligence inputs reveal that Lashkar-e-Toiba modules may attack one of the following targets in the near future : BARC, Night Clubs/Bars, Religious Yatras." अशा प्रकारचा त्यांनी त्यात उल्लेख केला होता. गृहविभागाच्या विशेष विभागाने सुध्दा मला अशाच प्रकारचे पत्र देऊन आम्ही मुंबईच्या पोलीस कमिशनरांना दखल घेण्याचे कळवलेले आहे असे सांगितले होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी माजी गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांचे भाषण वाचून दाखवले. मुंबईच्या लोकलमध्ये ज्यावेळेस बॉम्बस्फोट झाले त्यानंतर या सभागृहात राज्याच्या गृहमंत्र्यांनी जो निर्धार व्यक्त केला होता ते या ठिकाणी माननीय रावते साहेबांनी वाचून दाखवले आहे. आयबी आणि रॉ यांनी महाराष्ट्राच्या गृहखात्याला आतंकवादी हल्ले होतील असे कळवलेले असतांना आपल्या राज्याच्या गृहखात्याने कोणतीही दखल घेतली नाही. आयबी आणि रॉ यांनी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-2

SGJ/ MMP/ KGS/ प्रथम श्री. खर्चे.... 12:40

श्री. पांडुरंग फुंडकर...

महाराष्ट्राच्या गृहखात्याला आतंकवादी हल्ले होतील असे कळवले होते त्यावेळेस अनामी रॉय काय करीत होते? गेल्या दोन वर्षापासून अतिरेक्यांच्या हल्ल्याची चाहूल या राज्याला लागलेली असतांना पोलीस कमिशनर आणि आताचे डी.जी. काय करत होते? सुरक्षेचे काय उपाय त्यांनी योजले होते ? केंद्राने गृहखात्यासाठी जो पैसा दिला होता तो पैसा देखील खर्ची पडला नाही हे आमचे दुर्दैव आहे. 26 तारखेला जी घटना घडली त्यासंदर्भात माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. रात्री 9.30 वाजता ज्यावेळेस अतिरेकी ओबेरॉय हॉटेलमध्ये घुसले त्यावेळेस पहिला प्रश्न पडतो की, समुद्र मार्गे अतिरेकी मुंबईमध्ये शिरले कसे काय ? त्यावेळेस तटरक्षक दल काय करीत होत ? पोलीस काय करत होते ? मुंबईच्या किना-यापर्यंत अतिरेकी येऊन पोहचतात, रस्त्यावर येतात, ताज हॉटेल पर्यंत जातात, ओबेरॉय हॉटेल पर्यंत जातात आणि आपले पोलीस खाते मात्र बघ्याची भूमिका घेते ? माझ्या मनात दुसरा प्रश्न असा निर्माण झाला आहे की, ओबेरॉय हॉटेलमध्ये किंवा ताजमध्ये 59 तास घंटे अतिरेकी लढत होते तेव्हा त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा कोठून आला होता ? 80-80 किलो वजनाचे सामान घेऊन अतिरेकी ताज हॉटेल आणि ओबेरॉय हॉटेलमध्ये कसे काय घुसले हा प्रश्न सुध्दा अनुत्तरीच आहे. हे अतिरेकी अगोदर त्या हॉटेलमध्ये राहत होते काय ? त्यांनी त्या हॉटेलमध्ये खोल्या बूक केल्या होत्या काय ? अगोदरच त्या ठिकाणी सामान डम्प करण्याचे काम सुरु होते त्यावेळेस आपली इन्टेलिजन्स शाखा काय करीत होती हाही प्रश्न आमच्या मनात आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे... 12:45

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी रात्री 9.30 च्या सुमारास हा अतिरेकी हल्ला सुरु झाला त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री केरळमध्ये होते. त्यांना ही बाब कळविण्यात आली. त्यानंतर साधारणत: दीड तासानंतर त्यांनी केंद्रीय गृह मंत्र्यांना फोन करुन मुंबई शहरावर हल्ला झाल्याचे आणि आम्हाला नॅशनल सिक्युरीटी गार्डसची मदत पाहिजे असे सांगितले. माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांनी विचारले किती एनएसजीची आवश्यकता आहे. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 200 एनएसजी पाठवावे. मुंबई ते दिल्ली हे अंतर दीड तासाचे आहे. परंतु सकाळी 6.00 वाजेपर्यंत एनएसजीचे कमांडो मुंबईत पोहोचू शकले नाहीत. रात्री 11.00 वाजता निरोप मिळाल्यानंतर त्यांना मुंबईस येण्यास तब्बल सात लागले. इतका वेळ लागण्याचे कारण काय ? राज्य सरकार आणि केंद्र सरकारमध्ये समन्वय नव्हता काय ? पोलीस यंत्रणा आणि प्रशासन यांच्यामध्ये समन्वय नव्हता काय ? एनएसजींना पोहोचण्यास सात तासांचा उशिर का लागला. जर एनएसजी दोन तासात पोहोचले असते तर अनेक लोकांचे प्राण वाचले असते.

सभापती महोदय, एनएसजीला पोहोचण्यास उशीर कुणामुळे झाला असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा माझी याठिकाणी मागणी आहे की, या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. पोलीस आयुक्त आणि डी.जीं.ना आय.बी.चा रिपोर्ट आला होता. त्यांच्यावर कोणतीही कारवाई न होता यामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांचा बळी गेला. ज्यांच्या हातात प्रशासन आहे त्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली ?

सभापती महोदय, शहीद हेमंद करकरे हे आमच्या विदर्भातील आहेत. सन 1987 मध्ये प्रशिक्षणार्थी असताना त्यांनी अकोला शहरात दीड वर्षे काम केले. त्यांचा आणि माझा जवळून परिचय होता. मुंबईवर हल्ला झाला त्यावेळी विदर्भातील मर्द मराठा, कोकणातील तरुण, साताऱ्याचा तरुण रस्त्यावर उतरुन लढत होते त्यावेळी पोलीस आयुक्त आणि डी.जी. कुठे होते ? सैन्य लढत असताना त्यांचे सेनापती आपल्या चेंबरमध्ये बसून चहा-कॉफी घेत होते. महाराष्ट्रासाठी ही लाजविणारी धटना आहे. सिनिअर असलेल्या अधिकाऱ्यांना डावलून अनामी रॉय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

यांना डी.जी.चे प्रमोशन देण्यात आले. महाराष्ट्रात पोलिसांचे कसे खच्चीकरण झाले त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. स्कॉडलंड यार्डच्या पोलिसांबरोबर आपल्या मुंबई पोलिसांची तुलना होत होती. परंतु आता पोलिसांचे कसे खच्चीकरण होत आहे त्याबाबत मी ख्वाजा युनुसचे प्रकरण सांगतो. ते सांगणे आवश्यक आहे. दिनांक 2.12.2000 रोजी घाटकोपर येथे बेस्ट बसमध्ये बॉम्बस्फोट झाला, त्यामध्ये दोघांचा मृत्यू झाला. त्यावेळी मुंबई गुन्हे शाखेच्या घाटकोपर गुन्हा शाखेमध्ये पोलीस निरीक्षक श्री.प्रफुल्ल भोसले, देसाई, व्हनमाने व खोत कार्यरत होते. सदर केसचे काही दहशतवादी आरोपी औरंगाबाद येथे असल्याने आय.बी.च्या अधिकाऱ्यांबरोबर वरील अधिकाऱ्यांना औरंगाबाद येथे आरोपिंचा शोध घेण्यासाठी पाठविले. या अधिकाऱ्यांनी औरंगाबाद येथे 15 दिवसांत आरोपिंचा शोध घेऊन उच्चशिक्षित दहशतवादी डॉ.मतीन व इंजिनिअर जहीर या दोन अतिरेक्यांना ताब्यात घेतले आणि पुढील तपासासाठी त्या आरोपिंना पवई युनिटच्या ताब्यात देण्यात आले. एक उच्चशिक्षित इंजिनिअर दहशतवादी ख्वाजा युनिस यास गुन्हे शाखेच्या एअरपोर्ट युनिटने परभणी येथे अटक करुन त्यास पवई युनिटच्या ताब्यात देण्यात आले. वरील तीन दहशतवादी आणि अन्य दहशतवादी पवई युनिटच्या ताब्यात होते व तेच तपास करीत होते."

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ....

त्या नंतर घाटकोपर येथे बॉम्ब स्फोट झाले आणि त्यानंतर 2003 साली मुंबईत विलेपार्ले ,मुंबई सेन्ट्रल, मुलुंड रेल्वे स्थानक आणि पुन्हा घाटकोपर , गेट वे ऑफ इंडिया, झव्हेरी बाजार येथे अतिरेक्यांनी वेगवेगळया वेळेस बॉम्ब स्फोट घडविले व त्यात 150 हून अधिक माणसे मारली गेली. या सर्व बॉम्ब स्फोटातील एकूण 13 दहशतवाद्यांना घाटकोपर युनिटच्या त्याच श्री. प्रफुल्ल भोसले श्री. व्हनमाने, श्री देसाई, श्री.खोत यां बहादूर पोलिसांनी दहशतवाद्यांना अटक केली होती त्याचबरोबर ए के 47, रिव्हॉल्वर, हॅन्ड ग्रेनेड आणि आरडीएक्ससुध्दा जप्त केले होते. त्यामुळे या चार पोलिसांवर दहशतवाद्यांचा मोठा राग होता.दहशतवादी या चार पोलिसांवर सूड घेण्याची संधी पहात होते. त्यानंतर हा तपास स्टेट सी.आय.डी.कडे सोपविण्यात आला होता. त्यात काही भ्रष्ट आणि मतलबी अधिकारीसुध्दा होते त्यातील डीसीपी श्री. सुरेशं पाडवी यांचे नाव मी या ठिकाणी घेणार आहे श्री. सुरश पाडवी हा कोण आहे? त्याच्या वार्षिक गोपनीय अहवलामध्ये दाऊद इब्राहिमबरोबर सबंध असल्याचा वरिष्ठांचा शेरा आहे. हे वरिष्ठ अधिकारी दुसरे तिसरे कोणीही नसून ते श्री.हसन गफूर आहेत. श्री.सुरेश पाडवी यांचा गोपनीय अहवाल श्री. हसन गफूर यांनी लिहिला असून त्यात त्यांनी असे म्हटलेले आहे की, "He had very close association with the owner of the Hotel Milan International, which is owned by the notorious gangster Dawood Ibrahim, through a front man. This hotel was used as a co-ordinating centre for the gangsters. Shri Padvi used to frequent the hotel very often, until he was personally told to stop it.

He is reported to have had a very close connection with the notorious Dock-Thief/Narcotics smuggler namely Iqbal Mirchi." ज्या डीसीपीचे गॅन्गस्टार्स बरोबर तसेच अतिरेक्यांबरोबर पार्टनरशीप होती त्या डीसीपीनी या कर्तव्यदक्ष पोलीस अधिका-या वर केसेस दाखल केल्या होत्या. युनूस ख्याजाचा खून तुम्ही केला अशा प्रकारची केस त्यांच्या विरुध्द दाखल करण्यात आली होती. हे प्रकरण विक्रोळीच्या कोर्टामध्ये गेले आणि त्या कोर्टाने या प्रकरणातील कागदपत्राची तपासणी केल्यानंतर कोर्टाने त्यांना ताबडतोब जामीन दिला होता त्यानंतर हे प्रकरण हायकोर्टात गेले त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे स्टेट सीआयडीने केलेल्या गुन्हयाच्या तपासाच्या कागदपत्रांची छाननी माननीय पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी

..2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथमश्री.शिगम 12.50

श्री.पांडुरंग फुंडकर ....

केली सदर छाननीत पोलीस निरीक्षक श्री.प्रफुल्ल भोसले,श्री.व्हनमाने, श्री.देसाई व श्री.खोत यांच्याविरुध्द कोणताही पुरावा आढळला नाही. या कागदपत्रांची छाननी नियमानुसार राज्य शासनाने केली होती आणि शासनाने सुध्दा या अधिका-याविरुध्द प्रतयक्ष वा अप्रत्यक्ष कोणताही पुरावा नसल्याचा निष्कर्ष काढला व या अधिका-याविरुध्द दोषारोपपत्र पाठविण्यास व खटला भरण्यास मंजुरात दिली नाही ज्याचा सन्मान करण्यात आला होता, ज्यांना शेकडो शोर्य पदक देण्यात आले होते, राष्ट्रपती पदक देण्यात आले होते त्या अधिका-यांना 2005 पासून आज पर्यत जवळजवळ पावणेचार वर्षे निलंबित करण्यात आलेले आहे त्या अधिका-यांना तातडीने पुन्हा कामावर घेण्यात येणार आहे काय ? पोलिसांचे धैर्य जर वाढवावयाचे असेल तर या अधिका-यांना ताबडतोब कामावर घेतले पाहिजे या अधिका-यांना हाय कोर्टाने निर्दोष ठरविले होते विक्रोळी कोर्टाने निर्दोष ठरविले होते त्याचवरोबर पोलीस महासंचालकांनी असे सांगितले होते की, हे अधिकारी निर्दोष आहेत तरी सुध्दा या चार जहॉबाज पोलीस अधिका-यांना अजूनही निलंबितच केलले आहे. ज्या अधिका-यानी गॅन्गस्टार खतम् केले आहेत, ज्यांनी अनेक गॅन्ग स्टारना मारुन टाकले आहे, ज्यांनी अनेक मुंबईवरचे गॅन्गस्टर्सचे हल्ले रोखले आहेत अशा प्रकारचे अधिकारी आजही निलंबित आहे त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य खचणार नाही काय ? माझी अशी मागणी आहे की या चार अधिका-याना ताबडतोब कामावर घेण्यात यावे. पोलिसाबरोबर जर शासन अशा प्रकारे जर वागणार असेल तर राज्यातील पोलीस काम करु शकणार नाही. श्री अनामी रॉय ही व्यक्ती कशी आहे ?

नंतर श्री.सुंबरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

खरे म्हणजे हे महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर असताना गेल्या दोन अडीच वर्षामध्ये महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना झुकविणारे असे हे व्यक्तिमत्त्व आहे. या व्यक्तिमत्त्वाला त्या पदावर ठेवण्यासाठी खूप काही चढाओढ लागली होती. त्यानंतर त्यांची नियुक्ती त्या पदावर दोन ज्येष्ठ अधिकाऱ्यांना डावलून करण्यात आली आणि ते प्रकरण हायकोर्टामध्ये गेल्यावर हायकोर्टाने त्यांच्या विरोधात निकाल देऊन, त्यांची नियुक्ती त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या दोन जणांना डावलून त्यांना नेमले असल्याने त्यांना त्या पदावरून काढून टाकावे असे सांगून त्यांना तेथे कशासाठी ठेवले ? असा प्रश्न विचारला होता. पण तरीही त्याप्रमाणे शासनाने कारवाई केलेली नाही. ज्येष्ठतेनुसार त्यांच्या पुढे असणाऱ्या दोन जणांना डावलून त्यांना त्या पदावर नियुक्ती द्यावी म्हणून दिल्लीहून सांगण्यात आले होते व त्याप्रमाणे शासनाने त्यांची नियुक्ती केली. असेच होत असेल तर मग पोलिसांमध्ये नीतीधैर्य राहणारच नाही. सभापती महोदय, मुंबईत 26 नोव्हेंबरला घडलेल्या घटनेची न्यायालयीन चौकशी करावी या मागणी बरोबरच जे अधिकारी त्यावेळी आपल्या कर्तव्यामध्ये चुकले आहेत, ज्यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेतले नाही आणि तरीही त्यांना त्याची कोणतीही लाज-शरम नाही अशा या श्री.अनामी रॉय यांची त्या पदावरून हकालपट्टी केली पाहिजे आणि त्यांच्या बरोबरच मुंबई पोलीस आयुक्तांची देखील हकालपट्टी केली पाहिजे, ही माझी दुसरी मागणी आहे.

सभापती महोदय, त्या दिवशी पोलीस त्या अतिरेक्यांबरोबर लढत हाते त्यावेळी त्यांच्या हाती कोणती शस्त्रे होती ? याबाबतीत पुण्याचे पोलीस आयुक्त श्री.एस.पी.सिंग यांनी म्हटले आहे की, अतिरेक्यांच्या हाती एके 47 आणि हॅण्डग्रेनेड या सारखी शस्त्रे होती आणि अशी घातक व अत्याधुनिक शस्त्रे हाती घेऊन त्यांनी हल्ला केला होता व त्यांचा प्रतिकार करण्यासाठी आमच्या पोलीस जवानांकडे जुन्या काळातील लाकडी बंदुका होत्या. इतकेच नव्हे तर त्यांच्याकडे असलेली शिरस्त्राणे आणि बुलेटप्रूफ जाकीटे देखील अत्याधुनिक नव्हती. ती खरोखरी बुलेटप्रूफ नव्हतीच. त्यामुळेच हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर या सारख्या हिम्मतबाज पोलीस अधिकाऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आणि ते शहीद झाले. सभापती महोदय, हे मी म्हणत नाही, हे माझे वक्तव्य नाही तर पुण्याचे पोलीस आयुक्त श्री.सत्यपालसिंग यांच वक्तव्य आहे. सभापती महोदय, अशा प्रकारची कालबाह्य झालेली जुनी शस्त्रे आपण आपल्या पोलिसांना दिली आहेत. एकीकडे जग एकविसाव्या शतकामध्ये गेले आहे आणि जवळपास जगातील सर्वच

..... डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

देशातील पोलिसांकडे अत्याधुनिक साधने, शस्त्रास्त्रे असताना आपल्या पोलिसांना जर जुनी, कालबाह्य झालेली, लाकडी, जुन्या गंजलेल्या नळ्यांच्या बंदुकांसारखी शस्त्रे आपण देत असू तर त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य, नीतीधैर्य खचणार नाही तर आणखी काय होणार आहे ? ज्या पोलिसांच्या जीवावर आपण हे राज्य चालविता आहात, या राज्यातील कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत ठेवू इच्छित आहात, राज्याची सुरक्षा त्यांच्या हाती सोपवित आहात त्यांना आपण आजच्या युगातही अत्याधुनिक साधने आणि शस्त्रे देणार नसाल तर अशा 7-7 तासांच्याच नव्हे तर 18 तासांच्या चर्चादेखील वांझोट्या ठरतील हे आपण लक्षात ठेवावे. तेव्हा प्रथमत: आपण आपल्या पोलीस दलाचे आधुनिकीकरण केले पाहिजे, पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे दिली पाहिजेत. त्यासाठी आपण तुम्ही बजेट आणा आम्हा विरोधी पक्षातर्फे त्याला अजिबात विरोध होणार नाही. तेव्हा पोलीस दलाचे सर्वदृष्टीने सक्षमीकरण झाले पाहिजे ही माझी या निमित्ताने तिसरी मागणी आहे.

सभापती महोदय, 26 नोव्हेंबरला मुंबईवर झालेला अतिरेकी हल्ल्याची घटना हिंदुस्थानला कलंक लावणारी घटना आहे. मी या चर्चेच्या निमित्ताने आपल्यामार्फत गृहमंत्र्यांकडे, गृहराज्यमंत्र्यांकडे विनंती करणार आहे. गृहमंत्री अजून किती दिवस वाट पाहणार आहेत ? आतापर्यंत अतिरेक्यांकडून घडविण्यात आलेल्या बॉम्बस्फोटामध्ये या राज्यामध्ये अनेक माणसे मारली गेली आहेत अजून कितींचे प्राण आपण असेच घेणार आहात. या पुढे असे प्रकार होऊ नयेत, असे प्रसंग येऊ नयेत यासाठी प्रथमत: आपण आपली पोलीस यंत्रणा नीट करा. पोलीस दलातील गँगबाजी, गटबाजी जी सुरू आहे ती थांबवा. पोलिसांना योग्य तो न्याय द्या. पोलिसांचे जे राजकीयकरण चालू आहे ते थांबवा. सैन्याप्रमाणे आपले पोलीस दल देखील राजकारण विरहित असले पाहिजे. आज पोलिसांमध्ये गटबाजी सुरू आहे. कर्तव्यदक्ष अधिकारी व शिपाई मागे पडत आहेत आणि चमचेगिरी करणारे, लाच खाणारे आणि ज्यांचयामध्ये कोठलीही कार्यक्षमता नाही असेच लोक पुढे येऊ लागले आहेत, वरची पदे पटकावू लागले आहेत. अशा लोकांच्या हाती आपण हे राज्य देऊ लागलो तर त्यातून हा महाराष्ट्र, ही मुंबई सुरक्षित राहणार नाही. तेव्हा या सर्व गोष्टींचा आपण गांभीर्याने विचार करणार आहात की नाही ? तो करणार नसाल तर या 7-8 तासांच्या चर्चा वांझोट्या ठरणार आहत. आज या मुंबईचे, देशाच्या आर्थिक राजधानीचे भवितव्य तुमच्या हाती आहे. त्यासाठी आपण प्रामाणिकपणे आणि गांभीर्याने विचार करा. आत्मपरिक्षण आणि

...... डब्ल्यू 3 ....



KBS/MMP/KGS. श्री. गायकवाड नंतर -- 12:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

आत्मचिंतन करा. आज मुंबईतील माणूस सकाळी घरातून निघाल्यानंतर पुन्हा सायंकाळी घरी सुरक्षितपणे परत येईल की नाही याची शाश्वती राहिलेली नाही, त्याच्या मनात जी भीती या घटनेतून निर्माण झालेली आहे ती दूर होईल अशी परिस्थिती आपण या मुंबईत, या महाराष्ट्रात निर्माण केली पाहिजे. यासाठी आपण जनतेच्या पाठीशी सक्षमपणे उभे रहावे आणि आपण तसे उभे राहाल याची मला खात्री आहे. आपण प्रामाणिकपणे आणि इमानदारीने जनतेचे रक्षण करण्याचे ठरविले तर संपूर्ण महाराष्ट्र आपल्या पाठीशी राहिल्याशिवाय राहणार नाही एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

( यानंतर श्री. सरफरे ... एक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय,...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय गृह राज्यमंत्र्यांविषयी पूर्ण आदर ठेवून मी याठिकाणी आपले म्हणणे मांडू इच्छितो. काल संपूर्ण दिवसभर या महत्वाच्या विषयावर झालेल्या चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी किंवा माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. काल या सभागृहामध्ये दोन्ही बाजूच्या अनेक माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेऊन विधायक सूचना केल्या आहेत, काही मागण्या केल्या आहेत. अशाप्रकारे एका गांभीर्यपूर्वक झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाकडून काही धोरणात्मक निर्णय जाहीर केले जाणार आहेत. त्यामुळे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी याठिकाणी उत्तर देणे बरोबर नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासंबंधी करण्यात आलेल्या चर्चेमध्ये माननीय गृहमंत्री विधानसभेमध्ये उत्तर देतील व त्यानंतर ते विधानपरिषदेमध्ये येऊन उत्तर देतील असे ठरले आहे. अशा महत्वपूर्ण विषयावरील चर्चेच्या उत्तरामध्ये सरकारचे पुढील धोरण जाहीर करावयाचे असेल तर माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहून उत्तर दिले पाहिजे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांचे सौजन्य असे आहे की, ते भाषण करीत असतांना समोरच्या बाजूला कॅबिनेट मंत्री उपस्थित नसतांनाही त्यांनी भाषण सुरु ठेवले. त्याच सौजन्याची अपेक्षा आपण शासनाकडून करु इच्छितो. आणि या चर्चेला सभागृहाच्या नेत्यांनी किंवा संबंधित खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांनी गांभीर्यपूर्वक उत्तर दिले पाहिजे. संबंधित कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत सभागृहाचे कामकाज आपण तहकूब केले पाहिजे.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृहमंत्री विधानसभेच्या कामकाजामध्ये व्यस्त आहेत. या सभागृहाने मला जर उत्तर देण्याची संधी दिली तर मी निश्चितपणे या चर्चेला न्याय देऊ शकतो.

(अनेक मा.सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलू लागतात.)

श्री. मधुकर चव्हाण : अध्यक्ष महोदय, मंत्रिमहोदय या सभागृहाला इतके लाईटली कां घेत आहेत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी नम्रपणे आपणास विनंती करतो की, हा विषय फार गंभीर स्वरुपाचा आहे. हा विषय आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय गृहमंत्री येणार नसतील तर आपण केवळ या चर्चेचा आग्रह धरला, त्यावर चर्चा झाली आणि गृह राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले एवढेच या चर्चेचे महत्व रहाणार आहे.

(गोंधळ)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री उत्तर देणार नसतील तर ही संपूर्ण चर्चा वांझोटी ठरणार आहे....

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मला यानिमित्ताने सभागृहाला सूचना करावयाची आहे. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी कालपासून या सभागृहामध्ये उपस्थित राहून संपूर्ण चर्चा ऐकली आहे...

(अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे व त्यानंतर त्यांनी बोलावे. माझी अशी सूचना आहे की, या चर्चेला माननीय गृहराज्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री किंवा माननीय गृहमंत्र्यांनी विधानपरिषदेमध्ये येऊन ते या चर्चेला परिपूर्ण उत्तर देऊ शकतील. तोपर्यंत माननीय गृहराज्यमंत्र्यांनी या चर्चेच्या अनुषंगाने उत्तर देण्यास सभागृहाची हरकत नसावी.

(गोंधळ)

**उपसभापती** : सभागृहामध्ये माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उत्तर देऊ नये असे नियमात कुठेही म्हटलेले नाही....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण या विषयाचे गांभीर्य लक्षात घ्यावे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण सांगितले की, असा नियम नाही. माननीय राज्यमंत्री हे तडफदार आहेत हे मान्य आहे. आपल्याला त्यांना उघडे पाडण्यासाठी अजून वर्षभर संधी आहे. आम्ही त्यांना उघडे पाडू. या चर्चेच्या संदर्भात आपण विशिष्ट नियम केला. सरकारने माननीय राज्यमंत्र्यांना उत्तर द्यावयास लावून वाटेला लावले तर ती बाब या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्याचा तसेच निष्पाप लोकांच्या बलिदानाचा अपमान करणारी ठरेल. या सभागृहातून चांगला संदेश जाऊ द्या. या ठिकाणी आपण दोषारोप न करता इतकी चांगली चर्चा केलेली आहे. जर माननीय राज्यमंत्र्यांना चार प्रश्न विचारले आणि त्यांना जर उत्तर देता आले नाही तर ते योग्य होणार नाही. त्यांचे हसे करु नका. ते आमचे मित्र आहेत तसेच तडफदार आहेत. ते कॅबिनेट मंत्री नाहीत. त्यांना अधिकार नाहीत. ते धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या गट नेत्यांची बैठक झाली त्यामध्ये विधानसभा सभागृहामध्ये उत्तर दिल्यानंतर माननीय गृहमंत्री विधान परिषद सभागृहामध्ये उत्तर देतील असे ठरले होते आणि ठरल्याप्रमाणे या ठिकाणी केले पाहिजे.

श्री. जयंत प्र. पाटील : गट नेत्यांच्या बैठकीत तसे ठरले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गट नेत्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे केले पाहिजे.

**उपसभापती** : यामध्ये दोन बाबी आहेत. सभागृहामध्ये आपण जे ठरवतो ते सर्व मिळून एकमताने ठरवतो. यामध्ये कोणावर निर्णय लादण्याचा प्रश्न नाही. गट नेत्यांच्या बैठकीमध्ये अशा प्रकारचे ठरले असे आपण सर्व सन्माननीय सदस्य सांगत आहात आणि मी ते मान्य करतो. प्रश्न एवढाच आहे की, सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी चर्चेला उत्तर देऊ नये असा नियम नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही विशिष्ट चर्चा आहे आणि त्या अनुषंगानेच हे ठरले होते.

**उपसभापती** : सभागृहाची भावना लक्षात घेणे हे माझे कर्तव्य ठरते. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून सांगितले की, सर्व सन्माननीय सदस्यांचा आग्रह असेल तर माझी देखील अडचण नाही. ते त्यांचे कर्तव्य बजावण्यास समर्थ आहेत. विधानसभा सभागृहामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**उपसभापती** .........

माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर चालू आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन विधानसभा सभागृहातील त्यांचे उत्तराचे भाषण संपल्यानंतर त्यांना या ठिकाणी पाचारण करुन उत्तर देण्यास सांगू. त्यांचे उत्तर कधी संपेल हे माहीत नाही. तोपर्यंत सभागृहाचे पुढचे कामकाज आटपावयाचे की, सभागृहाची बैठक स्थगित करावयाची हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या चर्चेच्या उत्तराचे गांभीर्य जाता कामा नये. आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. त्यानंतर उत्तराला सुरुवात करावी.

**उपसभापती** : सभागृहाच्या कामकाजाचे गांभीर्य जाऊ नये.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तराचे गांभीर्य जाऊ नये हे महत्वाचे आहे.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी कालपासून जवळपास 8 ते 9 तास या सभागृहातील अभ्यासपूर्ण आणि गांभीर्यपूर्ण वक्तव्य ऐकत आहे. मी सर्वस्वी जबाबदार आहे. मी सभागृहाच्या भावना ओळखतो. हा अतिरेकी हल्ला सोपा नव्हता. सगळ्या जनतेने आपला रोष व्यक्त केला आहे. त्यामुळे मी जे काही मांडेन ते सर्वसामान्यांना आवडेल असेच मांडेन. निर्णय घेत असताना ज्या काही धोरणात्मक बाबी असतील किंवा काही महत्वाचे असेल तर तोपर्यंत माननीय गृहमंत्री सभागृहात येतील आणि त्याचे उत्तर देतील. अशी विनंती केली जाऊ शकते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे आणि त्यानंतर चर्चेचे उत्तर सुरु करावे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या सभागृहामध्ये विरोधी पक्षाच्या सदस्यांपेक्षा सत्ताधारी पक्षाचे जास्त सदस्य बोलले. आपण याबाबतीत वेगळा नियम केला. अशा वेळेला माननीय गृह राज्यमंत्री धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाहीत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी त्यांची मर्यादा मान्य केलेली आहे. त्यांनी याबाबत दखल घेऊन असे सांगितले की, धोरणात्मक बाबींच्या संदर्भात माननीय गृहमंत्री बोलतील. त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवला पण या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी किंवा सभागृहाच्या नेत्यांनी चर्चेला उत्तर द्यावे. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सन्माननीय गृह राज्यमंत्री मुंबई पोलीस आयुक्तांना घरी पाठविण्याचा निर्णय उत्तरातून जाहीर करणार आहेत काय, ही धोरणात्मक बाब आहे. माननीय राज्यमंत्री महोदय काल सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी मुद्दे लिहून घेत होते. हे जरी खरे असले तरी माननीय गृह मंत्र्यांनी या चर्चेला उत्तर दिले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. मी यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांशी बोलतो. तोपर्यंत सभागृहाची बैठक मी दुपारी 2.00 पर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.10 ते 2.00 पर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. विनोद तावडे : उपसभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री हजर नाहीत. त्यामुळे सभागृहाची बैठक आणखी काही वेळ स्थगित करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.10 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.01 ते 2.10 पर्यन्त स्थगित झाली.)

----

... नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहात अजूनही गृहमंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाचे कामकाज काही मिनिटांसाठी पुन्हा तहकूब करावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात माननीय गृहमंत्री महोदयांना एवढी अनास्था असेल तर ही खेदजनक बाब आहे. सचिवांनी ही बाब माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावी. आता मी सभागृहाचे कामकाज दुपारी 2.30 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.11 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**उपसभापती** : माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर खालच्या सभागृहात सुरु आहे. या सभागृहाच्या विनंतीवरुन माननीय गृहमंत्र्यांना चर्चेवरील उत्तरासाठी पाचारण केलेले आहे. दरम्यानच्या काळात सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये यासाठी पुढील कामकाज घेण्यास सभागृहाची अनुमती आवश्यक आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचना विचारात घ्याव्यात.

श्री.दिवाकर रावते : महोदय, लक्षवेधी सूचना घेण्यात याव्यात.

**उपसभापती** : ठीक आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "दिनांक 1 नोव्हेंबर, 2008 रोजी एस.टी.बसला घोणसे घाटात अपघात होऊन त्यात 21 प्रवासी जागीच ठार तर 39 प्रवासी जखमी होणे, शासनाने या मार्गाला पर्यायी मार्गासाठी केंद्रीय मार्ग निधीतून सुमारे 2.34 कोटी रुपये मंजूर करुन 7 वर्षे होऊन देखील त्यावर कार्यवाही न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "वस्तीशाळा नियमित करताना सदर शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना नियमित करण्याचे व सेवांतर्गत डी.एड प्रशिक्षण देण्याचे शासनाने आश्वासन देऊनही त्यावर कार्यवाही न झाल्याने हजारो वस्तीशाळा शिक्षकांनी या संदर्भात आंदोलन करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपिकिशन बाजोरिया यांनी "अकोला, वाशिम, बुलढाणा इ.जिल्हयात जमीन प्लॉट सदनिका इ.स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणावर खरेदी विक्री शासनाने तयार केलेल्या रेडिरेकनरमधील किंमतीनुसार करणे बेकायदेशीर असल्याचे मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनही शासन सदर आदेशाची पायमल्ली करीत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "सातारा येथील शाहुनगरमध्ये असलेल्या सहयाद्री प्राथमिक विद्यामंदिर शाळेमध्ये संस्थाचालक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे वेतन देत नसून त्यांच्या वेतनातून कोऱ्या स्लीपवर सह्या घेऊन 50 ते 30 टक्के रक्कम कापून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती.............**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी "शिरनेर, ता.अंबड, जि.जालना येथे लघुपाटबंधारे स्थानिक स्तर विभाग यांचेकडून सुमारे 25 लक्ष रुपये खर्च करुन पाझर तलाव बांधण्यात येणे, सदर तलाव गेल्या महिन्यात अगदी अल्प पावसामुळे मध्यभागी फुटल्याने तलावाचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात घुसल्याने शेतीचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल यांनी "महात्मा जोतिबा फुले विद्यालय, गवंढळा, ता.खामगाव, जि.बुलढाणा या शाळेच्या संस्थेच्या सचिवांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या भारत सरकारच्या शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये मोठया प्रमाणात अफरातफर करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल यांनी "खामगांव तालुक्यात सावकारी बाबतच्या अनेक प्रकरणात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी एकाच प्रकारचे आदेश सावकाराच्या बाजूने पारित केल्याने निबंधकांच्या या पक्षपाती वागणुकीमुळे शेतकऱ्यांना न्याय मिळणे अशक्य झाल्याने सदर प्रकरणे अन्य सहाय्यक निबंधकाकडे वर्ग करण्यची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल यांनी "शासन निर्णयानुसार ठाणे जिल्हा परिषदेमध्ये सन 2008-09 मध्ये शिक्षण सेवकांच्या भरती प्रक्रियेत परिक्षार्थींमध्ये स्थानिक डी.एड उमेदवारांना स्थान न मिळाल्याचे अन्यायग्रस्त डी.एड धारकांनी जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आणून देऊनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती.............**

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे मराठी व इंग्रजी लघुलेखकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी सन 2006 मध्ये जाहिरात देणे, सदर परीक्षेचा निकाल 2008 मध्ये जाहीर होऊन त्यात मौखिक चाचणी होऊन तीन महिन्यांचा कालावधी उलटून जाऊनही अद्याप निकाल जाहीर न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल यांनी "मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील जागेवर अनधिकृत झोपडपट्टया उभ्या राहिल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने सदर झोपड्या हटविण्यासाठी दि.31.12.2008 ची मुदत देऊनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "अमरावती जिल्हयातील मेळघाटातील कुपोषण व बालमृत्यू थांबविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असून गेल्या चार महिन्यात सदर भागात 220 कुपोषित बालकांचा मृत्यू होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती**..........

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, केशवराव मानकर, मधुकर चव्हाण, पाशा पटेल यांनी "राज्य वीज मंडळातील कामगारांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे निवृत्ती वेतन लागू करण्याची वीज कर्मचाऱ्यांची असलेली दीर्घकालीन मागणी मान्य न होणे, राज्याला लागून असलेल्या आंध्र प्रदेश, कर्नाटक इ. राज्यांमध्ये वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू केलेली असूनही राज्यशासन याबाबत कार्यवाही करीत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर विनोद तावडे, रामनाथ मोते मधुकर चव्हाण, पाशा पटेल, यांनी "राज्यातील सेवाखंडित हजेरी सहाय्यकांना सेवाज्येठतेनुसार शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने दि. 20 जून, 2008 रोजी माहिती मागवूनही अद्यापपर्यंत न्यायालयात सदर माहिती सादर केली नसणे, तसेच न्यायालयाने या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचे आदेश देऊनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, यांनी "मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पदोन्नत्या देताना भटक्या जमाती "क" प्रवर्गातील कनिष्ठ अभियंता उपलब्ध असूनही त्यास पदोन्नती न देता नियमबाह्यपणे इतर उमेदवारास पदोन्नती देण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री व्ही.यू.डायगव्हाणे, यांनी "राज्यातील एम.सी.व्ही.सी. व हिलसी अभ्यासक्रमाकडील शिक्षक व निदेशकांच्या अनेक मागण्या प्रलंबित असणे, फुल टाईम इन्स्ट्रक्टर हे पदनाम बदलून फूल टाईम टिचर पदनाम देणे, नेमणुकीच्या दिनांकापासून 12 वर्षानंतर वेतनश्रेणी लागू करणे इ. मागण्यांसाठी दि. 17 डिसेंबर, 2008 रोजी व्होकेशनल इन्स्ट्रक्टर्स टिचर्स असोशिएशन या संघटनेने नागपूर विधि मंडळावर आयोजित केलेले

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती .....**

आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, यांनी "महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट 1950 अन्वये नोंदणीकरिता गेली सुमारे 51 वर्षे केंद्रशासन, राज्यशासन, महानगरपालिका, विविध संस्था यांच्याकडून कोट्यवधी रुपयांचे अनुदान वेगवेगळया स्पर्धांसाठी खर्च करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, यांनी "कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील माळे फाट्याजवळ दि. 20.2.2008 रोजी शेतामध्ये गोळी लागल्यामुळे भास्कर भालचंद्र ठाकरे हे जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्युमुखी होणे, त्यांच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त होऊनही पोलिसांनी योग्य ती कारवाई न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, ही घटना होऊन बराच कालावधी उलटलेला आहे आणि अधिवेशन लवकरात लवकर संपण्याची चिन्हे असल्याचे कळते म्हणून हे निवेदन लवकर करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मी विनंती करते.

**उपसभापती** : ठीक आहे, पुढील दोन दिवसातच शासनाने निवेदन करावे, असा मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर, यांनी "राज्यातील शाळांना सन 1998-99 पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिल्यामुळे सदर शाळांमध्ये शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना इ.बी.सी. शिष्यवृत्ती, मोफत पुस्तके, शालेय पोषण आहार इ. सवलती न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाच्या कालव्याच्या दुरुस्तीमध्ये झालेला अपहार

**मु.शी.**: ठाणे जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाच्या कालव्याच्या दुरुस्तीमध्ये झालेला अपहार याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील सूर्या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या डाव्या आणि उजव्या कालव्याच्या लघु पाटबंधारेच्या कामात अधिकारी आणि ठेकेदार यांनी संगनमत करुन कागदोपत्री बोगस कामे दाखवून सुमारे 10 कोटींचा अपहार करुन शासनाची दिशाभूल करण्याचा केलेला प्रयत्न. या सर्व कामांची लाचलुचपत प्रतिबंधक खात्यातर्फे सखोल चौकशी करण्याची कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केलेली मागणी, भ्रष्टाचार लपविण्यासाठी सूर्या प्रकल्पाचे सुर्यानगर येथील कार्यालय बंद करुन ते वाशिंद येथे हलविण्याचा निर्णय जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेणे, कार्यालय वाशिंदला हलविल्याने स्थानिक कर्मचाऱ्यांवर बेकार होण्याची पाळी निर्माण होणे, तसेच काही ठेकेदार सूर्या प्रकल्पातील अधिकाऱ्याला हाताशी धरुन बोगस अंदाजपत्रक तयार करुन कागदोपत्री बोगस कामे दाखवुन बिलाची मागणी करीत असल्यामुळे संपुर्ण ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : महोदय, सूर्या हा ठाणे जिल्ह्यातील अत्यंत महत्वपूर्ण प्रकल्प असून या प्रकल्पात अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अपहार झालेला आहे. यासंदर्भात कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व आमदारांनी सुध्दा तक्रार केली आहे. पावसाळयानंतर कालव्याच्या दुरुस्तीचे जे काम झालेले आहे त्यात हयगय झालेली असून केवळ सिमेंटचे पाणी वापरुन काम केल्याचे दाखविण्यात आले व संबंधित कामाची बिले काढण्यात आली. यात मूळात छाननीच्या निष्कर्षाच्या आधारे महामंडळाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आदेश असतानाही कार्यकारी अभियंत्यांनी या महामंडळाच्या आदेशाचे उल्लंघन करुन सदर देयके अदा केल्यामुळे त्या कार्यकारी अभियंत्यांना निलंबित करण्यात आले. यासंबंधी चौकशी पथक सुध्दा नेमण्यात आले परंतु अजुन किती रकमेची देयके दिलेली आहेत यासंबंधीची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. तसेच कालव्याच्या दुरुस्तीच्या कामात खरोखरच टेंडर्स काढण्यात आले होते काय ? कारण आमच्या माहितीप्रमाणे दुरुस्तीचे काम परस्पर ठेकेदारांना देण्यात आले व टेंडर काढण्यात आले नाही, हे खरे आहे काय ? त्याचबरोबर प्राथमिक चौकशीत देखील हे सिध्द झाले आणि कार्यकारी अभियंत्यांना निलंबित करण्यात आले याचाच अर्थ यामध्ये अपहार मोठया प्रमाणात झाला आहे. त्यासंबंधीची सखोल चौकशी व तपासणीचा निर्णय झालेला आहे म्हणून या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टेड केले काय ? आणि ही रक्कम संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून वसूल करण्यात येणार काय ? आणि चौकशी एक महिन्यात पूर्ण करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे. आनंद ठाकूर या कोकण पाटबंधारे मंडळाचे उपाध्यक्षांनीच याप्रकारची तक्रार केलेली असून ही तक्रार केल्या केल्या फ्रेबुवारी 2008 मध्ये 1975 निविदाच्या देयकांकरिता साधारणत: 18.66 कोटी रुपये केआयडीसीला प्राप्त झाले होते त्यापैकी साधारणत: 6.52 कोटी रुपये देण्यात आले होते. या तक्रारीची त्वरित नोंद जलसंपदा विभागाने घेतली तसेच संबंधित विभागाचे आमदार श्री. घोडा साहेब तसेच श्री. आनंद ठाकूर यांची बैठक घेण्यात तसेच वरिष्ठ अधिका-यांनाही सर्व कामाची तपासणी करण्याच्या संदर्भात ताबडतोब सूचना दिल्या. ही तपासणी केल्यानंतर 26.6.2008 मध्ये 175 कामांची तपासणी करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांची 10 पथके नेमली. पथकांची नेमणूक करीत असतांना आमच्या असे लक्षात आले की, ज्या काही त्रुटी राहिलेल्या आहेत त्या तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. कांबळे यांच्याकडून झालेल्या असल्यामुळे 29.7.2008 रोजी शासनाने श्री. कांबळे यांना निलंबित केले. आतापर्यंत 10 पथकांनी प्रत्यक्ष तपासणी करुन अधिक्षक अभियंता, ठाणे यांच्याकडे 24.11.2008 रोजी अहवाल सादर केला. 11.12.2008 रोजी अधिक्षक अभियंत्यांनी तो अहवाल मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. हा अहवाल आता मुख्य अभियंत्याकडून शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर होईल. या कामामध्ये जे कोणी अधिकारी आणि ठेकेदार दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. दोषी अधिका-यांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल परंतु ज्या ठेकेदारांनी संगनमत करुन हे कृत्य केलेले आहे त्यांना ब्लॅकलिस्ट केले जाईल या ठेकेदारांना कोकण विभाग डेव्हलपमेंटचीच कामे मिळणार नसून जलसंपदा विभागाच्या पाचही महामंडळात तसेच शासनाचे कोणतेही काम या ठेकेदाराना दिले जाणार नाही अशी खबरदारी निश्चितपणे घेतली जाईल. यामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न जलसंपदा विभाग करणार नाही. या प्रश्नामध्ये माननीय उपाध्यक्षांचे लक्ष असून या प्रकरणात मी जातीने लक्ष घातलेले आहे. परंतु अशा प्रकारची घटना पुन्हा होणार नाही यासंदर्भातील कारवाई निश्चितपणे विभागाकडून केली जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बांधकामापेक्षा त्या ठिकाणी आस्थापनावर जास्त खर्च झालेला आहे. बांधकामापेक्षा त्या ठिकाणी आस्थापनेवर जास्त खर्च झालेला आहे ही बाब अकाऊंट डिपार्टमेंटच्या लक्षात आली नव्हती काय? या प्रकरणात किती अधिकारी जबाबदार आहेत व त्या अधिका-यांचा दर्जा काय आहे? विभाग अधिका-यांवर कारवाई करीत असतांना त्या अधिका-यांच्या हातामध्ये कोणती कामे आहेत?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या ठिकाणी बांधकामापेक्षा आस्थापनेवर जास्त खर्च झालेला आहे. संपूर्ण राज्यामध्ये वेगवेगळया महामंडळामध्ये किती निधी उपलब्ध होतो त्यावर खर्च होत असतो. काही ठिकाणी आस्थापनेचा खर्च कमी होतो व ठिकाणी जास्त निधी प्राप्त झालेला असल्यामुळे खर्चही जास्त होते. आमच्या असे लक्षात आले आहे की, येथील बरीचशी कामे उरकण्यात आलेली आहेत. पूर्वी त्या ठिकाणी आस्थापनेसाठी जो काही स्टाफ ठेवलेला आहे त्या स्टाफच्या संख्येच्या प्रमाणात त्यांना काम मिळत नाही असे आमच्या ज्यावेळेस लक्षात आले त्यावेळेस अमरावती विभाग, नागपूर विभाग तसेच विदर्भातील जे विभाग आहेत त्यांच्याकडे पाच विभाग स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्टाफचे स्थलांतर करीत असतांना तेथील खालचे जे कर्मचारी आहेत त्यांच्यावर बेकारीची वेळ येणार नाही याची खबरदारी आपण घेतलेली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.......

कोकण विभागात जेथे रिक्त जागा असतील त्याठिकाणी त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. वर्ग-3 आणि वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांना कोकण प्रदेशातील रिक्त पदावंर नियुक्ती करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना नागपूर विभागातील विशेषत: वाशिम जिल्ह्यात उप विभागीय अधिकाऱ्यांची गरज होती म्हणून त्याठिकाणी बदली करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला की या अधिकाऱ्यांकडे काही कामे ठेवली आहेत काय, त्याबाबत सांगू इच्छितो की, ही चौकशी होत असताना त्यांच्याकडे जास्तीची कामे दिलेली नाहीत. या संदर्भात चीफ इंजिनिअर आणि जलसंपदा विभागाकडे या महिन्यात अहवाल येण्याची शक्यता आहे. तेव्हा हा अहवाल येईलपर्यंत त्या अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारचे काम देण्यात आलेले नाही.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी क्रमांक 2 संबंधी</u>**

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात आली आहे. आता मी पुढील लक्षवेधी सूचना घेत आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील उत्तर देण्यासाठी संबंधित विभागाचे मंत्री किंवा राज्य मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण ठिकाणी अधिवेशन घेतो ते ठरल्याप्रमाणे पूर्ण काळ चालत नाही. सभागृहात संबंधित विषयाचे मंत्री उपस्थित नाहीत ही बाब बरोबर नाही...

**उपसभापती** : याठिकाणी मत्स्य व्यवसाय विभागाचे मंत्री श्री.रविशेठ पाटील आणि राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यापैकी कोणीही सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांना सभागृहात बोलावून घ्यावे.

आता मी पुढील लक्षवेधी सूचना घेत आहे.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :सन 1991 ते 1999 या कालाखंडात व त्यानंतर सुध्दा नेमणुका इ ाालेल्या अधिव्याख्यांतांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा घेतलेला निर्णय

**मु. शी.** :सन 1991 ते 1999 या कालाखंडात व त्यानंतरसुध्दा नेमणुका इ ाालेल्या अधिव्याख्यातांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन 1991 ते 1999 या कालखंडामध्ये महाराष्ट्रात नेट-सेटची पात्रता कायद्याने लागू केलेली नसल्याने त्यावेळच्या पात्रतेनुसार झालेल्या नेमणुका या बेकायदेशीर नसून त्या अधिव्याख्यात्यांना 5 वर्षाची सेवा झालेली असल्यास नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा धोरणात्मक निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने आपल्या दिनांक 3 व 4 सप्टेंबर, 2008 च्या बैठकीत घेणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या दिनांक 7 व 8 ऑक्टोबर, 2008 च्या बैठकीत तसा धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील अशा 637 शिक्षकांच्या बाबतीत दिनांक 5 नोव्हेंबर, 2008 च्या एका पत्रान्वये (No. F-1/2008 (PS)) विद्यापीठाला कळविणे, दिनांक 27 नोव्हेंबर, 2008 रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08, 4486/2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणी दिनांक 5 नोव्हेंबर, 2008 च्या पत्राचा उल्लेख करुन समान प्रकरणी समान निर्णय घेण्याचा दिलेला निर्णय, गेले अनेक वर्षे पडून असलेल्या या प्रश्नाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर सुध्दा अशा शिक्षकांच्या स्थाननिश्चितीच्या बाबतीत शासनाकडून शासननिर्णय निर्गमित न झाल्यामुळे या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी जे निवेदन करण्यात आलेले आहे त्याबाबत मी सुरुवातीलाच मनापासून समाधान व्यक्त करतो. दिनांक 22.12.1995 च्या शासन निर्णयानुसार तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात आल्या होत्या असे निवेदनात म्हटले आहे. ही गोष्ट खरी आहे मात्र ही अट दिनांक 18 ऑक्टोबर 2001 च्या शासन निर्णयाने रद्द करण्यात आलेली आहे याचा उल्लेख निवेदनात नाही. ही एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो. दिनांक 18 ऑक्टोबर, 2001 च्या शासन निर्णयात स्पष्ट म्हटले आहे की, "दिनांक 22.12.1995 रोजी जे आदेश काढण्यात आलेले आहेत ते रद्द करण्यात येत आहेत. दिनांक 19.9.1991 ते 11.12.1999 या कालावधीत त्यावेळच्या निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा खंडीत होणार नाहीत" असे स्पष्ट म्हटले आहे. या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झालेला आहे. या संदर्भात तत्कालीन माननीय मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी उत्तर दिले होते. ते मी वाचून दाखवित नाही. परंतु त्यातील काही तपशील मी रेकॉर्डवर घेऊ इच्छितो. मंगळवार, दिनांक 11 डिसेंबर 2001 रोजीचा ता.प्र.क्र.19521 क्रमांकाचे उत्तर आहे. या रेग्युलेशनचे स्वरुप काय आहे हे सर्वोच्च न्यालयाने निश्चित केले ते त्यामध्ये आलेले आहे ते मंत्रिमहोदयांनी पहावे. ही दुसरी गोष्टी. 1991 ते 1999 पर्यंतच्या अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झालेल्यांना महाराष्ट्रात नेट-सेट कायद्याने बंधनकारक करण्यात आले नव्हते. प्राध्यापक पदासाठी पात्रता ठरविण्याचे तीन मार्ग आहेत. एक म्हणजे विद्यापीठाने स्टॅटयूट करणे, दुसरे म्हणजे त्याऐवजी व्हाईस चॅन्सलरचे डायरेक्टीव्हज किंवा तिसरे म्हणजे शासनाने स्टॅन्डर्ड कोड करणे. या तीनही गोष्टी 1999 पर्यंत झालेल्या नव्हत्या. म्हणून 1991 ते 1999 च्या बाबतीत ज्या नागपूर विद्यापीठाचे प्रकरण आपल्यासमोर आहे त्या नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला स्पष्टपणे असे कळविले की, आमच्याकडे नेट-सेट बंधनकारक झालेले नव्हते त्यामुळे या नियुक्त्या झालेल्या आहेत व त्या नियमित आहेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

दिनांक 17 डिसेंबर 2002 च्या पत्रान्वये नागपूर विद्यापीठाच्या कुल सचिवांनी यु.जी.सी. ला असे कळविलेले होते की, "Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument, hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999 in this university area. Advertisements were approved, Selection were made approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100 % salary grants were paid by the State Government in respect of such lawfully recruited teachers year after years and continued to be so paid even today." त्या पत्रात स्पष्टपणे असे म्हटलेले होते की, या ॲडव्हॉक अपाईन्टमेन्टस नसून त्या रेग्युलर नेमणुका आहेत यु.जी.सी.च्या पत्राप्रमाणे आता आपण पुढील कार्यवाही करावी .त्यात काही चूक नाही परंतु . 1991 ते 1999 या कालावधीत ज्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत त्यांच्या नेमणूका रेग्युलर आहेत पाहिजे तर आपण याबाबतीत विद्यापीठाला विचारुन घ्यावे केवळ मी असे म्हणतो अशातला भाग नाही. 1999 नंतर ज्या नेमणुका करण्यात आल्या आहेत त्यांच्या नेमणुका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाप्रमाणे रेग्युलराईज करुन घ्याव्या लागणार आहे. मी माहितीसाठी या दोन तीन गोष्टींचा येथे उल्लेख केला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयाना एक दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यातील पहिला प्रश्न असा आहे की, या संदर्भात शासन निर्णय काढावा लागणार आहे त्याशिवाय पुढे काम सरकत नाही. तेव्हा हा शासन निर्णय किती दिवसात काढला जाणार आहे ? सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात ही बाब असल्यामुळे अनेक कोर्ट कचे-यांची प्रकरणे झालीत, कटेम्प्टच्या केसेस झालेल्या आहेत. या संदर्भात आता यु.जी.सी ने निर्णय दिला आहे आणि त्या बाबतीत शासनाने योग्य कार्यवाही सुरु केलेली आहे. मला असे विचारावयाचे आहे की या सबंधीचा शासन निर्णय किती दिवसात काढण्यात येणार आहे ? हे एक व त्यानतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 1991 ते 1999 या कालावधीमध्ये रेग्युलर अपाईन्टमेन्टस करण्यात आल्या होत्या त्या ॲडव्हॉक पध्दतीने करण्यात आल्या नव्हत्या परंतु 1999 नंतर ज्यांच्या ॲडव्हॉक पध्दतीने अपॉईन्टमेन्टस केलेल्या आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

त्यांचे युजीसीच्या निर्णयाप्रमाणे रेग्युलरायझेशन करुन घ्यावे लागणार तेव्हा ही प्रोसेस किती दिवसात पार पाडण्यात येईल ? त्यानंतर माझा तिसरा प्रश्न असा आहे की, विद्यापीठाच्या प्लेसमेन्ट कमिटीची बैठक होऊन कॅसचे असेसमेन्ट होऊन प्रत्यक्षात प्लेसमेन्ट होण्यासाठी किती वेळ लागेल याबाबतीत आपण टाईम बाऊन्ड कार्यक्रम सांगितला म्हणजे मग त्या प्रमाणे संबंधित अधिकारी कामास लागतील. तेव्हा मी विचारलेल्या तीन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी अधिव्याख्यात्यांच्या पदांच्या संदर्भात लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने प्रश्न विचारले आहेत. अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा 1991 ला कंपलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा स्टॅटयूटमध्ये किंवा व्हाईस चॅन्सलरच्या डायरेक्शन्समध्ये किंवा गव्हर्नमेन्टच्या कोड मध्ये यासबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही दरम्यानच्या काळात काही नेमणुका करण्यात आल्या होत्या त्या नेमणुका ॲडव्हॉक म्हणजे तदर्थ स्वरुपाच्या होत्या .सभापती महोदय, राज्यामधील 6 हजार अधिव्याख्याता पदाच्या संदर्भात हा प्रश्न असून त्यापैकी नागपूर विद्यापीठातील 637 अधिव्याख्याता पदाच्या संदर्भातील हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात दरम्यानच्या काळात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता आणि त्या निर्णयाच्या अनुषंगाने यु.जी.सी.ने नागपूर विद्यापीठाला पत्र पाठविले असून त्यामध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता की, ज्यांच्या नेमणूका विद्यापीठाने नेमलेली जी समिती आहे त्या समितीच्या मार्फत केल्या आहेत किंवा कॉन्स्टिटयुशनल रिझर्व्हेशन योग्य प्रकारे पाळले जाऊन ज्याच्या नेमणुंका केल्या आहेत किंवा ज्या अधिव्याख्यात्यांचा कार्य काळ पाच वर्षाचा झाला असेल अशा अधिव्याख्यातांना नियमित करण्यात यावे. अशा प्रकारे यु.जी.सी.ने पत्र पाठविलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यानी जे तीन प्रश्न विचारलेला आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की ,या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी सपंण्याच्या अगोदर हा जीआर काढण्यात येईल जर 24 तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी आर काढण्यात येईल. आपला अधिवेशनाचा कालावधी त्या दरम्यानचा राहील असे वाटते तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदरचा हा जीआर काढण्यात येईल त्याचबरोबर अधिव्याख्यातांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ...

नियमित करण्याचे विद्यापीठाचे काम सुरु आहे. विद्यापीठाला सुध्दा सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील तसेच हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/KTG/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 14:55

श्री. राजेश टोपे ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, यांचे स्थान निश्चिती करणे हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे आणि ते कॅसचे काम आहे आणि हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकार हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढ कॅसचे काम दोन महिने असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे त्याबद्दल जरूर मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु त्याच बरोबर महाराष्ट्रातील इतर जी विद्यापीठे आहेत उदा. औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत तसेच नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत असे प्राध्यापकांचे प्रस्ताव युजीसीकडे पाठविण्यात आले होते आणि त्यांना देखील युजीसीने एक्झम्प्शन दिले आहे. परंतु त्या त्या विद्यापीठांनी आतापर्यंत त्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तेव्हा आता जो निर्णय आपण दिला आहे तो निर्णय महाराष्ट्रात ज्यांना ज्यांना युजीसीन एक्झम्शन दिलेले आहे त्या सगळ्या प्राध्यापकांना आणि त्या सगळ्या विद्यापीठांना लागू राहणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरातच सांगितले आहे की, सहा हजार अधिव्याख्यात्यांच्या पदांच्याबाबतीतील हा प्रश्न आहे. तेव्हा ज्या ज्या विद्यापीठांमध्ये हे प्रश्न आहेत, तदर्थ स्वरूपाची नेमणूक करण्यात आलेली आहे त्या सगळ्या विद्यापीठांना आता आम्ही नागपूर विद्यापीठाला ज्या सूचना देणार आहोत, .. एक महिन्याच्या कालावधीत त्यांनी त्यांच्याकडील अधिव्याख्याते नियमित करण्याचे काम आणि त्यापुढील दोन महिन्याच्या कालखंडामध्ये कॅसचे काम म्हणजेच त्यांच्या स्थाननिश्चितीचे काम पूर्ण करण्याच्या सूचना आम्ही देणार आहोत त्याच इतर सगळ्या विद्यापीठांनाही देण्यात येतील.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, नामदार मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. मात्र त्यात मला एकच सांगावयाचे आहे की, ज्यांचे आपण रेग्युलरायझेशन करायचे त्यातील 1991 ते 1999 हा एक वेगळा भाग आहे. आपण त्या विद्यापीठाकडून त्याबाबत माहिती घ्या. ते जर रेग्युलर असतील तर पुन्हा ते रेग्युलर करण्याचा प्रश्न येत नाही. पण रेग्युलर

...... एचएच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख .....

नसतील तर त्यांना तदर्थचे रेग्युलर करून घेण्याची प्रोसेस आपण पूर्ण करा अशा सूचना देऊन त्या विद्यापीठांकडून 91 ते 99 या काळातील त्यांच्याकडील नेमकी परिस्थिती काय आहे याची विचारणा त्यांच्याकडे करावी. ती आपण कराल काय ?

श्री. राजेश टोप : होय.

***

................ एचएच 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/KTG/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 14:55

पृ.शी. : मच्छिमारांना मच्छिमारीसाठी लागणारे पेट्रोल सबसिडी दराने मिळणे.

मु.शी. : मच्छिमारांना मच्छिमारीसाठी लागणारे पेट्रोल सबसिडी दराने मिळणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करते.

" रत्नागिरी येथील मच्छिमारांना पेट्रोलपंपावरील विक्री दरापेक्षा अधिक दराने डिझेलची विक्री केली जात असल्याचे दिनांक 3.10.2008 रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, डिझेल पुरवठा करणाऱ्या काही मच्छिमार संस्थांमध्ये डिझेल घोटाळा झाल्याचे उघडकीस येणे, तद्नंतर शासनाने मच्छिमारांना पेट्रोलपंपावरील दरानेच मच्छिमारांना डिझेलचे वितरण करुन सवतलीच्या दराने देण्याचा निर्णय घेण्यात येणे, मच्छिमारांना बोटीसाठी मासिक कोटा 3.500 लिटर्स शासनाकडून ठरवून देण्यात येणे, मच्छिमारांची आर्थिक परिस्थिती बिकट असताना दर महिन्याला मच्छिमारांना डिझेलसाठी जादा पैसे मोजावे लागणे, मच्छिमार संस्था व मच्छिमार नेतेमंडळी मच्छिमारांची करीत असलेली फसवणूक या फसवणुकी संदर्भात शासन पुरवठादार कंपनी जबाबदार असणे याबाबत चौकशी करण्याची गरज, पेट्रोल पंपाप्रमाणेच मच्छिमारांना डिझेलचा दर मिळावा या मागण्या मच्छिमारांकडून होत असणे, याबाबत शासनाने त्वरित चौकशी करुन करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. हसन मुश्रीफ (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : महोदय, या लक्षवेधी सुचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवततो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(पेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

HH 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा. मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मच्छिमारी व्यवसाय होत असतो. हा व्यवसाय करणारा जो मच्छिमार समाज आहे त्यांच्या उदरनिर्वाहाचे मच्छिमारी हेच एकमेव साधन आहे. हा व्यवसाय करीत असताना त्यांना अनेक गोष्टींना, अडचणींना सामोरे जावे लागत असते. अशा वेळी शासन केवळ आम्ही हे पॅकेज त्यांच्या साठी केलेले आहे, आम्ही त्यांना मदत करणार आहोत, अनुदान दणार ाहोत अस सांगते. परंतु प्रत्यक्षात तेथील कोणाही मच्छिमाराला असे अनुदान वा पॅकेजचा लाभ मिळत नाही, मिळालेला नाही. परिणामतः या स्पर्धेच्या युगामध्ये हा जो गरीब मच्छिमार आहे ते सध्याच्या यांत्रिक बोटी वा अन्य अद्यावत साधने असतील त्यांच्यापुढे टिकू शकत नाही. त्यामुळेच गेल्या वर्षी या मच्छिमारांना यासाठी एक मोठे आंदोलन उभे करावे लागले आणि त्यावेळस त्यांना सांगण्यात आले की, शासन त्यांना लागणाऱ्या पेट्रोलच्या दरामध्ये सबसिडी देईल. सभापती महोदय, मी या संदर्भात माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छिते की, सन 2008-09 मध्ये आपण 100 कोटीची तरतूद या मच्छिमारांसाठी केलेली आहे तर ही केवळ त्यांना मिळणार आहे आणि त्यांच्यापर्यंत या गाष्टी केव्हा जाणार आहेत ?

( यानंतर श्री. सरफरे ..... आयआय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अपुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधिरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..................................................................................................................................................

......................................................................................................................................

.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, मच्छिमारांना इतक्या मोठया प्रमाणात सवलती देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. सुरुवातीला आपण डिझेलचा कोटा देत होतो, ती पध्दत 2005 मध्ये बंद करण्यात आली. आता आपण व्याजाच्या स्वरुपामध्ये परतावा देऊ लागलो आहोत. या परताव्याच्या स्वरुपात दरवर्षी 100 कोटी मच्छिमारांना दिले जातात. त्याशिवाय माश्यांचा दुष्काळ जाहीर झाला म्हणून 31 कोटींचे पॅकेज या शासनाने मच्छिमारांना दिले. ज्या सहकारी संस्थाच्या पेट्रोलपंपामधून घेण्यात येणाऱ्या तेलावर प्रतिलिटर 70 ते 80 पैसे सेवाशुल्क आकारण्यात येते, हे चुकीचे आहे. ज्या सहकारी संस्थांचे पेट्रोलपंप अशाप्रकारचे सेवाशुल्क घेत आहेत....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आता मंत्रिमहोदयांनी शब्द वापरल्यामुळे मी त्यांना विचारु इच्छितो की, माशांचा दुष्काळ जाहीर करावा अशी आम्ही मागणी केली होती. तरीही शासनाने दुष्काळ जाहीर केला नाही. आता मंत्रिमहोदय "दुष्काळ जाहीर झाला" असे म्हणाले आहेत. तेव्हा मला त्यांना विचारावयाचे आहे की, माशांचा दुष्काळ जाहीर झाला आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती देसाई यांनी शासनाने मच्छिमारांना काहीही दिले नाही असे म्हटले. त्यामुळे त्यासंबंधात उत्तर देत असतांना आतापर्यंत कोणत्याही देशात किंवा राज्यात अशाप्रकारे मच्छिमारांना सवलत दिली जात नाही ती आपण देत आहोत. आपण मच्छिमारांना डिझेलसाठी अनुदान देत आहोत. माननीय सदस्यांनी दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी केली होती. परंतु शासनाने दुष्काळ जाहीर न करता त्यांच्यासाठी 31 कोटींचे पॅकेज दिले होते. अशाप्रकारे मच्छिमारांना 31 कोटींचे पॅकेज देणारे हे पहिले लोकशाही आघाडीचे शासन आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये म्हटल्याप्रमाणे ज्या सहकारी संस्थांचे पेट्रोलपंप प्रत्येक लिटरला 70 ते 80 पैसे सेवाशुल्क घेत आहेत त्या सर्व संस्थांना सेवाशुल्क घेण्यास ताबडतोब बंदी घातली जाईल. आणि अशा संस्थांवर प्रशासक नेमण्याची कारवाई शासन करील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मच्छिमारांच्या सोसायटयांना जो डिझेलचा कोटा ठरवून दिला आहे त्या व्यतिरिक्त जर त्यांना डिझेल पाहिजे असेल तर त्यांना व्याज भरावे लागते. तेव्हा सोसायटयांची अडचण माननीय सदस्यांनी समजून घेतली नाही. ठरवून दिलेल्या कोटयाव्यतिरिक्त डिझेल घेतले तर त्यांना व्याज भरावे लागते. त्याचा परतावा आपण देणार काय? परतावा देण्याची अशी पध्दत शासनाने सुरु केली आहे काय? किती संस्थांच्या होडयांची नोंदणी झाली आहे, आणि त्या संस्थांना किती कोटा ठरवून दिला आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : शासनाने एका सिलेंडरसाठी 3.6 किलोलीटर आणि 6 सिलेडरसाठी 35.7 किलोलीटर डिझेलचा कोटा मंजूर केला आहे. हा कोटा त्यांनी पहिल्यांदा घेतला पाहिजे त्यानंतर त्यांना शासन परतावा देते. अशाप्रकारे सिलेंडरसाठी कोटा निश्चित झाला आहे. यापेक्षा जास्त डिझेल लागले तर त्यांनी स्वत: घालावयाचे आहे. एकूण संस्थांची संख्या 376 आहे आणि यांत्रिक नौकांची संख्या 1906 आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या रत्नागिरी जिल्हयामध्ये एकूण सोसायटयांची संख्या किती आहे? त्या संस्थांच्या होडयांची संख्या किती आहे? त्या होडया किती सिलेंडरच्या आहेत. उदा. एक, तीन आणि सहा सिलेंडरच्या किती होडया आहेत?

श्री. हसन मुश्रीफ : रत्नागिरी जिल्हयात एकूण 1906 नौका आहेत. त्यामध्ये 1 सिलेंडरच्या 355, 2 सिलेंडरच्या 460, 3 सिलेंडरच्या 30, 4 सिलेंडरच्या 61, आणि 5 सिलेंडरच्या 1040 अशा एकूण 1906 नौका आहेत. या जिल्हयात एकूण 42 संस्था आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या शिवमंदिराच्या देखभाल व दुरुस्तीकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष

**मु. शी.** : सिंधुदुर्ग किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या शिवमंदिराच्या देखभाल व दुरुस्तीकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते

" छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंधुदुर्ग किल्ल्यातील अव्दितीय असे स्मारक आजही अंधाराच्या खाईत असून एकीकडे शासन मुंबईच्या समुद्रात दोनशे कोटी रुपये खर्चून शिवरायांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारत आहे. परंतु सिंधुदुर्ग किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या शिवमंदिराकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष केले असून या मंदिराला शासनाकडून प्रतिमहा फक्त 416 रुपयांची मदत केली जात आहे. मराठी साम वाहिनीने आपल्या पहिल्या बातमीपत्रात या ऐतिहासिक स्मारकांच्या दुर्लक्षाचे वृत्त देऊन शासनाकडून देखभालीसाठी निधी मिळत नसल्याने महाराष्ट्रातील तमाम शिवप्रेमी नागरिकात निर्माण झालेली संतप्त प्रतिक्रया, पावसाळ्यात अनेक ठिकाणी मंदिरात गळती होणे एवढेच नव्हे तर महाराजांच्या मूर्तीभावती चक्क पाणी साचते. शिवमंदिराच्या प्रतिमहा खर्च लाखाच्या घरात असून शासनाकडून निधी मिळत नसल्याने तेथील विश्वस्तांना मंदिर खर्च कसा चालवावा याबद्दल चिंता पडली आहे. वरील विदारक वस्तुस्तिती लक्षात घेता शासनाने उपनिर्दिष्ट शिवमंदिरास तातडीने भरघोस मदत करण्याबाबत शासनाने घोषणा करावी, ही विनंती."

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये शिवछत्रपतींचे जे मंदिर आहे ते फार दुर्लक्षित स्वरुपामध्ये आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे ते पवित्र स्थान आहे. सिंधुदुर्गच्या शिवराजेश्वर ट्रस्टचे अध्यक्ष यांनी शासनाचे वारंवार लक्ष वेधले आहे. या मंदिरावरील खर्च काही लाखाच्या घरात असून शासनाकडून या मंदिराच्या व्यवस्थेसाठी फक्त 416 रुपये मदत मिळते. 'साम' या मराठी वाहिनीने ज्यावेळी 15 ऑगस्टला स्वत:च्या बातमीपत्राचे उद्‌घाटन केले तेव्हा 'शिवछत्रपतींचे मंदिर अनास्थेच्या अंधारात' याकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर वेगवेगळया प्रकारची आश्वासने जरी मिळाली असली तरी ठोस स्वरुपामध्ये मोठी पावले उचलून या मंदिराची व्यवस्था करण्यासाठी त्या मंदिराच्या देखरेखीचा खर्च वाढवून द्यावा. पावसाळ्यामध्ये त्या मंदिराला गळती लागते आणि शिवाजी महाराजांच्या मूर्तीच्या भोवती पाण्याचे तळे साचते. त्या ठिकाणी असलेला महाराजांचा पोषाख जिर्ण झालेला आहे. तेथील वीज पुरवठा खंडित होतो. मंदिरात कायम स्वरुपी वीज पुरवठा करण्याच्या बाबतीत व्यवस्था केली जाईल असे आश्वासन सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी देऊनही त्याची पूर्तता झालेली नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील आणि विशेषकरुन सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांकडून अनास्था चाललेली आहे. शिव छत्रपतींच्या मंदिराचा जिर्णोद्धार करुन त्या मंदिराची देखभाल चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत आणि ताबडतोब भरघोस मदतीची घोषणा करावी याकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

----

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

**उपसभापती** : विशेष उल्लेखाच्या एकूण 9 सूचना आलेल्या आहेत त्यापैकी 6 सूचना स्वीकारलेल्या आहेत. तरी सुध्दा मी आपल्याला संधी देईन.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्वी योजनेपासून वंचित ठेवण्यात येणे

**मु. शी.** : नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्वी योजनेपासून वंचित ठेवण्यात येणे याबाबत श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. या विशेष उल्लेखाव्दारे मी एका अतिशय महत्वाच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो.

" राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांना इतर शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थातील कर्मचारी व शिक्षकांना लागू असलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती योजनेपासून वंचित ठेवले असणे, कर्मचारी वर्गात भेदभाव निर्माण केला असणे, सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने या मागणीसाठी दिनांक 10 नोव्हेंबर, 2008 रोजी एक निवेदन पाठवून विधान भवन, नागपूर येथे आंदोलन करण्याचे कळविले आहे. या भेदभावपूर्वक निर्णयामुळे नगरपालिका व महानगरपालिकांच्या शिक्षकात असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे. या गंभीर मागणीकडे शासनाने लक्ष द्यावे यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

----

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खंडाळा येथील सिध्देश्वर पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी द्यावयाच्या अडीच एकर जमिनीसाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी अवलंबिलेले वेळकाढूपणाचे धोरण

**मु. शी.** : अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खंडाळा येथील सिध्देश्वर पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी द्यावयाच्या अडीच एकर जमिनीसाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी अवलंबिलेले वेळकाढूपणाचे धोरण याबाबत श्री. जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"अलिबाग (जि.रायगड) शहरापासून अवघ्या 8 किलोमीटर अंतरावर उंच डोंगरात सिध्देश्वर पर्यटन स्थळ आहे. खंडाळे बस थांब्यापासून अंदाजे दीड किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण जिल्हा परिषदेने केले आहे. उर्वरित रस्त्याचा भाग आणि सिध्देश्वर पर्यटन स्थळाचा परिसर वन खात्याच्या अखत्यारित येत असल्याने वन खात्याने जिल्हा परिषदेला पुढच्या रस्त्याचे डांबरीकरण करु न देणे, शिवाय डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या नदीवरील पूल आणि डोंगरावर पायऱ्या बांधण्यासही वन खात्याने हरकत घेतल्याने या पर्यटन स्थळाचा सर्वच विकास रखडणे, या डोंगरावर सिध्देश्वर मंदिर असून या मंदिरापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर शिवकालीन सागरगड किल्ला असणे, या पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी वन खात्याची अडीच एकर जमीन लागणार आहे. शासनाने त्याऐवजी वन खात्याला तेवढीच अन्य ठिकाणी जागा दिली असती तर हा प्रश्न केव्हाच संपला असता. परंतु वन खाते आणि महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांच्या वेळकाढूपणामुळे या पर्यटन स्थळाचा विकास रखडणे, तरी नवीन धोरणानुसार पर्यटन विकासाला चालना देणाऱ्या शासनाने याबाबत त्वरित कार्यवाही करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : बालिका वधू या मालिकेप्रमाणेच इतर वेगवेगळ्या वाहिन्यांवर सुरु असलेल्या अनेक मालिकांमधून बाल कलाकार काम करत असणे

**मु. शी.** : बालिका वधू या मालिकेप्रमाणेच इतर वेगवेगळ्या वाहिन्यांवर सुरु असलेल्या अनेक मालिकांमधून बाल कलाकार काम करत असणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"भारतातील बालविवाह प्रथा बंद करण्यासाठी त्या काळात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले आणि अनेक समाजसुधारकांनी योगदान दिले आहे. ब्रिटिशांनीही या प्रथेला विरोध करत बालविवाह प्रथेच्या विरोधात 1829 साली कायदा केला. परंतु सध्या कलर्स वाहिनीवर सुरु असलेल्या "बालिका वधू" या मालिकेतून बालविवाह प्रथेचे समर्थन आणि उदात्तीकरण करणाऱ्या दृश्यांचे प्रसारण केले जात आहे. तसेच दिवसातून तीन-चार वेळा ही मालिका प्रसारित केली जात असून प्रसारणादरम्यान केवळ "बालविवाह प्रथा कायद्याने गुन्हा आहे" अशी एक पट्टी दाखविली जाते.

"बालिका वधू" या मालिकेप्रमाणेच इतर वेगवेगळ्या वाहिन्यांवर सुरु असलेल्या अनेक मालिकांमधून बाल कलाकार काम करत असल्याचे सर्रास दिसून येते. बाल कामगार प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा 1986 अन्वये 14 वर्षाखालील कुठल्याही बालकाला एक दिवसात साडेचार तासांपेक्षा अधिक काम लावले जाऊ शकत नाही. पण आपल्या चॅनलचा टी.आर.पी. वाढविण्यासाठी मालिका निर्माते लहान मुलांचे बालपणच विकू लागले आहेत. अशा निर्मात्यांवर व चॅनेलवर त्वरित कठोर कार्यवाही करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच "बालिका वधू" सारख्या कार्यक्रमाचे प्रक्षेपण थांबवून अशा मालिकांवर बंदी आणण्यासाठी मी शासनाचे या विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधत आहे."

....6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

सभापती महोदय,आपल्या देशात बाल विवाहाला बंदी करणारा कायदा झालेला आहे. ब्रिटिशंच्या काळात बाल विवाहाला प्रतिबंध करण्यात आलेला आहे. राज राममोहन रॉय यांच्यापासून महात्मा फुले आणि इतर सुधारकांची मोठी परंपरा आपल्या देशाला आणि राज्याला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

असे असतानाही नवीन चॅनलचे फॅड वाढलेले आहे. एका नवीन चॅनलवर बालिका वधू ही मालिका सुरु आहे. ही मालिका बालविवाहाचे समर्थन करणारी आहे. ज्याप्रमाणे सिगरेटच्या पाकिटावर खालच्या बाजूला 'सिगरेट ओढणे हे शरीराला धोकादायक आहे' अशी टीप टाकलेली असते त्याप्रमाणे या मालिकेच्या सुरुवातीलाही 'बालविवाहाने बालपण हरवते, बालविवाह प्रथा कायद्याने गुन्हा आहे' अशाप्रकारची एक ओळ दाखविली जाते. पण ही संपूर्ण मालिका बालविवाहाचे समर्थन करणारी आहे अशाप्रकारचा तिचा आशय, चित्रिकरण व सादरीकरण आहे. लोकांना या मालिकेच्या बाजूने उभी करणारी आहे. हया मालिकेतील त्या लहान मुलीचे वय तेवढेच ठेवून ही मालिका वाढविण्याचे काम सुरु आहे. बालविवाह हा कायद्याने गुन्हा असल्यामुळे शासनाने याबाबत त्वरित पावले उचलली पाहिजेत. अनेक वाहिन्यांवर सुरु असलेल्या अनेक मालिकांमधून बालकलाकार वापरले जात आहेत. त्याबाबत मी माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधलेले आहे. परंतु ते पुरेसे ठरले नाही.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.कपिल पाटील : माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

डॉ.दीपक सावंत : चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून ते उभे आहेत.

श्री.कपिल पाटील : 'बालविवाहाने बालपण हरवते' अशाप्रकारची एक टीप टाकून या मालिकेचे प्रसारण सुरु आहे. या मालिकेचा आशय, चित्रिकरण, सादरीकरण बालविवाहाला उत्तेजन देणारे आणि अशा प्रथांचे उदात्तीकरण करणारे आहे. त्यामुळे या मालिकेला प्रतिबंध केला पाहिजे. अशाप्रकारच्या कोणत्याही मालिकांना प्रोत्साहन देता कामा नये, त्यांना विरोध केला पाहिजे, शासनाने याबाबत त्वरित कारवाई केली पाहिजे. मालिकांमध्ये बालकलाकरांचा वापर केला जात आहे. परंतु ठराविक वेळेपेक्षा अधिक त्यांचा मालिकेसाठी वापर केला जात आहे. त्यांना शिक्षणापासून दूर करुन करुन त्यांचा वापर होत आहे. या मुलांची सेवा घेता येते, परंतु 3 तासापेक्षा जास्त त्यांना व्यस्त ठेवता येत नाही. कारण त्यांना अभ्यासासाठी, विश्रांतीसाठी पुरेसा वेळ मिळणे आवश्यक असते. शासनाने या मालिकेवर तातडीने बंदी घालावी. अशी मी विशेष उल्लेख सूचनेद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : बालविवाहाचे दुष्परिणाम काय होतात ते बालिका वधू या मालिकेद्वारे दाखविले जात आहे. याचा अर्थ त्या मालिकेवर बंदी आणावी असा होत नाही.

**उपसभापती** : विशेष उल्लेखाच्या सूचनांवर कोणत्याही प्रकारची चर्चा होत नाही.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महिला व प्रसार माध्यमे हा विषय पत्रकारिता अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची होत असलेली मागणी

**मु. शी.** : महिला व प्रसार माध्यमे हा विषय पत्रकारिता अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची होत असलेली मागणी याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"देशामध्ये विकास प्रक्रियेत महिलांचा 50 टक्के वाटा आहे. तो वाटा सक्षमपणे उचलण्याची संधी महिलांना मिळवून दिली पाहिजे. त्यासाठी समाज प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. समाज प्रबोधन करण्याचे प्रभावी साधन ( अनेक साधनांपैकी ) प्रसार माध्यमे आहेत. त्यादृष्टीने अभ्यासक्रम तयार करावा ही मागणी वारंवार महिला संघटनांनी केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा केला, त्यामध्येही मागणी केली. समाज मन बदलण्याच्या या प्रक्रियेमध्ये प्रसार माध्यमांचा वापर करण्यासाठी महिला व माध्यमे हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा ही मागणी व त्यावर शासनाने करावयाची उपाययोजना या अत्यंत निकडीच्या विषयावर याठिकाणी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, सामाजिक बांधिलकी म्हणून शासनाने पत्रकारिता या अभ्यासक्रमामध्ये महिला व माध्यमे या विषयाचा समावेश करावा अशी विनंती मी याठिकाणी करीत आहे.

---------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील प्रकाश खानविलकर यांच्या विधवा पत्नीस मिळणा-या देयकाची रक्कम न मिळणे

**मु. शी.** : रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील प्रकाश खानविलकर यांच्या विधवा पत्नीस मिळणा-या देययकाची रक्कम न मिळणे याबाबत श्री.संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात कार्यरत असणा-या प्रकाश रघुनाथ खानविलकर (वरिष्ठ सहायक) यांचे पाच वर्षापूर्वी निधन झाले. त्यांची विधवा पत्नी पतीच्या निधनानंतर मिळणा-या देयकाची रक्कम मिळावी म्हणून गेली पाच वर्षे सातत्याने जिल्हा परिषदेमध्ये खेटे धालीत आहे. याबाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधींनीसुध्दा रत्नागिरी जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा केलेला आहे. परंतु रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या उदासिन धोरणामुळे पती निधनानंतर 5 वर्षे होऊनही एका विधवेस देयके मिळत नसल्याने तिची उपासमार होत आहे. तसेच पैशाअभावी मुलांचे शिक्षण करणेही अवघड झालेले आहे. पैशाअभावी समाजात होणारी अवहेलना यामुळे सदर विधवेच्या मनात आत्महत्येचे विचार येऊन तसे पत्र तिने जिल्हा परिषदेला दिलेले आहे. याप्रकरणी अद्यापपर्यन्त कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे हे प्रकरण मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

----

**पृ. शी.** : मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र न्यायालय व पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र न्यायालय व पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता याबाबत श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मीरा-भाईंदर क्षेत्राचा विस्तार विचारात घेता या भागासाठी स्वतंत्र्य न्यायालय व पोलीस ठाणे निर्माण होण्यासाठी नागरिकांची व महानगरपालिकेची अनेक दिवसांची मागणी आहे. नोव्हेंबर 2008च्या महासभेमध्ये या संबधी महानगरपालिकेने ठराव संमत केला आहे. या भागाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून पालिकास्तरावरील न्यायालयीन गुन्हे दाखल केल्यावर अनेक खटले प्रलंबित आहेत. पालिकास्तरावरुन दाखल होणारे एमआरटीपी, विनापरवाना चालणारे व्यवसाय, उपकराची नोंदणी न करणारे व्यावसायिक, अनधिकृत नळ जोडण्या इत्यादी प्रकरणात त्या त्या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करावे लागतात. अतिक्रमणे हटविताना लागणारा पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने प्रशासनाला कारवाई करण्यात अडचणी येतात. या सर्व बाबींचा विचार करता मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे व न्यायालय मंजूर होण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा आणि मीरा-भाईंदरवासियांना दिलासा द्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया जिल्हयातील सडक अर्जुनी तालुक्यात रॉकेल व
स्वस्त धान्य दुकान प्रकरणात झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात रॉकेल व
स्वस्त धान्य दुकान प्रकरणात झालेला भ्रष्टाचार
याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सडक अर्जुनी तालुक्यात (जि. गोंदिया) रॉकेल व स्वस्त धान्य दुकान प्रकरणात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे.सदर प्रकरणात निर्दोष आढळलेल्या स्वस्त धान्य दुयकानदारांचा परवाना रद्द करणे, अशा अनेक तक्रारी शासन दरबारी मागील कित्येक वर्षापासून प्राप्त झालेल्या आहेत. सडक अर्जुनी तालुक्यातील रॉकेल परवानाधारक श्री. ललित अग्रवाल यांचा होलसेल परवाना दोन वर्षापासून निलंबित आहे. तहसीलदार आणि एस.डी.ओ. यांचा अहवाल ललित अग्रवाल यांच्या बाजूने आहे. श्री. ललित अग्रवाल यांचे बंधू दैनिक लोकमतचे पत्रकार असल्यामुळे आणि ते विभागाच्या विरुध्द बातमी देत असल्यामुळे त्यांचा परवाना निलंबित केलेला आहे. दिनांक 4.8.2008 रोजी लोकशाहीदिनी जिल्हाधिकारी, गोदिया यांच्याकडे जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांचेविरुध्द तक्रार देणे, सदर तक्रार 60 दिवसाच्या आत निकाली न काढणे, त्यामुळे पुन्हा 13.10.2008ला त्याच प्रकरणी तक्रार होणे, परंतु यासंबंधी कोणतीही ाकार्यवाही न होणे, तसेच सदर प्रकरणी मा. विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे स्टेनो/अजिगों/कावि-131/08 दि. 3 नोव्हेंबर 2008 अन्वये जिल्हाधिका-यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी गोंदिया यांच्या संबंधी अहवाल सादर केलेला करणे, सदर चौकशी अहवालात जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांनी चुकीचे आदेश करणे, त्यांनी केलेला आदेश चुकीचा व संशयास्पद असणे, शासन नियमाप्रमाणे कार्य न करणे, त्रोटक आदेश करणे, तालुक्यातील वडेगांव येथील स्वस्त धान्य दुकानदाराचे आरोप सिध्द

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होऊनही त्याला मुक्त करणे, असे आरोप नमूद असणे, त्यामुळे सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन तात्काळ दोषी अधिकारी व कर्मचा-यांना निलंबित करावे अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

----

..नंतर श्री. गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुसद (जि.यवतमाळ) येथे प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सुरु करणे
**मु.शी.**: पुसद (जि.यवतमाळ) येथे प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सुरु करणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयामध्ये आदिवासी वस्ती असल्याने शासनाच्या आदिवासी योजना राबविण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सध्या पांढरकवडा येथे असेलेले एकात्मिक विकास प्रकल्प, आदिवासी विकास कार्यालय असून पुसद, महागाव, उमरेड, दिग्रस व आर्णी येथील गरीब आदिवासींना हे कार्यालय लांब असल्याने आदिवासी समाजाच्या लोकांना शासकीय योजनेचा फायदा घेता येत नाही व त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास आलेला अडथळा लक्षात घेता आदिवासी जनतेच्या विकासासाठी शासनाने पुसद येथे प्रकल्प अधिकारी,आदिवासी एकात्किक विकास प्रकल्प कार्यालय सुरु करण्याची तेथील जनतेने केलेली मागणी याकडे शासनाने तात्काळ विचार करुन नवीन कार्यालय सुरु करण्याबाबतचे निवेदन करावे अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सभागृहाच्या सदस्यांना प्रथम श्रेणी वातानुकुलीत श्रेणीचे तिकीट मिळण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.
**मु.शी.**: सभागृहाच्या सदस्यांना प्रथम श्रेणी वातानुकुलीत श्रेणीचे तिकीट मिळण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये व राज्याबाहेर दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना रेल्वे प्रवासासाठी रेल्वे कुपन्स पुरविली जातात, त्यानुसार वातानुकुलीत टु-टियर मध्ये तिकीट मिळते. परंतु प्रथमश्रेणी वातानुकुलीतमध्ये तिकीटे दिले जात नाहीत. प्रथम वर्ग दर्जाचे अधिकारी मात्र प्रथमश्रेणी वातानुकुलीत मध्ये प्रवास करतात. लोकप्रतिनिधींना मात्र दुसऱ्या दर्जाच्या डब्यामध्ये प्रवास करावा लागतो.

तेव्हा ज्या गाडीला प्रथम श्रेणी वातानुकूल आहे, त्या गाडीचे सदस्यांना प्रथम श्रेणी वातानुकुलीतचे तिकिट मिळण्याची सुविधा निर्माण करुन द्यावी अशा प्रकारची सूचना मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे.

---------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे.

**मु.शी.**: नियम स्थगित ठेवण्याबाबतचा वित्तमंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम 289 अन्वये पुरवणी मागयांवरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम 230 (2) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी" असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मुंबई शहरावर अतिरेक्यांनी केलेला हल्ला यासंदर्भात स्थगन प्रस्तावरील चर्चेस माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे असे सभागृहामध्ये ठरले होते. विधानसभा सभागृहामध्ये माननीय गृहमंत्र्यांचे उत्तराचे भाषण अजून सुरु आहे. त्यांचे तेथील भाषण संपल्यानंतर ते या सभागृहात उत्तर देण्यासाठी येतील त्यावेळी पुरवणी मागण्यांवरील चर्चा थांबवून त्यांच्या उत्तराच्या भाषणास सुरुवात करु. आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावयास सभागृहाची अनुमती आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर 13 विभागाच्या पुरवण्या मागण्या दाखविण्यात आलेल्या आहेत आणि त्या सर्व विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सभागृहात चर्चा करावयाची आहे. परंतु 13 विभागांचे मंत्री अथवा त्या विभागांचे राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. प्रत्येक विभागाच्या मंत्र्यांने पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडून ती मंजूर करुन घ्यावयाची असते. एका मंत्र्यावर सामुहिक जबाबदारी टाकून पुरवण्या मागण्या मंजूर करुन घेता येत नाही. सभागृहामध्ये ही वेगळीच प्रथा पडेल. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत 13 विभागाच्या पुरवण्या मागण्या दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या सर्व विभागाच्या मंत्र्यांना अथवा राज्यमंत्र्यांना उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना द्याव्यात. ते मंत्री सभागृहात उपस्थित झाल्यानंतरच सदर विभागांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, मी सन्माननीय सभागृहाला विनंती करतो की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करण्यास अनुमती द्यावी.

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक दुपारी 4.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.25 ते 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगिती नंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : आता आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करु या.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, खालच्या सभागृहातील माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर संपलेले आहे, आम्ही एवढा वेळा उत्तरासाठी थांबलोच आहोत आणि आता माननीय गृहमंत्री सुध्दा येतीलच म्हणून मध्येच पुरवणी मागण्यांवरील चर्चा जर घेतली तर आपल्याला माननीय गृहमंत्र्यांच्या उत्तरासाठी पुन्हा थांबावे लागेल.

**उपसभापती** : माननीय गृहमंत्री सभागृहात आल्यानंतर आपण थांबून गृह विभागाचे उत्तर अगोदर ऐकून घेऊ.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, खालच्या सभागृहात राईट ऑफ रिप्लाय सुरु असल्यामुळे आपण तोपर्यंत पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यास हरकत नाही आणि माननीय गृहमंत्री आल्यानंतर त्यांचे उत्तर सुरु करु या.

श्री. पांडुरंग फुंडकर : आम्ही नाही तरी एवढा वेळ थांबलोच आहोत, त्यात कामकाज पत्रिकेवरील नियम 93 च्या सूचना, लक्षवेधी सूचना तसेच विशेष उल्लेखाच्या सूचनाही पूर्ण झाल्या आहेत, त्यामुळे आता आम्हाला फक्त माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर ऐकायचे आहे.

श्री. दिवाकर रावते : पुरवणी मागण्या जवळपास 13 विभागांच्या आहेत. त्यात मी क्रमाने विभागांची नावे वाचतो व त्या त्या मंत्र्यांनी उभे राहून आपण हजर असल्याचे दाखवावे, अशा रितीने मी एक प्रकारे हजेरी घेतो. (नांवे वाचली असता अर्धे अधिक मंत्री उपस्थित नाहीत ) बरेच मंत्री उपस्थित नाहीत म्हणून पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करु नये, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : तीन वेळा सभागृहाची बैठक स्थगित केली तरी मंत्री महोदय आलेले नाहीत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, माझी अशी विनंती आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करावी व त्यासाठी सायंकाळी 6 वाजेपर्यंत ठरवून घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : महोदय, गृह विभागाचे उत्तर ऐकून आजच संपवावयाचे आहे. आणि उर्वरित कामकाज तसेच पुरवणी मागण्यावरील चर्चेसाठी उद्या सकाळी 9.00 वाजता एक्स्ट्रा सिटींग घेऊन काम करण्याची आमची तयारी आहे.

........2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, आज पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपली नाही तर उद्या सकाळी ती चर्चा घेता येईल, कारण बरेच विभाग असल्यामुळे अशी चर्चा दोन दिवस होत असते.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, माझी विनंती आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा एकदा सुरु करावी.......

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्धुारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ MMP/ प्रथम श्री. खर्चे.... 16:05

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या अगोदर माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर होऊ द्या. आता जर आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु केली व ही पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु असतांना माननीय गृहमंत्री सभासगृहात उपस्थित झाले तर आपल्याला पुरवणी मागण्यावरील चर्चा मध्येच थांबवून गृहमंत्र्यांचे उत्तर घ्यावे लागेल. त्यामुळे पुरवणी मागण्यावरील चर्चा थांबवून गृहमंत्र्यांचे उत्तर घेणे बरोबर नाही. अगोदर माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे अशी आमची विनंती आहे. सभागृहाचे कामकाज करण्यामध्ये आम्ही आपल्याला सहकार्य करीत असतो.

**उपसभापती** : मला दोन्ही बाजूंच्या सदस्यांच्या भावना समजलेल्या आहेत. माननीय गृहराज्यमंत्री या चर्चेला उत्तर देणार नाहीत असे गटनेत्यांच्या बैठकीत ठरले होते त्यामुळे गृहविभागाच्या चर्चेला माननीय गृहमंत्र्यांनीच उत्तर देणे अपेक्षित आहे. गटनेत्यांच्या बैठकीत जो निर्णय झालेला आहे तोच निर्णय आपल्याला मान्य करावा लागेल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, खालच्या सभागृहात अजून सुध्दा राईट ऑफ रिप्लाय सुरु आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज प्रथम माननीय गृहमंत्र्यांचे उत्तर होऊ द्यावे वाटले तर आपण पुरवणी मागण्यांवरील आजची आणि उद्याची एकत्रित चर्चा सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत घ्यावी व नंतर दोन्ही पुरवणी मागण्यावरील चर्चेला 4.00 वाजता एकत्रित उत्तरे माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावीत. माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित होत नाही तोपर्यंत पुरवणी मागण्या सोडून इतरही कामकाज आपल्यापुढे आहे त्यामुळे ते कामकाज सुरु करण्यास आमची काही हरकत नाही.

श्री. दिलीप वळसे -पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत बील सुध्दा दाखविण्यात आलेले आहे त्यामुळे बिलाला सुरुवात कण्यास आमचीही काही हरकत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता प्रथम माननीय गृहमंत्र्यांच्या उत्तराला सुरुवात करावी किंवा माननीय गृहमंत्र्यांना सभागृहात पोहचे पर्यंत जर विलंब होत असेल तर अर्धातास चर्चा आणि इतर कामकाजाला सुरुवात करावी परंतु आता पुरवणी मागण्याला सुरुवात न करता पहिल्यांदा गृहमंत्र्यांच्या रिप्लायला सुरुवात करावी ते जर जमत नसेल तर पुरवणी मागण्यांच्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

चर्चेला आता सुरुवात न करता उद्या सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत दोन्ही दिवसांच्या पुरवणी मागण्यांना माननीय मंत्रीमहोदयांनी एकत्रित उत्तरे दिली तरी चालतील. आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करु नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी पुढील कामकाज घेण्यास सहमती दर्शवली असल्यामुळे माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित होईपर्यंत पुढील विधेयक घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय कृषी मंत्र्यांचा जो प्रस्ताव आहे तो प्रथम घ्यावा असे वाटते.

**उपसभापती** : ठीक आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कापूस बी-बियाणे ( पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) विधेयक

**L.A. BILL OF XXXIV OF 2008.**

(A BILL TO REGULATE THE SUPPLY, DISTRIBUTION, SALE AND FIXATION OF SALE PRICE OF COTTON SEEDS AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.स.स.वि.क्रमांक -34 कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणे, तसेच त्यांची विक्री-किंमत निश्चित करणे यांबाबत विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित वा तद्नुषंगिक बाबींसाठी विधेयक मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** :विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.स.वि.क्रमांक 34 मागे घेतो.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.स.स.वि.क्रमांक 34 मागे घेण्यात आले आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत ( सुधारणा ) विधेयक

**मु.शी.**: कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत ( सुधारणा ) विधेयकावरील संयुक्त समितीचे पुनर्गठन.

**उपसभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

सचिव : कळविण्यात येत आहे की, सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 78- महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक या वरील सयुंक्त समितीच्या सदस्या प्रा.फौजिया खान,वि.प.स. यांचा विधानपरिषद सदस्यत्वाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे रिक्त झालेली जागा भरण्याच्या बाबतीत विधानसभेने केलेल्या शिफारशींशी हे सभागृह सहमत असून प्रा.फौजिया खान, वि.प.स. यांची समिती सदस्या म्हणून पुनर्नियुक्ती करण्याबाबत हे सभागृह शिफारस करीत आहे.

------

**उपसभापती** : आता मी अर्ध्या तास चर्चेस सुरुवात करतो.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.शिगम

**पृ.शी** :. शालेय शिक्षण विभागातील 50 टक्के रिक्त असलेली पदे त्वरित भरणे

**मु.शी** : शालेय शिक्षण विभागातील 50 टक्के रिक्त असलेली पदे त्वरित भरण्यासंबंधी सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

( सन्माननीय सदस्या अनुपस्थित )

-

**पृ.शी**. : राज्यातील राष्ट्रीय महामार्ग आणि राज्यमार्गावर होणारे वाढते अपघात

**मु.शी** : राज्यातील राष्ट्रीय महामार्ग आणि राज्यमार्गावर होणा-या वाढत्या अपघातासबंधी सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी दिलेली अर्धा - तास चर्चा

( सन्माननीय सदस्या अनुपस्थित )

**उप समापती** :सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी दिलेल्या दोन्ही अर्धा तास चर्चा लॅप्स झाल्या असून त्या पुन्हा घेण्यात येणार नाहीत. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची अर्धा तास चर्चा घेण्यात येईल.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेसाठी स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद मंजूर करणे

मु.शी : अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेसाठी स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद मंजूर करण्यासबंधी श्री. रामनथ मोते,वि.प.स. यानी उपस्थित केलेली अर्धा -तास चर्चा

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्ष्ंक ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा - तास चर्चा उपस्थित करतो

"महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली 1981 नुसार 1 ते 7 वर्ग किंवा 200 पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या अनुदानित खाजगी शाळेस स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय असणे, सदर पद मंजूर केले जात नसणे, विधिमंडळाने मंजूर केलेल्या नियमावलीत तरतूद असताना मुख्याध्यापक पद मंजूर न करण्याचे आदेश काढणे, वर्ग सांभाळून कार्यालयीन कामकाज करणे अडचणीचे ठरणे, कार्यालयासाठी लिपिक उपलब्ध नसणे, त्यामुळे प्राथमिक शाळांमध्ये काम करणा-या शिक्षकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व कार्यवाही "

सभापती महोदय, या राज्यामध्ये ज्या खाजगी शाळा आहेत मग त्या प्राथमिक शाळा असोत, माध्यमिक शाळा असोत वा उच्च माध्यमिक शाळा असोत त्या शाळांसाठी शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) विनियमन अधिनियम 1977 आणि महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) नियमावली 1981 लागू केले आहे. खाजगी अनुदानित ज्या प्राथमिक शाळा आहेत त्या शाळांनासुध्दा 1981 ची नियमावली लागू केलेली आहे. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली 1981 च्या नियम तीन मध्ये मुख्याध्यापकांची अर्हता व नेमणूंक करण्यासंबंधी तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, " 200 पेक्षा अधिक विद्यार्थी असणा-या किंवा एक ते सात इयत्ता असणा-या प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करावयाची व्यक्ती ही ज्याची कमीत कमी पाच वर्षा इतकी काळ सेवा झाली असेल असा ज्येष्ठतम प्रशिक्षित शिक्षक असेल " या नियमावलीमध्ये अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. विधि मंडळाने अशा प्रकारचा कायदा मंजूर केला आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

त्या नियमावलीतील तरतुदीपेक्षा वा त्या कायद्यातील तरतुदीपेक्षा शासनाचा जीआर वा शासनाचे परिपत्रक मोठे असू शंकत नाही किंवा त्या कायद्यावर ते मात करु शंकत नाही. विधिमंडळाने जो `कायदा मंजूर केला आहे त्यातील तरतूदी बाजुला ठेवणारे परिपत्रक शासनाला काढता येत नाही . 1981 च्या नियमावलीमध्ये अशा प्रकारची तरतूद असतांना सुध्दा राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने एक परिपत्रक काढले आहे . राज्यातील प्राथमिक शाळामध्ये 200 पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असतांना व त्या शाळेतील पहिली ते सातवीचे वर्ग आहेत त्या शाळांना या नियमानुसार मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय ठरते असे असतांनासुध्दा या परिपत्रकानुसार या शाळांमधील मुख्याध्यापकाच्या पदाला मान्यता देण्यात येत नाही. या पदाच्या नियुक्तीस मंजुरी देण्यास शासनाने प्रतिबंध केलेला आहे. शाळेमध्ये काम करीत आसतांना मुख्याध्यापकांना मोठया जबाबदारा पार पाडाव्या लागतात . माध्यमिक शाळेमध्ये स्वतंत्र मुख्याध्यापक मिळतो त्या ठिकाणी काम करण्यासाठी अन्य कर्मचारीदेखील असतात परंतु या प्राथमिक शाळामध्ये मात्र सर्व शिक्षणाचे कामकाज किंवा कार्यालयीन कामकाज मुख्याध्यापकाला करावे लागते .प्राथमिक शाळामध्ये स्वतंत्र मुख्याध्यापक नेमण्याची तरतूद असतांना सुध्दा राज्य सरकारने या पदाला मंजुरी न देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. विधिमंडळाने जो कायदा मंजूर केलेला आहे त्या कायद्याला छेद देणारा हा निर्णय आहे. या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला अशी विनंती करतो की प्राथमिक शाळामध्ये मुख्याध्यापकांची पदे भरण्यास शासनाने प्रतिबंध केलेला आहे तो प्रतिबंध काढून टाकण्याच्या संदर्भात तातडीने विचार करावा स्वतंत्र मुख्याध्यापक नेमण्याच्या संदर्भात नियमामध्ये जी तरतूद करण्यात आलेली आहे त्या नियमानुसार विद्यार्थी संख्येची वा वर्ग संख्येची अट पूर्ण करणा-या तसेच निकष पूर्ण करणा-या सर्व शाळांना स्वतंत्रपणे मुख्याध्यापकाचे पद मंजूर करावे व त्या पदाला मान्यता द्यावी तसेच त्या पदाची वेतनश्रेणी त्या शाळेच्या संबंधित मुख्याध्यापकांना देण्यात यावी.

**( सभापती स्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब )**

नंतर श्री..सुंबरे

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

सभापती महोदय, मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद मंजूर केल्यामुळे शिक्षकांची पदे मंजूर करताना काही फरक पडणार आहे म्हणून त्यामध्ये देखील शासनाने काही बदल करावा. प्रत्येक शाळेला मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद, ज्या शाळा निकष पूर्ण करतात त्यांच्याच बाबतीत मी हे म्हणतो आहे कारण ज्या शाळा निकष पूर्ण करीत नाहीत त्यांना हे मिळणार नाही हे मला मान्य आहे. पण नियमानुसार ज्या शाळा निकष पूर्ण करतात त्या सर्व शाळांना, ज्यांना ज्यांना मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय आहे त्यांना त्याबाबतचा तो जीआर रद्द करून तातडीने मुख्याध्यापकाचे पद मंजूर करावे अशा प्रकारची विनंती या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मी शासनाला करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... एसएस 2 ...

श्री. नाना पंचबुद्धे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती व नियमावली 1981 मधील 3(1)(अ)(1) प्रमाणे पटावर 200 पेक्षा अधिक विद्यार्थी असणाऱ्या किंवा इयत्ता 1 ते 7 असणाऱ्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करावयाची व्यक्ती ही ज्याची किमान पाच वर्षे इतका काळ सेवा झाली असेल असा ज्येष्ठतम प्रशिक्षित शिक्षक असेल अशी तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर संघ, सोलापूर यांनी माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. 7212/1998 दाखल करून मुख्याध्यापकांचे स्वतंत्र पद मान्य करावे. तसेच कोणत्याही प्रा. शाळेतील शिक्षकास अतिरिक्त शिक्षक म्हणून घोषित करू नये अशी मागणी केली. या याचिकेतील मागणीनुसार उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिनांक 2.2.1999 रोजी अंतरिम आदेश देताना याचिका कर्त्यांची मागणी मान्य केली. त्यानुसार याचिकेवर अंतिम निर्णय होईपर्यंत किंवा माननीय उच्च न्यायालय याबाबत पुढील आदेश देईपर्यंत ज्या प्रा.शाळांना यापूर्वी मुख्याध्यापकांचे स्वतंत्र पद मान्य केले असेल त्या शाळांना पूर्वीप्रमाण मुख्याध्यापकाचे पद ठेवावे व धोरणानुसार प्रा.शिक्षकाचे पद अतिरिक्त ठरवू नये अशा प्रकारचे अंतरिम आदेश दिले. न्यायालयीन आदेश शासन क्रमांक टीआरई-1098/2057-प्रशि-1, दिनांक 19.2.1999 नुसार सर्वसंबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहेत. सध्या स्वतंत्र मुख्याध्यापकाचे अस्तित्त्वाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने तसेच मान.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दिनांक 2.2.1999 च्या अंतरिम आदेशानुसार कारवाई केली जाते आहे त्यामुळे मा. उच्च न्यायालयात या प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणूक न केल्यामुळे निर्माण होणारे प्रश्न नियंत्रित होतील. न्यायालयीन प्रकरणामुळे सध्या प्रकरणी शासन निर्णय झालेला नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदय अनेकदा एखाद्या विषयासंबंधी बोलताना हा निर्णय न्यायालयात आहे असे सांगत असतात. सकाळी देखील माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी देखील असेच सांगितले. पण एखादा लोकहिताचा किंवा मोठ्या समुहाबाबतचा प्रश्न असेल, मग तो समूह शिक्षकांचा असेल, कारकुनांचा असेल त्यांच्या बाबतीतील एखादे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असेल तर शासन त्याबाबत न्यायालयात मेन्शन का करीत नाही ? अनेक दिवस हा खटला न्यायालया प्रलंबित आहे असे अफेडिविट करून

..... एसएस 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण .....

आपण न्यायालयाच्या ही बाब लक्षात खास करून का आणून देऊन त्याबाबत न्यायालयाने लवकर निर्णय द्यावा म्हणून विनंती का करीत नाही ? पण येथे अशा प्रकारे जी उत्तरे दिली जात आहेत ही काही शासन चालविण्याची पद्धत नाही. म्हणून मला आपल्याला असे विचारावयाचे आहे की, तुम्ही याबाबत न्यायालयापुढे मेन्शन करणार का आम्हाला ही बाब योग्य वाटते आहे, 500 च्या वर जेथे मुले असतील तेथे एक शिपाई आणि दोनशेच्या वर असेल तर वगैरे. जे काही आहे ते आम्ही लवकर करू. तरी न्यायालयाने याबाबत लवकर निर्णय करावा. तर असे आपण न्यायालयापुढे जाऊन मेन्शन करणार का ?

श्री. नाना पंचबुद्धे : सभापती महोदय, न्यायालयापुढे तसे मेन्शन करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना असे सांगितले की, या विषयाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे परंतु त्यांनी हेही स्पष्टपणे मान्य केले आहे की, न्यायालयामध्ये जी याचिका प्रलंबित आहे त्या बाबत न्यायालयाने अंतरिम आदेश दिलेले आहेत. म्हणजे मुख्याध्यापक पद काढून घेण्याच्या संदर्भात, मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद मंजूर न करण्यासंबंधात शासनाचा जो निर्णय होता त्याला सन्माननीय उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे याचाच अर्थ पूर्वीप्रमाणेच नियम 3 अन्वये ज्या ज्या शाळांमध्ये स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय ठरते वा ठरलेले होते त्या त्या शाळांमध्ये नव्याने निर्माण होणारे पद असेल किंवा पूर्वी पद भरलले आहे आणि आता ते रिक्त झाले तर ती पद भरण्यास शासनाने परवानगी द्यायला हवी, जी आता शासन परवानगी देत नाही. ज्या ठिकाणी ती पदे होती ती कंटिन्यू झाली. पण जे पद रिक्त होते ते पद भरण्यास आता शासन मान्यता देत नाही. नियमाप्रमाणे निकष पूर्ण होऊन नवीन पद निर्माण होऊ शकते, अनुज्ञेय ठरते पण त्या पदांनाही शासन मान्यता देत नाही. याचा अर्थ अंतरिम आदेश असतानाही शासन स्वत:च काढलेल्या आदेशाचीच अमलबजावणी करते आहे म्हणजेच याचा दुसरा अर्थ असाही होतो की, तो कोर्टाच्या आदेशाचाही अवमान आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ...

श्री. रामनाथ मोते...

हा न्यायालयाच्या आदेशाचा अवमान आहे. त्यामुळे शासनाने आता अंतरिम आदेश मान्य केले असल्यामुळे ज्या शाळांना स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय ठरते किंवा ज्यांनी ते पद भरले होते त्या सर्व शाळांना न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत पूर्वीप्रमाणे मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद मंजूर करणार काय?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायालयामध्ये असल्यामुळे जोपर्यंत न्यायालयाचा अंतिम निकाल लागत नाही तोपर्यंत याबाबत विचार करण्यात येणार नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाच्या आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद मंजूर करु नये या निर्णयाला स्थगिती दिली आहे. याचा अर्थ तो निर्णय लागू नाही. ज्या शाळांना मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय ठरते त्या शाळांना स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद न्यायालयाचा स्थगिती आदेश असल्यामुळे मंजूर करावयास अडचण काय? त्यासाठी आपण अंतिम आदेशाची वाट न पहाता ते पद मंजूर करणार काय?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, ही बाब तपासून पाहून माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत नक्की विचार करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, किती दिवसात आपण याबाबत निर्णय घेणार आहात? याचे कारण वर्षानुवर्षे हे अंतरिम आदेश असतांना आपण मुख्याध्यापकाचे पद मंजूर करीत नाही. अनेक शाळांमध्ये आज मुख्याध्यापकांना शिक्षकांचे काम करावे लागते. त्या शाळांमध्ये पदे मंजूर असतांना ती भरुन आपण त्यांच्यावरील कामाचा भार कमी करणार काय?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली बाब तपासून पाहून एक महिन्यात हा विषय निकालात काढण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 500 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना लिपिक-शिपाईच्या पदांना मंजूरी न मिळणे

**मु. शी.** : 500 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना लिपिक-शिपाईच्या पदांना मंजूरी न मिळणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ च्या नियम ११५ (३) (ब) मधील तरतुदीनुसार ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना लिपिक व शिपाईचे एक-एक पद अनुज्ञेय असणे, सदर पदे मंजूर न करता शासनाकडे प्रस्ताव पाठविले जाणे व शासनाकडून अनेक वर्षे मंजुरी मिळत नसणे, सन २००४-०५, २००५-०६ व २००६-०७ ची पदे मान्यतेसाठी शासनस्तरावर प्रलंबित असणे, शासनाने तयार केलेल्या कायद्यात तरतूद असताना शासनाची मान्यता घेण्याच्या प्रक्रियेस वेळ लागणे, शिक्षकेतरांचे होत असलेले शोषण, शिक्षकेतरांसाठी मानधनावर नियुक्त्या करण्याची तरतूद नसतांना वेतनश्रेणी ऐवजी मानधन देणे, यामुळे शिक्षकेतरांमध्ये निर्माण झालेला तीव्र संताप, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मी मागील अर्धा तास चर्चेमध्ये सुध्दा यासंबंधी उल्लेख केला आहे की, या राज्यामध्ये खाजगी प्राथमिक शाळांसाठी 1977 चा कायदा आणि 1981 ची नियमावली लागू आहे. परंतु त्याचबरोबर हे शासन मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा 1947 आणि 1949 ची नियमावली सुध्दा लागू करीत आहे. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियम 1981 च्या तरतुदींचा विचार केला तर माध्यमिक शाळेत पदे कशी मंजूर करावीत? माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकाच्या पदाव्यतिरिक्त अन्य पदांच्या भरती संदर्भात उल्लेख आहे. त्याप्रमाणे प्राथमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचारी, लिपिक, शिपाई ही पदे भरण्याच्या संदर्भात 1981 च्या नियमावलीत कोणतीही तरतूद नाही. याठिकाणी मात्र ज्या शाळांची विद्यार्थी संख्या 500 पेक्षा अधिक आहे त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. रामनाथ मोते...

शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर होऊ शकतात. ही पदे मंजूर करण्यासाठी 1981 च्या नियमावलीमध्ये तरतूद नसल्यामुळे मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा 1947 आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 च्या नियम 115 (3)(ब) चा आधार घेऊन ज्या शाळांची विद्यार्थी संख्या 500 पेक्षा अधिक आहे त्या शाळांसाठी एक शिपाई व एक लिपिकाचे पद मंजूर करण्याची तरतूद आहे. यासंबंधी माझा मुद्दा हाच आहे की, मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 च्या नियम 115 (3)(ब) अन्वये विद्यार्थी संख्या 500 च्या पुढे गेली तर त्या शाळेत 1 लिपिकाचे आणि 1 शिपायाचे पद अनुज्ञेय ठरते, ते मंजूर करण्याची जबाबदारी शासनाची आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

त्यावर होणारा खर्च शासनाकडून मिळू शकतो अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये आहे. कायद्यातील ही तरतूद सध्या अस्तित्वात असताना परिपत्रक काढून किंवा जी.आर. काढून शासनाला ही कायद्यातील तरतूद बदलता येणार नाही. शासनाला त्यासंदर्भातील सुधारणा 1947 च्या कायद्यामध्ये आणि 1949 च्या नियमावलीमध्ये करावी लागेल. ते अद्याप शासनाने केलेले नाही. पण शासनाने मात्र जी.आर. काढला, परिपत्रक काढले आणि 500 पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये शिपायाचे 1 आणि लिपिकाचे 1 पद मंजूर करताना शासनाची पूर्व परवानगी घेण्याची अट घातलेली आहे. याचा परिणाम असा झाला की, मागच्या तीन वर्षामध्ये 333 पदे शासनाने मंजूर केली. त्यांच्या नंतर 2004-05, 2005-06 आणि 2006-07 या वर्षात 193 पदे या राज्यामध्ये निर्माण झालेली आहेत. ही पदे निर्माण होऊनही खरे म्हणजे कायद्यानुसार तातडीने संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी म्हणजे जे मान्यता देणारे अधिकारी आहेत त्यांनी विद्यार्थी संख्येचा निकष पडताळून या पदांना मंजुरी द्यावयास हवी. पण तो निकष पूर्ण करणाऱ्या शाळांना सुध्दा शिपाई आणि लिपिकाची पदे दिली जात नाहीत. हे सगळे प्रस्ताव संबंधित शिक्षण अधिकाऱ्याकडून शिक्षण उपसचालांकडे, शिक्षण उपसंचालकांकडून शिक्षण संचालकांकडे आणि शिक्षण संचालकांकडून मंत्रालय स्तरावर पाठवावे लागतात आणि मंत्रालय स्तरावर चार-चार वर्षे या विषयाचा निर्णय होत नाही. आजही 193 पदे प्रलंबित आहेत. ही सगळी प्रोसीजर नियमबाह्य आहे, कायद्याला छेद देणारी आहे. कायद्याप्रमाणे जर 500 च्या पुढे विद्यार्थी संख्या गेली तर एक लिपिक आणि एक शिपायाचे पद मंजूर करण्याची तरतूद आहे तर आपण हा सगळा प्रस्ताव मागविण्याचा आणि शासनाने निर्णय घेण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे आपण अशा प्रकारचा जी.आर. मागे घ्यावा. परिपत्रक मागे घ्यावे आणि कायद्यानुसार जर त्यांना ते पद मंजूर होऊ शकते तर फक्त सक्षम अधिकाऱ्याने विद्यार्थी संख्येची पडताळणी करुन ते पद मंजूर करावे अशी माझी महत्वाची मागणी आहे.

सभापती महोदय, शिक्षण सेवक योजना 2000 पासून या राज्यामध्ये लागू झाली. शिक्षण सेवक योजना फक्त शिक्षकांसाठी लागू आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या संमतीने आपण या राज्यामध्ये शिक्षण सेवक योजना लागू केली. शिक्षकेतर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. रामनाथ मोते .....

कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक योजना लागू नाही. राज्य शासनाने मात्र या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुध्दा म्हणजे मागच्या वेळी जी 333 पदे दिली त्या पदांना मान्यता देताना मानधनावर मान्यता दिली. म्हणजे त्या ठिकाणी आपण या शिक्षकेतर पदांना कॉन्ट्रॅक्ट पध्दत लागू केली. आता जी 193 पदे प्रस्तावित आहेत आणि 3 वर्षे प्रलंबित आहेत त्या पदांवर माणसे काम करीत आहेत पण त्यांना वेतन मिळत नाही. केवळ शासन स्तरावर प्रस्ताव मंजूर होत नाही म्हणून त्यांना जर वेतन मिळू शकत नसेल तर ही सगळी पध्दत बदलावी. कायद्यानुसार ज्यांना पदे मंजूर होऊ शकतात त्यांना ती पदे तातडीने देण्यात यावीत आणि ही जी मधली प्रोसीजर आहे किंवा प्रस्ताव पाठविण्याचा हा जो प्रकार आहे तो रद्द करण्यात यावा अशा प्रकारची मागणी मी या चर्चेच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 च्या नियम 115 मधील उप नियम (3) (ब) नुसार 500 किंवा त्याहून अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांच्या बाबतीत 1 कनिष्ठ लिपिक व 1 चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे वेतन राज्य शसकीय तत्सम कर्मचाऱ्यांना लागू असणाऱ्या मान्यताप्राप्त वेतनाप्रमाणे देय असेल अशी तरतूद आहे. राज्य शासनाच्या महसुली जमेच्या तुलनेत आस्थापनेवरील खर्च वाढलेला आहे. राज्याच्या विकासाच्या कामावर याचा विपरित परिणाम होत आहे. राज्याच्या विकासाच्या, जनकल्याणाच्या योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकत नाही. याबाबत उपाययोजना म्हणून वित्त विभागाच्या दिनांक 15.12.1998 व दिनांक 10.9.2001 च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व कार्यालयात अस्तित्वात असलेल्या पदांचा तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील पदांचा आढावा घेण्याचे निर्देश आहेत. यासाठी संबंधित प्रशासनिक विभागाच्या प्रभारी मंत्र्यांची त्यास मान्यता घेऊन याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर ठेवण्यासाठी वित्त विभागास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळामध्ये शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नव्याने निर्माण झालेली पदे भरण्यास मंजुरी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठविले जातात. तद्नंतर या प्रस्तावास माननीय मंत्रिमहोदयांची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर हे प्रस्ताव वित्त विभागाच्या संयुक्त व उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर केले जातात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नाना पंचबुध्दे....

शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 12.7.2004 च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ज्या प्राथमिक शाळातील विद्यार्थी संख्या 500 पेक्षा अधिक झाली होती. त्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर केली आहेत. त्यामध्ये राज्यात नव्याने निर्माण झालेल्या 336 प्राथमिक शाळांमधील 333 कनिष्ठ लिपिक व 336 शिपायांच्या पदांचा समावेश आहे. सन 2004-05, 2005-06 व 2006-07 या वर्षामध्ये राज्यात नव्याने निर्माण झालेल्या 193 प्राथमिक शाळातील 193 लिपिक व शिपाई यांच्या पदास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. त्याचप्रमाणे राज्यात ज्या प्राथमिक शाळांची पटसंख्या 500 पेक्षा कमी झाली आहे, अशा शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या 121 कनिष्ठ लिपिक व 103 शिपाई यांची पदे अतिरिक्त ठरली आहेत. त्यांचे समायोजन करुन उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्याचाही प्रस्ताव यासोबत सादर केलेला आहे. प्रथमत: अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना शिक्षण संचालनालयास देण्यात आल्या होत्या. परंतु जोपर्यंत शासनातर्फे नव्याने निर्माण झालेल्या प्राथमिक शाळामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी मिळणार नाही तोपर्यंत अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेतर कर्मचा-यांचे समायोजन करणे शक्य होणार नाही, असे अभिप्राय शिक्षण संचालनालयाने शासनास सादर केले. तद्नंतर शासनाने सदरील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदांना मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या संयुक्त उच्चस्तर सचिव समितीच्या मंजुरीसाठी सादर केला. त्यानुसार प्रथमत: संयुक्त सचिव समितीच्या दिनांक 4.11.2008 रोजी आयोजित केलेल्या बैठकीत हा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येणार होता. परंतु सदर दिवशी ही बैठक होऊ न शकल्यामुळे या प्रस्तावावर अद्यापही निर्णय झालेला नाही. राज्याचे काटकसरीचे धोरण लक्षात घेऊन राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित व विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे भरण्यासाठी 'शिक्षक सेवक योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर राज्यातील ज्या प्राथमिक शाळामधील पटसंख्या 500 पेक्षा अधिक झाली आहे. त्या शाळांना नियमानुसार अनुज्ञ ेय होणारी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मानधनावर भरण्याबाबत

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.नाना पंचबुध्दे....

शासनाच्या दिनांक 12.7.2004 च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यामध्ये प्रथम तीन वर्षांसाठी कनिष्ठ लिपिक या पदासाठी दरमहा रुपये 2000/- व शिपाई पदासाठी रुपये 1700/- प्रथम तीन वर्षांसाठी मानधन मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तीन वर्षानंतर सदर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवा समाधानकारक झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येते. या पदांचा आढावा घेऊन वित्त विभागाची त्यासाठी मान्यता घ्यावी लागेल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री.नाना पंचबुध्दे यांच्याबद्दल मला आदर आहे. ते नव्यानेच राज्यमंत्री झालेले आहेत, त्यामुळे आम्ही त्यांनी वाचलेले उत्तर ऐकून घेतले आहे. परंतु पुढील वेळी सभागृहात त्यांनी निबंधासारखे उत्तर वाचून दाखवू नये, एवढेच मी त्यांना सांगतो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, 193 प्रस्ताव प्रलंबित आहेत. शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव वेळेवर निकाली काढले जात नाहीत. 4 वर्षापूर्वी 193 प्रस्ताव पाठविले आहेत ते 1 महिन्यामध्ये निकाली काढण्यात येतील काय ?

श्री.नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, या सर्व पदांचा आढावा घेऊन त्याबाबतचा निर्णय घ्यावा लागणार आहे. यासंबंधीचा 2 महिन्याच्या आत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

**उपसभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी अतिरेक्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला

**मु.शी.**: दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी अतिरेक्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, प्रकाश शेंडगे, पाशा पटेल, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब व श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( चर्चा पुढे सुरु..... )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आतंकवाद्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्याबाबत या सदनामध्ये अत्यंत गंभीरपूर्वक चर्चा झाली. या हल्ल्याबाबत संपूर्ण हिंदुस्थानमध्ये नव्हे तर जगामध्ये त्याचे पडसाद उमटले. अनेक देशांनी या हल्ल्याची निंदा केली. एवढेच नव्हे तर या हल्ल्याची नोंद युनोने घेतली आहे. या हल्ल्यासंबंधी सर्वांच्या भावना तीव्र होत्या.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

सभापती महोदय, मला एक गोष्ट या ठिकाणी नमूद कराविशी वाटते.मला कोणाचाही अवमान करावयाचा नाही किंवा कोणाला कमी लेखाण्याचा माझा उद्देश नाही. परंतु काल एक गोष्ट मला या सदनामध्ये बोचत राहिली ती मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेल्या सर्व शिक्षकांचा मी सन्मान करतो. ते आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडतात. ते आम्हाला शिकवितात त्यामुळे ते आदर्शवत आहेत. परंतु कालच्या स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून आलेल्या संपूर्ण चर्चेमध्ये सत्ताधारी पक्षाच्या बाजूने भावना व्यक्त करता येत नसताना देखील त्यांनी आपल्या भावना व्यक्त करण्याची मागणी केली आणि आम्ही त्यास परवानगीही दिली. पण मुंबईतील घटनेसंबंधी एकाही शिक्षकांनी साधा निषेधाचा शब्दही नोंदविलेला नाही याचे मला खूप वाईट वाटले. मुंबईतील आतंकवादी हल्ल्याची सर्व जगाने नोंद घेतली. आज एका प्रश्नासंबंधी आमचे शिक्षक आमदार जेवढे आक्रमक झालेले होते त्याच्या अर्धा टक्का जरी ते काल आक्रमक झालेले दिसले असते तर बरे वाटले असते. तसे ते झाले नाहीत याची खंत आहे. शिक्षक आमदारांनी केवळ शिक्षकांचे पगार, भत्ते यांच्या पुरतेच बोलले पाहिजे आणि इतर प्रश्नांच्या बाबतीत बोलायचे नाही अशातला भाग नाही. परंतु कालच्या चर्चेमध्ये त्यांनी भाग घेतला नाही याची मला खंत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : याच मुद्यावर मला बोलायचे आहे. फक्त सीक लिव्ह, हाफ लिव्ह यासाठीच आपण येथे आहोत काय? नागरिकांच्या अधिकारासाठी आपण झटले पाहिजे. ज्यांच्यासाठी युनियन आहेत ते नेते केवळ त्यांचेच प्रश्न मांडतात. शिक्षकाचे मन हे आईच्या मनासारखे असते आणि अशा प्रसंगाच्या वेळी एकही शिक्षक बोलत नाही याबद्दल खंत आहे. प्रश्नोत्तराचा तास संपला की हे निघून जातात. मग हे मुलांना देशप्रेम काय शिकविणार ? कालच्या चर्चेमध्ये सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील भाग घेतला. सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जामा हे सरकरला सुध्दा दोष देत होते आणि आपण सांगता की आम्हाला बोलायचे नाही. जसे अधिकारासाठी आपण भांडता तशी कर्तव्याची जाणीव युनियनच्या नेत्यांनी करुन दिली पाहिजे.

**उपसभापती** : आता माननीय मंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, 26 नोव्हेंबरला दहशतवाद्यांनी मुंबईवर जो हल्ला केला तो हल्ला माणूसकीला काळिमा फासणारा, निष्पाप सामान्य नागरिकांची क्रूरपणे हत्या करणारा असून हे सगळे पाकिस्तानामधून झालेले आहे. हे करीत असताना या देशाची अर्थ व्यवस्था खिळखिळी व्हावी, या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला पूर्णपणे दहशतीच्या वातावरणात नेण्याचे आणि मुंबईतील संपूर्ण जनजीवन खिळखिळीत करण्याची भूमिका घेऊन 26 नोव्हेंबरचा हल्ला झाला.

..नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सभापती महोदय, अमेरिका, संयुक्त राष्ट्र संघटना, आस्ट्रेलिया, युरोपियन युनियन्स, जवळपास जगातील सगळयांनीच राष्ट्रप्रमुखांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र सचिव श्रीमती कंडोलिजा राईस या भारतात तातडीने आल्या. इंग्लंडचे पंतप्रधान देखील अचानकपणाने या देशात आले आणि दहशतवादाच्या विरोधात एकत्रित लढलो पाहिजे अशी भूमिका त्यांनी देखील व्यक्त केली. दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेला हल्ला हा अचानक झालेला हल्ला होता. छोटासा युध्दजन्य परिस्थिती सारखा हा हल्ला झालेला आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या आर्थिक राजधानीमध्ये काही जागा आणि काही इमारती अशा आहेत की, त्यामुळे मुंबई शहराची ओळख जगाच्या पाठिवर अनेकांना होते आहे. मुंबईतील ताजमहाल हॉटेल हे 105 वर्षापासून दिमाखाने उभे आहे त्याकडे आपण पाहतो, त्याप्रमाणे मुंबईतील उंच इमारतीतील एक महत्वाची उंच इमारत म्हणून ओबेरॉय हॉटेलच्या इमारतीकडे आपण पाहतो. ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल, ही ठिकाणे देशातील, मुंबईतील सिम्बॉल आहेत असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सी.एस.टी.रेल्वे स्टेशनवर देखील अतिरेक्यांनी हल्ला केला. मुंबई शहरावर अतिरेक्यांनी अचानकपणे हा हल्ला केलेला आहे. या हल्ल्यामध्ये पोलिसांसह 165 निरपराध लोकांचे प्राण गेले.

श्री. दिवाकर रावते : माननीय गृहमंत्र्यांनी हा अचानक हल्ला झाला असे म्हटले त्यास माझी हरकत आहे. या सदनातील अनेक सदस्यांनी मत व्यक्त केले की, या हल्ल्याबाबत शासनाकडे अनेक माध्यमातून सूचना आली होती. परंतु राज्य सरकारने त्यासंबंधी योग्य ती नोंद घेतली नाही. हा पूर्वनियोजित हल्ला होता ही गोष्ट निश्चित आहे. तो हल्ला माननीय गृहमंत्रांना अचानक का वाटला हे मला कळत नाही. "अचानक" या शब्दाला माझी हरकत आहे.

श्री. जयंत पाटील : "अचानक" म्हणण्याचा उद्देश पुढे स्पष्ट होईल असे मला वाटते. आपल्या म्हणण्याप्रमाणे या घटनेच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी मते व्यक्त केलेली आहेत. मुंबई शहरावर अतिरेक्यांनी जो हल्ला केला त्यात 105 निरपराध लोकांचे प्राण गेले. यामध्ये 285 लोक जखमी झाले आहेत. जवळपास 26 परदेशी नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत. 22 परदेशी जखमी झाले आहेत. पोलिसातील 18 बहादूर जवानांना वीरमरण आले आणि यात 36 पोलीस देखील मृत्यूमुखी पडले आहेत त्यात होमगार्डचे गार्ड आहेत, रेल्वे पोलीस आहेत, मुंबई पोलीस आहेत, त्यात एनएसजीचे जवान आहेत यात सगळयांचा समावेश होतो. खरे म्हणजे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/    प्रथम श्री. शिगम    16:45

श्री. जयंत पाटील....

एनएसजी, होमगार्ड, सीआरपीएफ या जवानांनी अतुल धैर्य दाखविले. ताजमहाल आणि ओबेरॉयच्या सिक्यूरेटीच्या लोकांनी, तसेच फायरब्रीगेडच्या जवानांनी अतिरेकी इमारतीच्या आत असताना लोकांना मोठया कौशल्याने बाहेर काढले. जे.जे.हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, बॉम्बे हॉस्पिटल यामधील डॉक्टरांनी जखमींना अतिशय तात्काळ सेवा दिली, त्याबद्दल या सर्वांचे आभार व्यक्त केले पाहिजेत. डॉक्टरांनी तात्काळ पुढे येऊन जखमींना मोठया प्रमाणात मदत केलेली आहे व आताही ते करीत आहे त्यामुळे त्यांचा उल्लेख करणे मला गरजेचे वाटते. अतिरेक्यांनी हा मोठा हल्ला केलेला आहे. या हल्ल्याची पूर्व तयारी काय होती ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 16:50

श्री.जयंत पाटील.........

कोणत्या प्रकारे या हल्ल्याला आपल्याला सामोरे जावे लागले आणि या हल्ल्यानंतर कोणत्या लूप होल्स या निमित्ताने आपल्यासमोर आल्या याची चर्चा होण्याची गरज आहे, असे मला वाटते आणि त्या सभागृहात आपल्या सर्वांनीच कालच्या दिवसभराच्या चर्चेत केल्या. या हल्ल्यामध्ये जवळपास 10 अतिरेकी आपल्यासमोर होते. त्यातील 9 मृत्यू पावले आणि एक आपल्या हातात आला. जवळपास 10 च्या 10 जणांचे पत्ते, ते कोणत्या प्रांतात पाकिस्तानात राहतात याची माहिती आपल्याला उपलब्ध झालेली आहे. जो अतिरेकी आपल्या हातात आला तो महंमद अजमल कसाब हा 21 वर्षाचा चौथी शिकलेला ओकारा जिल्हयातील दिपालपूर तालुक्यातील फरीदकोट या पंजाब प्रांतातील गावात राहणारा आहे. चौथी शिकलेला, वयाच्या 20 व्या वर्षी त्याने द्रव्यार्जनासाठी डाके घातले पाहिजेत, चोऱ्या केल्या पाहिजेत असा मनात विचार आल्यानंतर त्याने मुजफ्फर लाल खान या मित्राला विश्वासात घेतले, आपली कल्पना त्याच्यासमोर मांडली. लाल खान याने त्याला सुचविले की, कराचीमध्ये ऑफीस आहे तेथे तू जा. लाल खानच्या सांगण्यावरुन कसाब त्या दुकान सदृश ऑफीसमध्ये गेला. रॉबरी करण्यासाठी हत्यार मिळविले पाहिजे म्हणून कराची येथील दुकानात गेला. ते लष्कर-ए-तोयबाचे कार्यालय निघाले. तेथे गेल्यानंतर त्याला सांगण्यात आले की, तुला हत्यार हवे असेल तर ट्रेनिंग घेतले पाहिजे. ट्रेनिंग घ्यायची तयारी असेल तर हत्यार द्यायची व्यवस्था करु. अशा प्रकारे लष्कर-ए-तोयबा यंत्रणेमध्ये त्याला सामावून घेण्याचा प्रयत्न सुरुवातीला झाला आणि मग या तरुणाला लष्कर-ए-तोयबाने 21 दिवसांचे ट्रेनिंग सुरुवातीला द्यायची तयारी दाखविली. जे ट्रेनिंग कसाबने घेतले. हा लाहोरच्या कार्यालयात तो ज्या दुकानात गेला त्या लष्कर-ए-तोयबाने त्याला हत्यार मागितल्यानंतर जे ट्रेनिंग द्यायची तयारी दर्शविली ते जवळपास 21 दिवसांचे ट्रेनिंग दौरा-ए-सुभा म्हणून बेसिक ट्रेनिंग समजले जाते, ज्यामध्ये रिलिजन, फिजिकल टेस्ट, फिटनेसचा समावेश होतो. मुरीतके नावाचे गाव आहे तेथे दौरा-ए-सुभा ट्रेनिंग कसाबला मिळाले. हे ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर दौरा-ए-आम म्हणून शस्त्रे कशी वापरायची याचे 21 दिवसाचे ट्रेनिंग द्यायची व्यवस्था होती, त्यामध्ये त्याचा परफॉर्मन्स चांगला झाल्यानंतर ॲडव्हान्स ट्रेनिंग दौरा-ए-खास या ट्रेनिंगमध्ये जाण्याची व्यवस्था केली. तीन महिन्याच्या दौरा-ए-खास या ट्रेनिंगमध्ये हत्यारे कशी वापरायची, एके-47, एके-56, एक्स्प्लोझिव्ह

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 16:50

श्री.जयंत पाटील.........

कशी वापरायची याची माहिती देण्यात आली. दौरा-एक-रिबाक या ट्रेनिंगमध्ये सर्व्हेलन्स, जीपीएसचा वापर कसा करायचा, इंडियन एजन्सीज कोणकोणत्या आहेत, त्या कशा ॲक्ट होतात, त्यांना कसे चुकवायचे याचे तीन महिन्यांचे ट्रेनिंग त्याला देण्यात आले. सगळे ट्रेनिंग झाल्यानंतर 10 लोकांच्या टीममध्ये हा एक अशा 10 मुलांना एकत्रित करण्यात आले. कराचीजवळ अझिजाबाद नावाचे गाव आहे तेथे त्यांना एकत्रित करुन 15 सप्टेंबरला मुंबईवर हल्ला करण्याचे टार्गेट त्यांना सांगण्यात आले. काही कारणांनी हे टार्गेट सांगताना 4 जणांना एक टार्गेट सांगण्यात आले. दुसऱ्या तीन दोन-दोनच्या गटांना वेगळे टार्गेट सांगण्यात आले.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) ZZ-1

PFK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भोगले ....... 16:55

श्री. जयंत पाटील ......

आणि सगळ्यांना सांगण्यात आले की, दुसऱ्याचे टार्गेट एकमेकांना विचारायचे नाही, दुसऱ्याकडे कोणते काम दिले आहे ही चौकशी करायची नाही. काही निमित्ताने पहिला 10 ते 15 सप्टेंबरला जो हल्ला करावयाचा होता, त्याची वेळ बदलण्यात आली आणि तो हल्ला पुढे ढकलण्यात आला. त्यानंतर जो अडीच-तीन महिन्याचा कालावधी मिळाला त्यामध्ये या 10 मुलांना वेगवेगळ्या घरात ठेवण्यात आले होते, नंतर त्यांना त्या घरातून बाहेर जाऊ दिले नाही. ही बातमी व ही चर्चा आणि टार्गेट कळल्यानंतर त्यांना कोठेही जाऊ दिले नाही. जवळपास तीन महिने त्या घरातच त्या मुलांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. फक्त चार दिवस त्यांना समुद्रावर बोटी चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी बाहेर काढले होते. मेरीटाईम ऑपरेशनचे ट्रेनिंग त्यांनी घेतले. या सर्व कालखंडात हा संपूर्ण प्लॅन करणारा झाकिर रहमान लकवी हा लष्कर-ए-तोयबाचा टॉपचा माणूस आहे. हाफिज सय्यद नावाचा माणूस येऊन त्यांना मोटिव्हेट करुन गेला. अबू हमजा नावाचा जो माणूस होता त्याने गूगल अर्थवर्कच्या नकाशापासून टार्गेटच्या ठिकाणी आत कसे जायचे ही सर्व माहिती व फोटोग्राफ पुरविले. तसेच काफा नावाचा जो माणूस होतो तो या अबू हमजाचा सब ऑर्डिनेट होता. या लोकांना घेऊन 22 तारखेला कराचीवरुन छोट्या बोटीने सोडले आणि 40 तासानंतर अल हुसैनी नावाच्या छोट्या जहाजावर त्यांना शिफ्ट करण्यात आले. ती लष्कर-ए-तोयबाची एक मोठी फिशिंग ट्रॉलर होती. त्या बोटीवर सात लोक थांबलेले होते. 22 तारखेला पूर्ण दिवस काहीच झाले नाही. त्यांना त्या बोटीच्या खालच्या खोलीत राहण्यास सांगितले होते. ही बोट इंटरनॅशनल वॉटरमध्ये होती. ज्यावेळी इंटरनॅशनल वॉटरमध्ये हे लोक थांबलेले होते त्यादरम्यान बोटीवरच त्यांना एक बॅग देण्यात आली. त्या बॅगेत एके-47, 8-9 मॅगझिन्स, एका मॅगझिन्समध्ये 30 बुलेट्स असतात, अशा प्रकारे त्यांना 100 ते 130 राऊंडस देण्यात आले, 10-10 हँडग्रेनेड आणि 9 एमएमचे पिस्तुल, 2 मॅगझिन्स 18 राऊंडस देण्यात आले व खाण्यासाठी ड्रायफ्रुट्स देण्यात आले. तसेच प्रत्येकाल एक कॅरी बॅगसारखी बॅग देण्यात आली, अशा प्रकारे 10 बॅग्ज दिल्या गेल्या. प्रत्येक बॅगचे वजन 8-8 किलो एवढेच होते आणि बॅगा सारख्याच होत्या. ही सर्व व्यवस्था 22 तारखेला केल्यानंतर 23 तारखेला सकाळी बोटीला काहीतरी धडकले असे त्यांच्या लक्षात आले. वर आल्यानंतर त्यांना असे समजले की, एक कुबेर नावाची बोट या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2

श्री. जयंत पाटील ........

बोटीच्या शेजारी उभी आहे, त्या बोटीवर चार खलाशी होते, त्यांना या बोटीवर आणण्यात आले. त्यातील एक श्री. तांडेल नावाचा खलाशी मात्र त्याच बोटीत होता. ही 10 मुले या कुबेर नावाच्या बोटीत आले आणि जवळपास 23 तारखेला दुपारी 3.00 वाजता निघालेले हे सर्व बोटीवर टॉपला आळीपाळीने पहारा देऊन कोण येतो हे पाहत होते आणि तशी माहिती देत होते. तसेच तांडेलवर सुध्दा ते लक्ष देत होते. तेव्हा टॉपला सुध्दा पहारा सुरुच होता आणि या सर्व काळात त्यांच्या हँगलरबरोबर सतत संपर्क होता. 26 तारखेला दुपारी चवथ्या नॉटिकल माईल्सवर ते सर्व आले.......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

जवळपास 3 तासात त्यांनी 592 नॉटीकल माईल्स प्रवास केला. या तीन दिवसाच्या काळात त्यांनी ज्या भागात नेव्हीची गस्त असते, तो एरिया क्रॉस केला, कोस्ट गार्डचा भाग सुध्दा त्यांनी क्रॉस केला. 12 नॉटीकल माईल्सपर्यंत आपण आणि कस्टम ब-याचशा गोष्टी तपासण्यासाठी जात असतो त्यातील 4 नॉटीकल माईल पर्यंत हे आतंकवादी आले. हे आतंकवादी दुपारी 4.00 वाजताच पोहोचले होते परंतु अंधार होईपर्यंत ते त्या ठिकाणी थांबले. त्यानंतर 7.00 ते 7.15 वाजता त्यांनी त्यांच्या हँडलरला फोन केला व त्या हँडलरने दामोदर तांडेलला खतम करण्यास सांगितले. तिधानी खाली उतरुन तांडेलचा वध केला, तेथून ते बाहेर आले, बोट इन्फ्लेट केली, त्यामध्ये 10 जण सगळया साहित्यानिशी बसले. या बोटीमध्ये दोन तीन जण बसले असते तर या बोटीने ते समुद्राच्या काठाला 25-30 मिनिटात पोहचले असते. परंतु वजन जास्त असल्यामुळे त्यांना 1.15 तास वेळ समुद्राच्या काठावर यावयास लागला. हे 10 जण मुंबईच्या भाई बंदरकर मच्छिमार नगरच्या बधवार पार्कच्या बाहेर साधारणपणे 8.15 ते 8.30 दरम्यान हजर झाले. इस्माईल खान आणि कसाब या दोघानी प्रथम उतरुन पुढे जाण्याची सूचना होती. कोणी कोठे कधी जायचे याचे टायमिंग लावलेले होते. इस्माईल खान आणि कसाब यांना पुढे जाण्याच्या सूचना होत्या त्यामुळे हे दोघे प्रथम उतरले, मच्छिमार कॉलनीच्या बाहेर आले, फुटपाथवर आल्यावर टॅक्सी दिसली नाही म्हणून थोडे अंतर चालल्या नंतर एक टॅक्सी पकडली. इस्माइल खान पुढच्या सिटवर बसला होता व कसाब मागच्या सिटवर बसला होता. इस्माईल ड्रायव्हरशी बोलत होता, इस्माईल खानने त्याला वेगवेगळे प्रश्न विचारले. टॅक्सी ड्रायव्हरला व्ही.टी. स्टेशनवर व्हाया आझाद मैदान की, दुस-या रस्त्याने जावयाचे असा प्रश्न पडला होता, परंतु त्यांना अगोदरच सांगण्यात आले होते की, तुम्ही आझाद मैदानच्या मार्गे जा, त्याप्रमाणे त्यांची टॅक्सी आझाद मैदानच्या मार्गे व्ही.टी. स्टेशनकडे गेली. व्ही.टी. स्टेशन येईपर्यंत इस्माईल खानने भरपूर वेळ घालवला व मागच्या बाजूस बसलेल्या कसाबने आपल्या हातातील एक बॉम्बला बॅटरी आणि टाईम फिक्स केला व तो बॉम्ब ड्रायव्हरच्या सिटच्या खाली सरकवला. हे दोघे व्ही.टी. स्टेशनला उतरल्यानंतर कसाबने इस्माईल खानला टॉयलेटला जाऊन येतो म्हणून सांगितले व 10 मिनिटात कसाब बाहेर आला त्यावेळी इस्माईल खानने त्याच्या जवळचा बॉम्ब कुठे तरी ठेवून आला. हा बॉम्ब कोठे ठेवला याची कसाबला माहिती नव्हती परंतु लोकांची जास्त वर्दळ जेथे असते तेथे तो बॉम्ब ठेवला असा कसाबचा दावा आहे.

3A-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

टॉयलेटच्या बाहेर पडल्यानंतर दोघांनी प्लॅटफॉर्म नंबर 13 च्या समोर जो वेटींग एरिया आहे त्या ठिकाणी आले. व्ही.टी. स्टेशनच्या उजव्या हाताला थ्रु ट्रेनचा प्लॅटफॉर्म आहे तर डाव्या बाजूला लोकलचा प्लॅटफॉर्म आहे. दोघांनी प्लॅटफॉर्म नंबर 13 च्या समोर जो वेटींग एरिया आहे तेथे आल्यानंतर फायरींगला सुरुवात केली आणि 13 नंबरच्या प्लॅटफॉर्मवरुन 1 नंबरच्या प्लॅटफॉर्मकडे फायरींग करीत यावयास लागले. हे दोघे केवळ फायरींगच करीत नव्हते तर हँडग्रेनेडचा सुध्दा वापर करीत होते. या दोघांनी छोटया आणि थोडया मोठया साईजचे हँडग्रेनेड वापरले होते. 13 नंबरच्या प्लॅटफॉवरुन एक नंबरच्या प्लॅटफॉर्मकडे फायरींग करीत येत असतांना त्यांना पोलीस स्टेशनच्या जवानांनी फायरींग केली. समोरच पोलीस इन्सपेक्टर श्री. शिंदे होते त्यांना समोरच त्यांनी आपल्या एके 47 मधून गोळया झाडून मारले. असे करत करत त्यांचा प्रवास प्लॅटफॉर्म क्रमांक 1 पर्यंत गेला. एक नंबरच्या प्लॅटफॉर्मवरुन बाहेर पडले की, दोन तीन पाय-यांनंतर सबवे लागतो. हे दोघे सबवेच्या चार पाय-या उतरले परंतु नंतर त्यांच्या लक्षात आले की, खाली उतरल्यानंतर पुढे कोठे जाणार याची माहिती नसल्यामुळे आपण अडकून जाऊ या कारणाने ते पुन्हा प्लॅटफॉर्म नंबर एकवर पळावयास लागले.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.........

प्लॅटफॉर्म 1 वर एक फूट ओव्हर ब्रीज आहे जो टाईम्स ऑफ इंडियाच्या बिल्डींगच्या बाजूला उतरतो. त्या ब्रिजवर ते दोघे चढायला लागले. दरम्यानच्य काळात दोन्ही बाजूने पोलीस आले होते. त्यामुळे त्यांनी एका माणसाचा शिल्ड म्हणून वापर करुन ते ब्रीज क्रॉस करुन पलिकडे गेले. त्यांच्यातील दुसरा माणूस जाताना सतत बॉम्ब फेकत होता व फायरींग करीत होता. त्यांच्याजवळ कोणी येणार नाही याची काळजी घेत त्यांनी ब्रीज क्रॉस केला. ब्रीज क्रॉस करुन ते पलिकडे उतरले. त्याठिकाणी कार पार्किंग आहे. तेथील गाड्या उघडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गाड्या उघडत नाहीत असे दिसल्यावर त्यांनी टाईम्स ऑफ इंडियाच्या बाजूची जी गल्ली आहे त्या गल्लीत जाणे पसंत केले. कारण दोन्ही बाजूनी पोलिसांची गाडी येत होती. त्यांनी पोलिसांच्या गाडीवर देखील फायरिंग केले. पोलिसांच्या पायाला गोळ्या लागल्या. त्यांना मी भेटून त्यांची चौकशी केली आहे. गाडीच्या पत्र्यातून गोळ्या आल्या आणि त्या त्यांना लागल्या. ते अतिरेकी पळत पलिकडच्या गल्लीत गेले. त्याठिकाणी स्पेशल ब्रांचचे ऑफीस आहे. तेथून त्यांना पोलिसांच्या गोळीबाराला तोंड द्यावे लागले. समोरुन गोळीबार होऊ लागल्यावर ते कामा हॉस्पीटलच्या तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर गेले. त्यावेळी ॲडीशनल सी.पी. श्री.दाते हे त्यांच्या मागे धावले. अतिरेक्यांना कोणती वेपन्स आहेत याचा विचार न करता त्यांच्यावर फायरिंग सुरु केले. क्रॉस फायरिंग बराच काळ सुरु होते. क्रॉस फायरिंग होण्यास सुरुवात झाल्यानंतर त्यांनी दाते आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर हॅन्ड ग्रेनेड टाकण्यास सुरुवात केली. त्यांनी टाकलेल्या पहिल्या हॅन्ड ग्रेनेडमध्ये वायरलेस ऑपरेटर मृत्युमुखी पडला आणि अन्य काहीजण जखमी झाले. तरी सुध्दा दाते त्यांच्यावर फायरिंग करीत होते. अतिरेक्यांकडे एके-47 सारखी हत्यारे असताना दाते मागे हटले नाहीत. शेवटी त्यांनी दुसरा हॅन्ड ग्रेनड टाकला त्यामध्ये दाते जखमी झाले. सर्व शांत झाले असे समजून ते अतिरेकी कामा हॉस्पीटलमधून बाहेर पडून छोट्या गेटने रंगभवनकडे गेले. या दरम्यान श्री.हेंमत करकरे, श्री.अशोक कामटे, श्री.विजय साळसकर यांना श्री. दाते हे क्रॉस फायरिंगमध्ये व्यस्त आहेत हे लक्षात आल्यावर अे.सी.पी.पायधुणी डिव्हीजनची गाडी ताब्यात घेतली. श्री. साळसकर ड्रायव्हींगला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.........

बसले, कामटे डावीकडे बसले, करकरे मागच्या सीटवर बसले तर त्यांच्यासोबत मागे तीन जवान बसले. त्यांनी गाडी रंगभवनच्या लेनमध्ये जात असताना त्यांना दोन अतिरेकी दिसले. त्यांच्या लक्षात आले की ते अतिरेकी आहेत. अतिरेक्यांना वाटले की ही गाडी निघून जाईल.आपण भिंतीच्या आडोशाला उभे राहू. परंतु दुर्दैवाने क्वालिस गाडी हळू झाली. कामटे यांनी अतिरेक्यांवर पहिल्यांदा फायरिंग केले. कसाबच्या उजव्या हाताला गोळी लागली आणि एके-47 त्याच्या हातातून पडली. पडलेली एके-47 दुसऱ्या हाताने उचलण्याचा प्रयत्न त्याने केला त्यावेळी त्याच्या दुसऱ्या हाताला देखील गोळी लागली. तिसरी गोळी इस्माईलच्या उजव्या पायाला लागली. हे सर्व फ्रॅक्शन ऑफ सेंकदमध्ये झाले. कसाब जखमी झाला त्यावेळी इस्माईलने त्याच्याकडील एके-47 ब्रश जसा फिरवितो त्याप्रमाणे त्याने गन फिरविली आणि क्षणात अनेक गोळ्या एके-47 मधून सुटून गाडीत असलेल्या आपल्या पोलीस अधिकाऱ्यांना लागल्या किंबहुना साळसकर, कामटे आणि करकरे हे पोलीस अधिकारी फार मोठ्या प्रमाणावर जखमी झाले.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ....

ऑन द स्पॉट त्यांचा मृत्यू व्हावा इतक्या गंभीर स्वरुपाच्या त्यांना जखमा झाल्या होत्या . गाडीत पुढे बसलेल्या पोलीस दलातील दोन अधिका-याना पुढच्या दारातून बाहेर काढले होते त्याचबरोबर कै.करकरे यांनासुध्दा बाहेर काढले होते. त्यांचा पोस्ट मार्टेम रिपोर्ट मी वाचला आहे त्या संदर्भात या ठिकाणी बरीच चर्चा झालेली आहे. त्यांच्या पोस्ट मार्टेमच्या रिपोर्टवरुन असे दिसून येते की, बुलेट प्रुफ जाकीट व्यतिरिक्तच्या भागात तसेच खांद्याजवळ त्यांना बुलेटस लागल्या होत्या. या तीनही अधिका-याना गाडीतून बाहेर काढण्यात आले होते. या अतिरक्यांनी मागचे दार उघडण्याचा प्रयत्न केला होता परतु ते दार उघडले नाही म्हणून पुढच्या दोन्हीही सीटसवर दोघेजण बसले व त्यांनी गाडी बाहेर काढली ती गाडी व्ही.टी.स्टेशनकडे जावयास लागली. सेन्ट झेव्हीअर्स स्कूल जवळ सब इन्सपेक्टर श्री. दुरगडे समोर दिसल्यामुळे या अतिरेक्यांनी फायर करुन त्यांना ऑन द स्पॉट मारले होते. त्यानी ही गाडी यू टर्न करुन मेट्रोकडे आणत असताना त्या ठिकाणी दोन क्युआरटीचे जवान उभे होते व पोलीस गाडीतून आपल्यावर हल्ला होत आहेत म्हणून तेही गोंधळले त्या जवानांच्या पाया वर सुध्दा या अतिरेक्यांनी गोळया मारल्या होत्या. त्यामुळे ते जखमी झाले होते. मेट्रो परिसरात फायरिंग सुरु झाल्यामुळे हेड कॉन्स्टेबल श्री. चित्ते हे मेट्रो थिएटर जवळच्या परिसरामधील सर्व लोकांना ,झोपण्यास सांगत होते आणि श्री. चित्ते मात्र उभे राहिले होते. या अतिरेक्यानी श्री. चित्ते यांच्यावर फायरिग केल्यामुळे ते जागच्या जागी मरणं पावले आणि बाकीचे काहीजण मात्र या गोळीबारामुळे जखमी झाले होते. मेट्रो थिएटर आणि रेल्वे लाईनच्या मध्ये एक मशिद असून त्या रस्त्याने रे-ल्वे लाईनपर्यत जाऊन तेथून पुढे ते एरॉस ,ओव्हल मैदान, कुपरेज जक्शन पर्यत गेले होते तेथून मंत्रालयाच्या समोर येऊन डाव्या बाजूला जेथे पक्ष कार्यालये आहेत त्या ठिकाणचे राऊन्ड कव्हर करुन ते ऑबेरॉय हॉटेलकडे जावयास लागले होते. त्या अगोदर त्यांच्या गाडीवर फायरिग करण्यात आल्यामुळे त्यागाडीचे टायर पंक्चर झाल्यामुळे गाडी कन्ट्रोलमध्ये राहत नव्हती म्हणून त्यांनी ही गाडी सोडून दिली होती व त्यांनी दुसरी एक गाडी ताब्यात घेतली होती. त्या गाडीमध्ये दोघेजण पुढे बसले होते आणि एक महिला मागे बसलेली होती त्या तिघांना उतरवून ती स्कोडा गाडी घेऊन ते निघाले होते. श्री.जाधव म्हणून एक

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ....

जण होते ते गोळीबारात जखमी झाले होते पंरतु त्यांचा मृत्यू झाला नव्हता त्यांनी वायरलेसवरुन पोलीस दलाला कल्पना दिली की ,स्कोडा गाडी असून तिचा रंग अमुक आहे आणि ती गाडी ऑबेरॉय हॉटेलकडे गेली आहे तिचा पाठलाग करण्यात यावा त्या दरम्यान शहरामध्ये सगळीकडे बॅरिकेटस लावण्यात आले होते.कसाब आणि इस्माईल गाडीत बसून ॲबेरॉय हॉटेलकडे गेल्यानंतर त्यांच्या असे लक्ष्ंात आले की , समोर बॅरिकेटस लावण्यात आले असून पोलीस तपासणी करीत आहेत त्यामुळे त्यांनी आपला मोर्चा डावीकडे वळवला आणि एनसीपीएकडे गेल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की या पुढे रस्ता नाही त्यामुळे त्यांनी पुन्हा यू टर्न घेतला व ते ऑबेरॉय हॉटेलच्यो मागच्या बाजूने पुन्हा विधान भवना जवळच्या सर्कलजवळ आले तेव्हा त्याना असे समजले की आपण पुन्हा त्याच त्या ठिकाणी येत आहेत . त्या अगोदर येताना त्यानी जो रस्ता पाहिला होता त्या प्रमाणे मंत्रालय आणि तेथून एरॉस थिएटर कडे जाण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला आणि ते मरिन ड्राईव्हजवळ आले त्याठिकाणाहून ते गिरगाव चौपाटीकडे येण्यास निघाले होते त्याचवेळी सुखसागर कॉर्नर जवळ ज्याला बिलोली चौपाटी म्हटले जाते त्या ठिकाणी बॅरिकेटस उभे केले होते . या अतिरेक्यांची गाडी पुढे होती, त्यांच्या मागे एक खंाजगी गाडी होती आणि त्या मागे पोलिसांची गाडी होती. अशा प्रकारे या गाडया त्या दिशेने सुसाट वेगाने निघाल्या होत्या पुढे बॅंरिकेटस उभे केलेले आहेत आणि त्या ठिकाणी पोलीस तपासणी करीत आहेत असे दिसल्यानंतर गाडीत बसलेल्या कसाब याने एके 47 दोन्हीही पायात धरली त्याचे बॅरेल दोन्ही मुठीत धरल्या ......

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ...

आणि समोरून येणाऱ्याला दिसू नये म्हणून त्यांनी त्या गाडीचे प्रखर दिवे चालू केले आणि वायपर देखील चालू केले. जेणे करून गाडीमध्ये कोण बसले आहे ते दिसू नये. सभापती महोदय, मला या ठिकाणी विशेष उल्लेख केला पाहिजे की, एएसआय श्री.तुकाराम ओंबळे हे त्या गाडीच्या जवळ गेल्याबरोबर त्यांच्या लगेच लक्षात आले की, गाडीत बसलेल्या माणसाने हातामध्ये जे काही धरले आहे ते एके 47 गनचे बॅरेल आहे आणि हे लक्षात आल्याबरोबर त्याने त्याच्यावर उडी मारून त्या गनचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी त्या अतिरेक्याने श्री.ओंबळे यांच्यावर त्याच एके 47 गन मधून 5 गोळ्या झाडल्या. त्या गोळ्या अंगामध्ये शिरल्या असतानादेखील श्री.ओंबळे यांनी गनची बॅरल सोडली नाही. मला वाटते मुंबई पोलिसांच्या दृष्टीने बहादुरीची परिसीमा काय असते हे श्री.तुकाराम ओंबळे यांनी दाखविले आहे. असे जवान या मुंबई पोलीस दलामध्ये आहेत, ज्यांनी स्वत:चे प्राण धोक्यात घालून या देशावर हल्ला करणारे कोण आहे ते ध्यानी घेऊन त्याला जीवंत पकडलेच पाहिजे म्हणून हे धाडस केले. त्यात श्री.तुकाराम ओंबळे तर गेलेच त्याचबरोबर उजवीकडे जो ईस्माईल ड्रायव्हिंग करीत होता त्याच्या समोर श्री.बादलकर आणि श्री.संजय गोविलकर म्हणून दोघे पीएसआय होते. इस्माईलने त्या दोघांवरही फायरिंग केले आणि त्या दोघांनी देखील इस्माईलवर गोळ्या झाडून त्याला जागच्या जागी मारले. यातील जो कसाब नावाचा अतिरेकी होता, कदाचित ही एकमेव घटना असेल की, पोलिसांनी राज्याच्या अतिरेक्याला अग्रेशन करताना जीवंत पकडला. कसाबला जीवंत ताब्यात घेण्यासाठी एएसआय श्री.तुकाराम ओंबळे आणि त्यांच्या बरोबरच्या सगळ्या बहादूर शिपायांनी आपले प्राण धोक्यात घालून जे धाडस केले त्यामुळे हा सारा अतिरेकी प्रकार कोणी केला आहे, त्याची उत्पत्ती कोठून होते, ती करण्याची पद्धती काय आहे ? यावर फार मोठा प्रकाश पडला. आणि हे सर्व कृत्य पाकिस्तानातून झाले यावर पूर्णपणे प्रकाश आज पडू शकला. सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, या अतिरेक्यांपैकी दोघेजण सीएसटीकडे गेले, तसेच अन्य दोघेजण टॅक्सीने ओबेरॉय मध्ये गेले. ओबेरॉयच्या बाहेर एक छोटेसे लॉन आहे तेथे एक बॉम्ब ठेवला. तेथून ते आत गेले, तेथे एक गुची नावाचे दुकान आहे त्याच्यावर थोडे फायरिंग केले. उजव्या बाजूला आत जाताना बाहेर एक गार्ड होता, पण त्यांनी आत जाऊन उजवीकडे सामान बेलकॅप्टन आणि तेथे एक दोन महिला होत्या. बेलकॅप्टन आणि त्या महिला यांना पाहून दडायला लागल्यावर त्या अतिरेक्यांनी आत जाऊन

...... 3डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ..

टेबलच्या मागे जाऊन त्यांच्यावर शॉट केले. परत पळत पळत त्यांनी जेथे रिसेप्शन काऊंटर आहे तेथे येऊन त्या काऊंटरवर देखील इनडिस्क्रीमिनेटली फायरिंग केले. त्यात तेथील बऱ्याचशा लोकांना मृत्यूमुखी पडावे लागले. समोर जाऊन पुढे त्या ओबरॉय हॉटेल मध्ये एक ओपियन बेन नावाचा बार आहे तेथे ते अतिरेकी आले आणि तेथे एक सिस्टीमची रूम आहे त्या रूममध्ये जाऊन त्यांनी चार जणांना मारले. हा ट्रायडंटचा भाग होता. तेथून ते मधल्या पॅसेज मधून ओबेरॉय हॉटेलमध्ये गेले. तेथे जाताना मध्ये एक ऑस्ट्रेलियन माणूस होता त्याच्यावर त्यांनी फायर करून त्याला मारले. पुढे माणूस दिसला की, फायरिंग करणे ही त्यांची त्यावेळची नीती होती. ज्यावेळी ते तेथील टिफिनीमध्ये गेले. तेथे जाण्यापूर्वी तेथे त्यांना दोन अमेरिकन महिलांवर देखील फायरिंग केले आणि त्या त्यात जखमी झाल्या. त्यांना नंतर हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले तेव्हा मी त्यांना तेथे भेटायला गेलो होतो. त्यांच्याकडे यासंबंधात विचारणा केली तेव्हा त्यातील एका महिलेने त्यांना पाहिले नव्हते पण दुसऱ्या महिलेने मात्र त्यांना पाहिले होते. तिने आम्हाला सांगितले की, मी त्या दोघांना बघितले आहे आणि ते अमुक मार्गाने आत मध्ये आले. मी बघत होते आणि त्यांच्या हातात गन आहेत हे पाहिल्यानंतर मी मागे वळून पळू लागले असता त्यांनी केलेल्या गोळीबारातील पहिली गोळी मला लागली. त्या महिलेने त्या दोघांचे वर्णनदेखील केले होते. ते दोघे आत मध्ये आल आणि त्यांनी टिफिनी रेस्ट्रॉरंटमध्ये बसलेल्यावर बेधुंद असा गोळीबार केला. आणि त्याचबरोबर एक बॉम्ब तेथेच उजव्या बाजूला काही सिटींग एरिया आहे, जेथे काही झाडे वगैरेही आहेत त्या झ ाडांजवळ नेऊन ठेवला आणि तातडीने हे फायरिंग संपल्यावर वर जाऊन त्यांनी ओबेरॉय हॉटेलमध्ये एक वेट्रो नावाचे एक रेस्ट्रॉरंट आहे त्यात घुसण्याचा प्रयत्न केला. परंतु खाली फायरिंग चालू आहे असे म्हटल्यावर तेथील वेटरने त्या रेस्ट्रॉरंटचे दार बंद करून घेतले होते. त्यामुळे त्यांना कंधारमध्ये जावे लागले आणि कंधारमध्ये जाऊन तेथेही त्यांनी अगदी बेधुंद असा गोळीबार करून तेथील 10 जणांना ओलीस म्हणून ताब्यात घेऊन ते वर 19 व्या मजल्यावर गेले.

( यानंतर श्री. सरफरे .... 3इ 1 ...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

ओबेरॉयनंतर दुसऱ्या बाजूने दोन जणांची टीम लिओपोर्ड कॅफे नावाच्या रेस्टॉरंटजवळ टॅक्सीमधून उतरले. आणि त्यांनी त्याठिकाणी बेधुंद फायरींग सुरु केली. त्या फायरींगमध्ये रेस्टॉरंटमधील दहा लोक मृत्युमुखी पडले. तेथील फायरींग करुन हे दोघे अतिरेकी पळत पळत ताजमहाल हॉटेलच्या मागील बाजूस गेले. या हॉटेलच्या मागील बाजूस नॉर्थ कोर्ट इंट्रस म्हणून एक लहानसा दरवाजा आहे. त्याचा वापर फारसा होत नाही. त्याठिकाणी छोटासा लोखंडी ग्रिलचा दरवाजा आहे. त्या दरवाजावरुन उडी मारण्यापूर्वी त्यांनी त्याठिकाणी असलेल्या गोकुळ नावाचा बारच्या ठिकाणी एक बॉम्ब ठेवला. लिओपोर्ड येथे फायरींग झाले असे समजल्यानंतर ताजमहाल हॉटेलच्या बाहेर सिक्युरिटीसाठी आणि टयुरिझमच्या सिक्युरिटीसाठी एक जीप गाडी ठेवलेली होती. ती गाडी ड्रायव्हिंग करीत या मधल्या गल्लीमध्ये आली. त्यावेळी त्यांना समोर टेरिरिस्ट दिसल्यानंतर त्यांनी या गाडीवर फायरींग केले. फायरींगमध्ये गाडीचे लोखंडी पत्रे फोडून त्या अतिरेक्यांच्या बंदुकीमधील तीन गोळया गाडीमधील पोलिसांच्या पायाला तीन ठिकाणी लागल्या. दोन गोळया कमरेच्या वर असलेल्या पट्टयाच्या स्टीलच्या ब्रॅकेटला लागल्यामुळे ते वाचले. त्यांनी त्याच परिस्थितीत ही गाडी रिव्हर्स घेतली आणि ते कुलाबा पोलीस स्टेशनमध्ये गेले. त्यांनी त्याठिकाणी जाऊन हे वेगळया पध्दतीचे फायरींग आहे, तेव्हा आपण चांगली शस्त्रे घेऊन जा असे सांगितले. दरम्यानच्या काळात हे दोन टेरेरिस्ट भिंतीवर उडी मारुन आत ताज हॉटेलमध्ये शिरले. दुसरा दोन अतिरेक्यांचा असलेला ग्रुप बधवार पार्क येथून निघाला. तो मेन गेटकडे गेला आणि टॅक्सीमधून उतरुन त्यांनी पोर्च आणि गेट वे ऑफ इंडियाच्या मध्ये त्यांच्या हातात असणाऱ्या बॉक्समधील एक बॉम्ब ठेवला. त्यांनी ताजमहाल हॉटेलच्या आत प्रवेश करुन बेधुंद फायरींगला सुरुवात केली.

सभापती महोदय, आणखी दोन अतिरेक्यांचा ग्रुप तिसऱ्या बाजूने नरीमन भवनकडे गेला. आणि त्यांनी नरीमन भवनच्या अलिकडे असलेल्या पेट्रोल पंपच्या ठिकाणी एक बॉम्बचा बॉक्स ठेवला. नरीमन भवनच्या पायथ्याला त्यांनी एक बॉम्बचा बॉक्स ठेवला. आणि ते नरीमन भवनच्या तिसऱ्या मजल्यावर चढले. नरीमन भवनमध्ये गॅब्रिल हॉर्सबर्ग नावाचे ज्यू ज्यांना रबाई म्हणतात ते आपल्या पत्नीसोबत रहात होते. त्यांच्यासोबत दोन वर्षाचे लहान मूल होते. साधारणपणे त्याठिकाणी पाचजण रहात होते. त्याठिकाणी हे दोन अतिरेकी शिरले आणि त्या सर्वांना त्यांनी बंदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

ठेवले. दरम्यानच्या काळात त्या घरात सँड्रा सायमन नावाची एक काम करणारी मोलकरीण होती. आणि जेवण करणारा एक चौदा-पंधरा वर्षाचा झाकीर नावाचा कुक होता, त्याला जॅकी नावाने ओळखले जाते. हे दोन नोकर कदाचित दुसऱ्या मजल्यावर असतील. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी तिसऱ्या मजल्यावरुन दोन वर्षाचे हे लहान मूल रडत खाली आले तेव्हा त्या अतिरेक्यांच्या लक्षात आले की, हे लोक झोपलेले आहेत किंवा त्यांचे कदाचित लक्ष नाही. त्यावेळी त्या दोन वर्षाच्या मुलाला घेऊन दुसऱ्या मजल्यावरुन हे दोघेही अतिरेकी उतरुन बाहेर आले.

सभापती महोदय, हा सर्व घटनाक्रम मी याठिकाणी याकरिता सांगितला की, एकंदर या घटनेमध्ये अतिरेक्यांनी मुंबईच्या जमिनीवर पाय ठेवल्यानंतर आणि टॅक्सीमध्ये बसून डेस्टिनेशनवर पोहोचून फायर ओपन करीपर्यंत त्यांनी ईकडे-तिकडे जाण्यामध्ये फार मोठा कालावधी गेला नाही. ते रात्री सव्वा किंवा साडे आठला उतरल्यानंतर तासाभराच्या अंतराने या सर्व ठिकाणी त्यांचे फायरींग सुरु झाले. हे याठिकाणी सांगणे आवश्यक आहे.यामध्ये आपला रिस्पॉन्स टाईम काय होता? याबाबत आपल्या सर्वांच्या मनामध्ये प्रश्न आहेत हे मला माहीत आहे. त्यामुळे मुंबई पोलिसांचा रिस्पॉन्स टाईम किती होता हे सुध्दा आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. ताजमहाल हॉटेलच्या पुढील भागामधून अतिरेक्यांनी रात्री 9 वाजून 38 मिनिटांनी पहिला प्रवेश केला. तसेच, दुसऱ्या ग्रुपने हॉटेलच्या मागील बाजूस असलेल्या नॉर्थ कोर्टच्या दरवाजामधून रात्री 9 वाजून 43 मिनिटांनी हॉटेलमध्ये प्रवेश केला. लिओपोर्डच्या ठिकाणी फायरींग सुरु आहे असे समजल्यानंतर पहिला रिस्पॉन्स श्री. निवृत्ती गव्हाणे, पोलीस नाईक यांचा टुरिझम व्हेहिकलमधून आला. त्यांना ही बातमी समजल्यानंतर तात्काळ त्याठिकाणी जात असतांना त्यांना अतिरेक्यांच्या गोळयांना सामोरे जावे लागले.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

तो क्षण साधारणपणे 9.42 च्या दरम्यानचा होता. लिओपोर्डचे फायरींग 9.41 ला झाले. म्हणजे साधारणपणे एक ते दीड मिनिटामध्ये कदाचित त्याला कळले असेल. त्यांची गाडी चालूच असते. त्यांचे गस्त घालण्याचेच काम असते. गाडी टर्न करुन या गल्लीत लिओपार्डकडे जाण्यासाठी तो आला आणि त्याला फायरींगला तोंड द्यावे लागले. विश्वास नांगरे पाटील, डी.सी.पी. हे 9.55 वाजता ताज हॉटेलमध्ये आत गेले. ॲडिशनल सी.पी. श्री. नागराळे त्यांचे सीआरपीएफ चे 7 ते 9 लोकांचे एक सेक्शन असते त्यांना घेऊन, पी.एस.आय. मनोहर पाटील वगैरे सगळ्यांना घेऊन 10 वाजून 15 मिनिटांनी विश्वास नांगरे यांच्या मदतीसाठी त्या ठिकाणी आले. या सेक्शनमधील साधारणपणे 3 ते 4 एसआरपीएफचे कॉन्स्टेबल हे विश्वास नांगरे यांना मदत करण्यासाठी गेले. आत कोठे किती जण आहेत हे माहीत नसल्यामुळे ॲडिशनल सी.पी. नागराळे यांच्या बरोबर जे 3 ते 4 जवान होते ते लोकांना बाहेर काढण्यामध्ये गुंतले. विश्वास नागरे यांच्या बरोबर राहूल शिंदे, समाधान मोरे गेले त्यांच्यातील श्री. राहूल शिंदे मृत्युमुखी पडले, समाधान मोरे जखमी झाले. विश्वास नांगरे आत गेले. ते दुसऱ्या मजल्यापर्यंत गेले. त्यावेळी तिसऱ्या-चौथ्या मजल्यावर अतिरेकी होते. खालून यांनी फायरींग करण्यास सुरुवात केल्यावर अतिरेक्यांना हा पहिला शॉक होता की, इतक्या कमी क्षणात पोलिसांचा रिस्पान्स येऊ शकतो. विश्वास नागरे पाटील हे धाडसाने तातडीने दुसऱ्या जिन्याने सहाव्या मजल्यापर्यंत पोहोचले. सहाव्या मजल्यावर जाऊन सहाव्या मजल्यावरुन पाचवा, चौथा, तिसरा, दुसरा सगळे मजले बघत बघत ते खाली आले. त्यावेळी मात्र त्यांची आणि अतिरेक्यांची समोरासमोर भेट झाली नाही. ते खाली आले आणि खाली आल्यानंतर पुन्हा वरुन खाली बॉम्ब पडावयास लागले. बॉम्ब पडावयास लागल्यानंतर दुसऱ्या मजल्यवरील सीसीटीव्हीच्या रुममध्ये जाऊन ते निरीक्षण करावयास लागले त्यावेळी 4 अतिरेकी आहेत असे त्यांच्या लक्षात आले. त्यांना मी सांगितल्याप्रमाणे बाहेरुन श्री. नागराळे आणि सीआरपीएफचे लोक यांची तात्काल मदत उपलब्ध झाली. डी.सी.पी. श्री. राजवर्धन हे 10 वाजून 35 ते 40 मिनिटाच्या दरम्यान पोहोचले. कुलाबा पोलीस स्टेशनचे पी.एस.आय. श्री. ढोले, पी.एस.आय. श्री. काकडे त्यांच्या बरोबर होते. कुलाबा पोलीस स्टेशनचा इतर स्टाफ सुध्दा त्यांच्याबरोबर होता. ते मात्र

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. जयंत पाटील .....

बुलेटप्रूफ जाकेट घेऊन गेले होते. ते सेल्फ लोडींग रायफल्स घेऊन गेले होते. कारण निवृत्ती गव्हाणे पोलीस स्टेशनला जाऊन सांगून आले की, हे जरा वेगळे दिसते. त्यामुळे पूर्ण साधनासहीत डीसीपी राजवर्धन आणि पीएसआय ढोले आणि काकडे सगळे गेलेले होते. सुखविंदरसिंग ए.टी.एस.चे अडिशनल सी.पी. आणि ए.टी.एस. चा स्टाफ हा साधारण 11.00 ते 11 वाजून 10 मिनिटांनी पोहोचला. हा सगळा प्रकार बघितल्यावर राकेश मारिया यांनी डी.जीं.ना सांगितले आणि डी.जीं.नी सी.एस.ला सांगितले. डी.जी. स्वत: नेव्ही आणि आर्मीशी बोलले. राकेश मारिया यांनीही नेव्हीचे कमांडर श्री. भुतानी यांच्याशी बोलून त्यांची कुमक मागविण्याचा आपण प्रयत्न केला. कारण एकंदर हँड ग्रेनेडस् आणि ए.के. 47 अशी सगळी साधने समोर असल्यामुळे हे छोटेसे युध्द आहे हे लक्षात आले. आपण तातडीने आर्मीला सांगितले. आर्मीने त्यांच्याकडे कमांडो नाहीत असे सांगितले. त्यामुळे आपण नेव्हीशी बोललो. नेव्हीचे जे मार्कोज आहेत त्यांना आम्ही परत पाठवतो असे नेव्हीचे कमांडर श्री. भुतानी यांनी 11.43 वाजता स्वत: फोन करुन सांगितले. 2 वाजून 14 मिनिटांनी मार्कोज त्या ठिकाणी उपस्थित झाले. 3.00 ते 3.30 वाजता मिल्ट्री त्या ठिकाणी आली. सभापती महोदय, सीआरपीएफशी बोलणे केलेले होते. साधारणपणे 11 वाजून 26 मिनिटांनी कमांडर भुतानींशी बोलणे केले होते. नवी मुंबईतील तळोजा येथे सीआरपीएफचे स्टेशन आहे तेथून जवळपास 2.30 च्या दरम्यान ताज, ओबेराय आणि नरीमन हाऊस या ठिकाणी ते पोहोचले. या ठिकाणी हे सांगितले पाहिजे की, मारिया यांनी पोलीसच्या डी.जीं.ना कळविले. ते केंद्रीय गृहमंत्र्यांशी 11.30 ते 12.00 च्या दरम्यान बोलले. एनएसजी पण पाहिजे असे त्यांनी त्यावेळी सांगितले. एनएसजी 2 वाजून 10 मिनिटांनी दिल्लीवरुन निघाली आणि 4 वाजून 40 मिनिटांनी मुंबईत पोहोचली. ब्रिग्रेडियर सिसोदिये, एअरपोर्टला एनएसजी आल्यानंतर पहिल्यांदा राजभवनवर ब्रिफींग झाले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

विशेषत: तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांनी त्या परिस्थितीचा आढावा घेतला आणि ब्रिगेडियर सिसोदिया हे 6.30 वाजता कोठे काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी ते मुंबई पोलिसांकडे आले. त्यानंतर सगळे एनएसजीच्या जवानांना मुंबईमध्ये मंत्रालयासमोर रात्रौ 8 ते 8.30 वाजता फायनल ब्रिफिंगसाठी आणण्यात आले. 30 मिनिटांच्या ब्रिफिंगनंतर 9 ते 9.15 वाजता त्यांनी असे सांगितले की, आमच्या जवानांची संख्या एवढी असल्यामुळे त्यामुळे आम्ही सध्या दोन ठिकाणची परिस्थिती हॅण्डल करतो. त्यामुळे ताज, ओबेरॉय आणि जेथे हॉस्टेसची संख्या जास्त असण्याची शक्यता आहे त्याठिकाणी एनएसजीची कुमक पाठविण्यात आली. ओबेरॉय हॉटेलमधून रात्री 21.57 ला फायरिंग झाल्याचा कंट्रोल रुमला पाहिला रिपोर्ट आला. त्यानंतर 9 मिनिटांनी अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री.विनय कारगावकर आणि अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री.व्यंकटेश हे दोघेही नऊ ते साडेनऊ मिनिटामध्ये त्याठिकाणी पोहोचले. मला आपल्या हे निदर्शनास आणावयाचे आहे की, समोर कोणती साधने आहेत, कोणती हत्यारे आहेत याची तमा न बाळगता या सगळया जवानांनी आपल्या हातातील शस्त्रानिशी त्याचा धाडसाने मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये 18 जणांना आपल्या प्राणास मुकावे लागले. त्यांनी धाडस दाखवून मुंबईच्या जनतेचे प्राण वाचविण्यासाठी स्वत:च्या जीवाचे बलिदान दिले. हे करीत असताना सर्वच जवानांनी ज्या पध्दतीने ही लढाई लढली आहे त्याचा शासनाला अभिमान आहे. या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी आपण इक्वीप नसतो. अशाप्रकारच्या आतंकवादी हल्ल्याला तोंड देण्याचा यापूर्वी अनुभव नव्हता आणि त्यांचे प्रशिक्षणही झालेले नसते. त्यामुळे सगळया घटनांना तोंड देत असताना मला हे सांगितले पाहिजे की, मुंबई पोलिसांना एखाद्या परिस्थतीचा सामना करण्यासाठी विशेष प्रशिक्षण किंवा माहिती दिलेली असते. हे सर्व पाहिले तर सर्वसाधारणपणे रॉयट कंट्रोल, डिझास्टर मॅनेजमेंट, सिव्हील डिस्टर्बन्स स्कीम, बॉम्ब ब्लास्ट, क्वीक रिस्पॉन्स टीम, या घटनेमध्ये काही ठिकाणी ही टीम ताबडतोबीने पोहोचली होती. या सगळयांना या सर्व मोठया साधनांसह अर्बन गुरीला वॉर लढण्यासाठी यापूर्वी प्रशिक्षण देण्याचा प्रश्न आला नाही. अशाप्रकारची घटना ही थोडीशी वेगळया प्रकारची होती, युध्दजन्य परिस्थिती होती. हे मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

जे बॉम्बे होते ते कोठे कोठे ठेवले होते त्याबाबत मघाशी मी सांगितले आहे. गोकुळ हॉटेलजवळ, ताज हॉटेल, गेट वे जवळ आणि सीएसटी जवळील बॉम्बचे स्फोट झाले नाहीत. बॉम्ब डिटेक्ट झाल्यानंतर गोकुळ हॉटेल येथील, ताज हॉटेल, गेट वे यांच्यामध्ये जो बॉम्ब होता हे सर्व बॉम्ब निकामी करण्यामध्ये यश मिळविले. सी.एस.टी.स्टेशन जवळील बॉम्ब होता तो निकामी करीत असताना तेथील डेड बॉडीज काढताना त्या सगळयांचे ते सामान आहे असे समजून त्या बॅगा गडबडीत एका खोलीत आणून ठेवण्यात आल्या होत्या. त्यात तो बॉम्ब होता, परंतु त्याचा स्फोट झाला नाही. कसाबने बॉम्ब सेट केला होता त्याप्रमाणे इस्माईलला बॉम्ब सेट करणे शक्य झाले नसावे. त्यामुळे त्याचा स्फोट झाला नाही किंवा काही कारणामुळे त्याचा स्फोट झाला नाही. ओबेरॉयमध्ये दोन बॉम्ब होते त्यांचे स्फोट झाले, भायखळा येथे एका टॅक्सीमध्ये स्फोट झाला, विलेपार्ले येथे एका टॅक्सीत बॉम्ब स्फोट झाला, नरिमन हाऊसजवळ पेट्रोल पंपाजवळ बॉम्ब ठेवला होता त्याचा बिल्डिंगच्या खाली स्फोट झाला. ताज महालच्या ओल्ड विंगमध्ये जो बॉम्ब स्फोट झाला त्यामुळे डोम बरेच डॅमेज झाले आहे. 10 पैकी 3 बॉम्ब डिटेक्ट झाले. ओबेरॉय हॉटेलमध्ये जो बॉम्ब डिटेक्ट झाला होता त्यावर शिल्ड ठेवलेले होते. पण शिल्ड ठेवलेले असतानाच त्या बॉम्बचा स्फोट झाला. ते शिल्ड बाजूला फेकले गेले. परंतु तेथे बॉम्ब आहे हे डिटेक्ट झाले होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील पुढे सुरु....)

त्यांनी वापरलेली हत्यारे, साधने ही सर्व तपासण्यात आली. त्यांच्याकडे 9एमएमचे पिस्तुल होते. ते पाकिस्तानातील पेशावर येथील फॅक्टरीमध्ये तयार झालेले आहे. बॉम्ब हे ऑस्ट्रेलियातील कंपनीमध्ये तयार झालेले आहेत. ऑस्ट्रेलियातील कंपनी आणि पाकिस्तानचे कोलॅबरेशन होते. या हल्ल्याचा कट पाकिस्तानामध्ये करण्यात आल्याचे वेगवेगळे पुरावे उपलब्ध झालेले आहेत. ही साधने पाकिस्तानामध्ये मिळवून ती येथ पर्यन्त आणली गेली हे या ठिकाणी सांगण्याची आवश्यकता आहे. कसाबच्या टॅक्सी बाबत मी सांगितले. ते दोन-दोनच्या जोडीत होते. एक बॉम्ब दुस-या टॅक्सीत असणार आहे. उरलेल्या बॉम्बचे लोकेशन मी सांगितले. एकूण 10 बॉम्ब होते. ओबेरॉय हॉटेलमध्ये 2, ताज हॉटेलमध्ये मागे-पुढे 2, सीएसटी स्थानक, नरीमन हाऊस येथील पेट्रोलपंप अशा ठिकाणी बॉम्ब ठेवले होते. भायखळा येथे देखील एक्स्प्लोझन झाले. यापूर्वी अशा प्रयकारचे हल्ले इस्लामाबाद मध्ये जे.डब्ल्यू मेरिअट येथे झाले. 2001मध्ये अल-कायदाने यूयॉर्कमध्ये बोटीने जाऊन हॉटेल वेल्डोफ ॲस्टोरिया, रिच कार्टर, दोन टनेल, हेलीपोर्ट आणि बिझनेस सेंटर या ठिकाणी हल्ला करण्याचा कट रचला होता. चार-पाच ठिकाणी एकाच वेळी हल्ला करण्याचा त्यांचा प्लॅन होता. परंतु त्यांच्यातील एक टेररिस्ट जिवंत पकडला गेल्यामुळे हा प्लॅन उघडकीस आला. मला हे सांगावयाचे आहे की, एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ले करण्याचा प्लॅन जगामध्ये एका ठिकाणी आखला गेला होता आणि तीच पध्दत मुंबईमध्ये अनुसरली गेली. यातून काही प्रश्न तयार होतात. आपल्या देशामध्ये असे किती हल्ले झाले ? .....

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

यापूर्वी गुजरातमधील अक्षरधाम येथे अशाच प्रकारचा अतिरेकी हल्ला झाला आहे. दिनांक 24 सप्टेंबर,2002 रोजी अक्षरधामवर दुपारी 4.30 वाजता अतिरेक्यांनी हल्ला केला होता. हा हल्ला दोन अतिरेक्यांनी केला होता. त्या ठिकाणी एनएसजी आणि अतिरेक्यांमध्ये सतत 16 तास गोळीबार सुरु होता. त्या अतिरेकी हल्ल्यामध्ये 29 भाविक मृत्यूमुखी पडले. 79 भाविक जखमी झाले. त्यात दोन अतिरेकी मारले गेले. दिनांक 13 डिसेंबर, 2001 रोजी संसदेवर अतिरेक्यांनी हल्ला केला. पाच अतिरेकी संसदेवर हल्ला करण्यासाठी आले होते. परंतु त्या अतिरेक्यांना संसदेच्या आत जाता आले नाही. कंपाऊंड आणि लोकसभेची गोल इमारत यामध्ये ओपन स्पेस आहे. त्या ओपन स्पेसमुळे अर्ध्या-पाऊण तासात अतिरेक्यांना संपविण्याचे काम तेथील तत्कालिन सुरक्षा रक्षकांनी केले. मुंबईत हे अतिरेकी उंच इमारतीमध्ये शिरल्यामुळे त्यांना उंच ठिकाणी लपण्यासाठी जागा होती. त्यामुळे एनएसजी आणि अतिरेकी यांच्यामध्ये जवळपास 58 तास कनफ्लीट झाले. या परिस्थितीमुळे काही विशेष मुद्दे आणि काही सुरक्षिततेच्या बाबी पुढे आल्या आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. हा जो हल्ला झाला, त्या हल्ल्याला उपलब्ध असलेल्या शस्त्रानिशी तोंड देण्याचा पोलीस आणि इतर यंत्रांनी प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न करीत असताना आम्ही अतिशय उत्तम आणि धाडसी जवान गमाविले. पण जी साधने आम्ही वापरली, आमचा रिस्पॉन्स टाईम कमी होता. आमचा रिस्पॉन्स टाईम 7 मिनिटे, 10 मिनिटे, 15 मिनिटे असा होता. परंतु आमचे जवान हल्ला परतविण्यासाठी जाताना त्यांच्याकडे ही साधने नव्हती. आमच्याकडे क्विक रिस्पॉन्स टीम आहे, त्यांच्याकडे बुलेटप्रुफ जॅकेटस् आहेत, हेल्मेट आहेत, एके-47 च्या गन्स आहेत. परंतु ती शस्त्रे येईपर्यंत पहिल्या मिनिटांमध्ये जे काही नुकसान व्हावयाचे होते ते होऊन गेले होते. सी.एस.टी., ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल, नरीमन भवन या ठिकाणी पहिल्या मिनिटात जे नुकसान व्हावयाचे होते ते होऊन गेले होते. सुरुवातीच्या काळात फार मोठे नुकसान झाले आहे. आपले पोलीस घटनास्थळी पोहोचल्या नंतर एक्सेंज फायर सुरु झाले. पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर मात्र नुकसान कदाचित कमी झाले असेल. अतिरेक्यांनी प्रत्येक ठिकाणी आत प्रवेश करताना जो गोळीबार केला त्यात मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. सी.एस.टी.रेल्वे स्टेशनात प्रवेश केला नंतर तेथील प्लॅटफॉर्मवर बसलेल्या गोरगरीब प्रवाशांवर अतिरेक्यांनी हकनाक गोळीबार केला, त्या गोळीबारामध्ये मोठया प्रमाणात मनुष्यहानी झाली.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 17:40

श्री. जयंत पाटील...

याबाबतीत माझ्या समोर देखील काही प्रश्न निर्माण झाले आहेत, त्या बाबतीत सभागृहात देखील चर्चा उपस्थित केलेली आहे. आपल्याला लक्षात घेतले पाहिजे की, सदर अतिरेक्यांनी 592 नॉटीकल माईल्स प्रवास त्यांनी केला, त्यांनी सतत तीन दिवस प्रवास केला. नेव्ही, कोस्टल गार्ड आणि मुंबई पोलीस या तिघांचे सागरी माईल्सवर नियंत्रण असते. आपली 12 नॉटीकल माईल्सपर्यंत रेंज आहे, 200 नॉटीकल माईल्सपर्यंत कोस्टल गार्ड काळजी घेत असते आणि त्यापुढे इंटरनॅशनल वॉटर्स त्यानंतर नेव्ही यासंबंधीची काळजी घेत असते. 580 नॉटीकल माईल्सची इंडियन नेव्हीची सीमा ओलांडून, इंडियन नेव्ही आणि कोस्टल गार्ड यांची नजर चुकवून एक छोटेसे जहाज आत आले. 12 नॉटीकल माईल्स ओलांडून ते 4 नॉटीकल माईल्सपर्यंत ते आले. या घटनेमुळे नवीन आव्हाने उभी राहिली आहेत याची मला जाणीव आहे. 720 कि.मी.समुद्र किनारा आहे. तो 12 नॉटीकल माईल्स आत आहे. 15 हजार चौरस किलोमिटरमध्ये पोलिसांना लक्ष ठेवणे आणि समुद्रातून जाणा-या आणि येणा-यावर लक्ष ठेवणे हे काही सोपे काम नाही. समुद्रामध्ये पोलिसांच्या वतीने 12 बोटी ठेवल्या होत्या, त्यातील 7 बोटी चालू होत्या, 5 बोटी बंद होत्या. समुद्रात एखादे संशयास्पद जहाज दिसले तर त्यात कोणता माल आणला आहे, स्मगलिंगचा माल आणला आहे काय ? या गोष्टींचे चेकींग करण्याचे काम पोलीस आणि कोस्टल गार्ड संयुक्तरित्या करीत असतात. समुद्रात कोस्टल गार्डनंतर आपली जी रेंज आहे त्यात अत्याधुनिक व्यवस्था निर्माण करण्याशिवाय काही गत्यंतर नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.........

आजपर्यंत आपण कोस्टवरची, समुद्रावरची पोलीस ठाणी बळकट करावीत याविषयी वेगळी भूमिका मांडली. सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी 12 पोलीस ठाणी, 24 आऊट पोस्ट आणि 33 चेक पोस्ट निर्माण करण्याचा जानेवारी, 2007; फेब्रुवारी, 2007 आणि फेब्रुवारी, 2008 मध्ये निर्णय केला. त्यासाठी प्रशासकीय मान्यता देऊन 2.15 कोटी रुपये खर्च करण्यासाठी दिलेले होते. या सगळया 12 पोलीस ठाणी, 24 आऊट पोस्ट आणि 33 चेक पोस्ट निर्मिती करण्याचे काम सुरु केले आहे. आम्हाला खात्री आहे, सध्याची जी घटना घडली त्यातून लक्षात येते की, सागरी सुरक्षा करण्यासाठी संपूर्ण पोलीस दलाची सीमा लँड वर्ल्ड नसून समुद्राची साईट विचारात घेऊन पोलिसांची गस्त अधिक केंद्रीत केली पाहिजे आणि साधने दिली पाहिजेत ही गरज पुढे आली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी काल सदनामध्ये शासनाच्या हेच निदर्शनास आणले होते. तत्कालीन गृहमंत्र्यांनी हे सर्व पैशासहित आम्ही सहा महिन्यात करु आणि समुद्र मार्गाने होणाऱ्या हल्ल्याची जाणीव वगैरे ते बोलले होते. मंत्रीमहोदय म्हणाले की, आम्ही आता करणार आहोत. हे चुकीचे निवेदन होत आहे. शासनाने जे सांगितले होते ते मी निदर्शनास आणले. म्हणून मी हक्कभंग दाखल करतो असे सांगितले. ही विसंगती होत आहे. पूर्वीच्या गृहमंत्र्यांनी वेळेवर का अंमल केला नाही हे आम्हाला जाणून घेतले पाहिजे. मंत्रीमहोदयांनी पोलिसांच्या बहादुरीबद्दल सांगितले त्यामुळे आम्हाला आनंद झाला. परंतु विजय साळसकर हे नेहमी त्यांच्याकडे एके-47 वापरत असत, ती का काढून घेण्यात आली? ती एके-47 त्यांच्याकडे असती तर कदाचित पुढचे रामायण घडले नसते. मंत्रीमहोदयांच्या निवेदनात हा मुद्दा स्पष्ट झाला पाहिजे एवढीच आमची अपेक्षा आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वृत्तपत्रात आम्ही असे वाचले की, ताज हॉटेलमध्ये अतिरेकी अनेक महिन्यापूर्वी येऊन राहिले होते. ताज हॉटेलमध्ये काम करणाऱ्या वेटरने आपल्या घरी फोन करुन सांगितले की, ज्याने माझ्यावर पिस्तुल झाडले तो माझ्याबरोबर 7-8 महिने काम करीत होता. याबाबत निवेदनात काही स्पष्टता आलेली नाही. आम्ही सभागृहात बोलत असताना सांगितले होते की, ही गोष्ट खरी आहे की काल्पनिक आहे?

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.........

श्री.जयंत पाटील : ताज आणि ओबेरॉयच्या सगळ्या स्टाफला आणि आत असलेल्या सगळ्या गेस्टसना इंट्रोगेट करुन त्यांची स्टेटमेंट घेतली आहे. अशा स्वरुपाची बाब निदर्शनास आलेली नाही. अशा प्रकारच्या बऱ्याच गोष्टी मी पण ऐकल्या. पण जी गोष्ट सन्माननीय सदस्यांनी सांगितली त्याबाबत क्रॉस व्हेरिफीकेशन केले आहे. त्यात काही तथ्य नाही असे आढळले आहे. पोलिसांनी हॉटेलमधून बाहेर पडणाऱ्या प्रत्येकाशी डायलॉग केला. आतील सगळ्या जिवंत असणाऱ्या स्टाफशी इंट्रोगेट केले आहे. हॉटेलमध्ये ज्यांनी काम केले, ज्यांनी कामासाठी हॉटेलमध्ये प्रवेश घेतला, त्या काळात ज्यांनी हॉटेल सोडले किंवा सोडले नाही त्यांची बॅक हिस्टरी तपासून लोकेट केले आहे. अशी कोणतीही परिस्थिती आढळून आली नाही. साधारणपणे ताज हॉटेलमध्ये जवळपास सर्व ठिकाणी सी.सी टी.व्ही. असल्यामुळे सी.सी.टी.व्ही.चे फुटेज उपलब्ध आहे. कुठेकुठे काय काय ॲक्टिव्हीटी झाल्या त्यापैकी 70-80 टक्के माहिती उपलब्ध आहे. रेकॉर्ड आणि मिळालेली माहिती यामध्ये साधर्म्य असल्याचे आढळले आहे. ताजमध्ये जवळपास सगळीकडे सी.सी.टी.व्ही.उपलब्ध होते.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : ताज हॉटेलमधून फायर ब्रिगेडच्या माध्यमातून ज्या ज्या लोकांना सकाळी 4.30 वाजता बाहेर काढले त्या सर्वांची आपण विचारपूस केली काय ? माझ्या माहितीनुसार त्या सर्वांना इंट्रॉगेट केलेले नाही.

श्री. जयंत पाटील : होय, ताजमधून बाहेर काढल्यानंतर त्या लोकांना विचारपूस केली व नंतरच सोडण्यात आले. या सर्व काळात आपले हेमंत करकरे .......

ॲड. अनिल परब : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, सकाळी 4.30 वाजता जे गेस्ट बाहेर पडले त्यांना विचारपूस केलेली नाही.

श्री. जयंत पाटील, माझी सन्माननीय सदस्यांना अशी विनंती आहे की, माझे उत्तर पूर्ण संपल्यानंतर मागे जाऊन प्रश्न विचारला तरी मी सभागृहाला माहिती देईल. कृपया माझे उत्तर अगोदर पूर्ण करु द्यावे. या ठिकाणी चर्चा करीत असताना एटीएसचे प्रमुख श्री. हेमंत करकरे यांचा उल्लेख करताना असे सांगण्यात आले होते की, त्यांच्यावर फायरिंग झाली तेव्हा त्यांनी बुलेटप्रुफ जॅकिट घातलेले नव्हते, हेल्मेट नव्हते म्हणून त्यांना बुलेटस लागल्या, असेही येथे सांगण्यात आले. परंतु माझ्याकडे त्यांच्या पोस्ट मार्टेमचा रिपोर्ट आहे. त्यानुसार मला असे सांगावयाचे आहे की, बुलेटप्रुफ जॅकिट म्हणजे समोरुन एक प्लेट आपल्या अंगात इनसर्ट होते आणि मागून एक प्लेट इनसर्ट होते, त्याची थिकनेस साधारणत: 9 एमएमपेक्षा जाड असते. बुलेटप्रुफ जॅकिट घातले असताना 10 मीटरवरुन जर एक-47 ने गोळी झाडली तरच ती पेनिट्रेट होऊ शकते, 100-150 मीटरवरुन गोळी लागली तर ती पेनिट्रेट होत नाही अशी माहिती मला मिळाली. तसेच हे जॅकिट 100 टक्के प्रुफ असते परंतु जास्त अंतरावरुन गाळी लागली तरच ते सेफ असते, 5-10 मीटरवरुन गोळी लागली तर जॅकिटमधून सुध्दा गोळी लागू शकते. वास्तविक 5-10 मीटरवरुन 303 ने जरी गोळी मारली तरी पेनिट्रेट होऊ शकते. ज्यावेळेस हेमंत करकरे शहीद झाले त्यावेळेस त्यांना प्लेटच्या वरच्या भागात साधारण तीन शॉट्स आणि डाव्या खांद्याला 5 शॉट्स लागले आणि ज्यावेळेस त्यांची बॉडी काढली त्यावेळेस पुन्हा एक फायरिंगची गोळी वरच्या बाजूने लागली असावी हे दिसून आले, अशा प्रकारे त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळेस बुलेटप्रुफच्या वरुन गोळ्या लागल्याचे लक्षात आले म्हणून त्यांचा मृत्यू झाला. यासंबंधीची माहिती घेत असताना बुलेटप्रुफ जॅकिटसंबंधीची बारीक-सारीक माहिती मी घेतली. अशा प्रकारचे 885

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ......

बुलेटप्रुफ जॅकिट्स आपल्याकडे मुंबई पोलिसांकडे आहेत आणि 450 बुलेटप्रुफ जॅकिट्स अदर दॅन मुंबई रिजन्ससाठी घेतलेले आहे. त्यांच्या प्रोटेक्शनची क्षमता समोरुन आणि मागून थोड्या अंतरावरुन मारा केला तरच गोळी लागते परंतु अंतरावरुन मारली तर ते जॅकिट सेफ असते. सर्वांग सेव्ह या जॅकिटमुळे होत नाही. तसेच हे बुलेटप्रुफ जॅकिट्स खरेदी करण्यासंबंधीची प्रोसेस मी पाहिली तर ती योग्य प्रकारे ॲडॉप्ट केल्याचे मला दिसून आले. त्यानुसार पाच वर्षानंतर त्याचे लाईफ संपत असेल अशा जॅकिट्स रिप्लेस करण्यात आल्या आहेत. आपल्याकडे सर्वात महत्वाचे म्हणजे एटीएसचे 242 लोक मुंबईत आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी 220 लोक असे एकूण 462 लोक एटीएसमध्ये आहेत. त्यांच्याकडे एके-47 सारखी हत्यारे आहेत.......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

यांच्याकडे एके 47 गन्स् आहेत, ग्लॉक पिस्तूल सुध्दा आहे एमपी 5 चे व्हेपन एनएसजीच्या कमांडोकडे होते. अशी शस्त्रे देखील त्यांच्याकडे होती. सभापती महोदय, हा प्रश्न राहतो की, आपल्यावर अशा प्रकारचा हल्ला होणार आहे, अशी माहिती आलेली असतांनाही ॲक्शन घेण्यात आली नाही असे काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केलेले आहेत. . जुलै, 2006 मध्ये एक ॲडव्हायजरी आली होती की, बीएआरसी, नाईटक्लब बार, रिलीजिअस यात्रा यांच्यावर धोका आहे अशा प्रकारच्या ॲडव्हायजरीज त्यावेळचे डी.जी श्री. पसरीचा यांच्याकडे आल्या होत्या, त्यांनी ती सी.पी अनामी रॉय यांच्याकडे पाठविली होती अशा प्रकारच्या वेळोवेळी ॲडव्हायजरीज आल्या होत्या. अलिकडच्या काळात जी ॲडव्हायजरीज आली होती, त्यामध्ये कोस्टलँडवरुन काही होऊ शकते अशी ॲडव्हायजरीज सन 2006 मध्ये आली होती. मधील काळात ॲडव्हायजरीज यायच्या परंतु आम्ही तुम्हाला परत रिकन्फर्म करतो, कोलॅब्रेट करुन सांगतो अशा स्वरुपाचेही उल्लेख काही ठिकाणी आलेले आहेत. या ॲडव्हायजरीज मिळत असतांना सीबीआय हेड ऑफीस दिल्ली, ॲटोमिक प्लँट मुंबई अशी वेगवेगळी लोकेशन्स सांगून फेब्रुवारी 2007 मध्ये देखील अशा ॲडव्हायजरीज आलेल्या आहेत. मे,2008 ची एक ॲडव्हायजरी आहे. इस्लामाबाद येथील मॅरीएट हॉटेलवर 26 ऑगस्टला जो हल्ला झाला होता त्यानंतर 27 सप्टेंबरला एक ॲडव्हायजरीज आलेली होती त्यामध्ये ताजमहल हॉटेल, सरदार वल्लभ भाई पटेल स्टेडियम अशा काही ठिकाणी लष्कर-ए-तोयबाचा धोका होऊ शकतो अशी ॲडव्हायजरीज आली होती. आम्ही लोकेशन रिकन्फर्म करुन ॲडव्हायजरीज देऊ असे त्यावेळी सुध्दा सांगण्यात आले होते. या ॲडव्हायजरीजच्या आधारे डीसीपी विश्वास नांगरे पाटील यांनी ताजमहल येथे जाऊन त्या ठिकाणची सिक्यूरीटीजची जी टीम आहे त्यांच्या बरोबर तीन तास बैठक घेतली होती व त्या ठिकाणच्या कोपरान्कोप-याची त्यांनी माहिती घेतली होती. यासंदर्भात त्या टिमला काही ॲडव्हाईज दिले होते. ज्या नॉर्थ कोर्टकडून एंट्री केली जाते, त्या गेटची हाईट वाढवा व त्या ठिकाणी ब्लॉकेज जास्त वाढवा, मागून कोणी येणार नाही याची खात्री करा असे त्यांनी सांगितले होते. पुढच्या बाजुने एंट्री करतांना गाडी आत न जाता बाहेरच मेटल डिटेक्टरने डिटेक्ट

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

करा व या दरम्यानच्या काळात समोरच्या बाजूला टुरीझमची जी गाडी हेती त्यामध्ये इन ॲडीशन टू दॅट, एक गार्ड त्या ठिकाणी ठेवला होता. मला आपल्याला हे सांगावयाचे आहे की, महिना दीड महिन्याच्या कालावधीत आपले काही सदस्य ताजमहल हॉटेलमध्ये गेले असतील तर त्यांच्या लक्षात असेल की, हॉटेलमध्ये जातांना बाहेर गाडी थांबवून आतमध्ये पायी जावे लागत होते. परंतु नंतर नंतर हॉटेलच्या व्यवस्थापनाने सांगितले की, आमचा हॉटेलचा व्यवसाय असल्यामुळे 24 तास सर्व लोकांना तपासणे आम्हाला शक्य होणार नाही. त्यानंतर हळू हळू त्यांनी महिना दीड महिन्या नंतर आपली भूमिका बदलवली. त्या दिवशी गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती चित्कला झुत्सी ताजमहल हॉटेलमध्ये होत्या व त्यानी त्या दिवसाच्या संदर्भात सांगितले की, हॉटेलमध्ये जातांना आम्हाला कोणताच अडथळा नव्हता. आमचे कोणत्याही प्रकारचे चेकींग झाले नव्हते. त्या ठिकाणचे सर्व अडथळे तेथील मॅनेजमेंटने बाजूला केले होते. 12 मुद्यांच्या संदर्भात मरीन ड्राईव्ह पोलिसांनी ओबेरॉय हॉटेलला ॲडव्हायजरीज सुध्दा दिली होती व कोणती काळजी घ्यावयाची हे सुध्दा सांगितले होते. तुम्ही गन्सच्या परवानग्या मागा आम्ही तुम्हाला लायसन्स देतो असेही अगोदरच्या महिन्यातच पोलिंसाकडून सांगण्यात आले होते. पोलिसानी ॲडव्हायजरीज देण्याचे काम त्या काळात केलेले आहे हे मला या ठिकाणी सांगितले पाहिजे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

सभापती महोदय, यामध्ये इंटेलिजन्सचे फेल्युअर आहे काय असा महत्वाचा प्रश्न अनेक सन्माननीय सदस्यांनी विचारला. घटना भारतात घडली. भारतातील एखाद्याला माहिती असेल आणि ती माहिती आपल्या लोकल पोलिसांनी कलेक्ट केली नाही तर मी त्याला काही रेफरन्स आहेत असे समजतो. म्हणूनच मी मघाशी घटनाक्रम सांगितला. ते दहा अतिरेकी पाकिस्तानातले. त्यांना एका घरात ठेवण्यात आले. त्यांना ट्रेनिंग दिल्यानंतर आणि टार्गेट सांगितल्यानंतर तीन महिने घराच्या बाहेर जाऊ न देण्याची तसेच एकमेकांचे टार्गेट दुसऱ्याला माहीत पडू न देण्याची काळजी घेण्यात आली होती. त्यामुळे ही इन्फर्मेशन लष्कर-ए-तोयबाचे दोन प्रमुख येऊन गेले त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाला असेल असे एकंदरित डिस्क्रीपशनवरुन वाटत नाही. त्या 10 अतिरेक्यांनी पाकिस्तातून समुद्रमार्गे मुंबईत प्रवेश केला. इंटेलिजन्सची जेवढी माहिती होती त्याप्रमाणे त्या त्या स्थळांना प्रोटेक्शन देणे इथपर्यंत आपण काम करु शकलो. त्यामुळे या सर्व कामांमध्ये इंटेलिजन्स स्ट्रेन्दन केले पाहिजे, हत्यारे स्ट्रेन्दन केली पाहिजेत, समुद्रमार्गे पुन्हा कोणी येण्याचा प्रयत्न केला तर ती साईट सुध्दा स्ट्रेन्दन केली पाहिजे. याचा सर्वंकष विचार करुन सरकारने काही निर्णय घेतले आहेत. आतापर्यंत अशी प्रथा होती की, पोलीस दलातील काही सैनिक हे इंटेलिजन्समध्ये काम करायचे. त्याचा परिणाम असा व्हायचा की त्यांना तेथे करमत नसे. आमची दुसरीकडे बदली करा असा ॲप्रोच असायची. तेव्हा आता इंटेलिजन्समध्ये काम करण्याच्या उद्देशाने 85 पदे निर्माण करीत आहोत. ही पदे भरण्यासाठी पोलीस विभागास अधिकार दिलेले आहेत. एमपीएससीचा रुट बंद करुन डायरेक्ट भरती करण्याचा अधिकार पोलीस विभागाला दिलेला आहे. ही 85 पदे भरताना मूळ विभाग सोडून अन्यत्र कुठेही बदली होणार नाही अशी अट घातलेली आहे. त्यांनी फक्त इंटेलिजन्ससाठी काम करायचे. या दलात जे लोक येतील त्यांचे अतिशय सक्षम असे दल निर्माण करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने दुसरा एक महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. आपणास एनएसजीवर अवलंबून रहावे लागते. आपली क्वीक रिस्पॉन्स टीम आहे. पण ती अशाप्रकारच्या हल्ल्यांना तोंड देईल इतपत सक्षम नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे हा हल्ला म्हणजे एक छोटी लढाई होती. अशाप्रकारच्या लढायांना तोंड देण्यासाठी राज्य सरकारने आता फोर्स वन नावाचे

..2..



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ KTG/ MMP/ SBT/ 18:00

श्री.जयंत पाटील.....

नवीन दल तयार करण्याचे ठरविले आहे. या फोर्स वन मधील जवानांना जगातील पाठीवरचे उत्तमातील उत्तम ट्रेनिंग द्यायचे. अतिशय उत्तम असे आर्मस द्यायचे. जगातील सर्वात बेस्ट जे ट्रेनिंग असेल ते त्यांना द्यायचे असा निर्णय घेतलेला आहे. राज्य सुरक्षा दलाची फोर्स वन या नावाने स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. एक पोलीस अधिकारी आणि सहा पोलीस कर्मचारी एका ग्रुपमध्ये असतील आणि दोन ग्रुप एकत्र करुन एक टीम तयार करण्यात येईल. एका टीमध्ये दोन अधिकारी आणि बारा पोलीस कर्मचारी असतील. अशा एकूण 16 टीम तयार करण्याचा आपण निर्णय घेतलेला आहे. पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाचा अधिकारी त्या पथकाचा प्रमुख असेल. या फोर्स वनला कुठेही मुव्हमेंट करता यावी म्हणून हेलिकॉप्टर्सची व्यवस्था लवकरात लवकर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या फोर्स वन मध्ये जवळपास 342 जण असतील. या दलामध्ये काम करणाऱ्यांना दिले जाणारे भत्ते आणि अन्य सुविधा या पोलिसांपेक्षा जास्त देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सागरी सुरक्षेसाठी बोटी भाड्याने घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु भाड्याने घेणाऱ्या बोटींचा स्पीड आणि अतिरेक्यांकडून वापरण्यात येणाऱ्या बोटींचा स्पीड यामध्ये फरक असू शकतो. यावेळी अतिरेक्यांनी साधा ट्रॉलर वापरला. तेव्हा पोलीस विभागासाठी 36 वेगवान बोटी खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ..

.जवळ जवळ 36 बोटी खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यापैकी 12 बोटी दोन तीन महिन्यात प्रोक्युअर करण्यात येणार आहेत बोटी प्रोक्युअर करणे हे येत्या महिन्या भरात शक्य आहे परंतु प्रोटेक्शनसाठी या बोटीला बाहेरुन ॲल्युमिनीयमचा पत्रा लावणे ही गोष्ट महत्वाची आहे. फायबरची बोट जर पंक्चर झाली तर पाणी आत येऊन काही प्रश्न निर्माण होऊ शकतील त्यामुळे प्रोटेक्टेड बोटी असल्या पाहिजेत या दृष्टीने शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर सागरी सुरक्षा करण्यासाठी भाडयाने ट्रॉलर्स घेण्यासाठी रक्कम मंजूर करण्यात आली आहे त्याचबरोबर गुप्ता वार्ता विभागात "सायबर मॉनेटरींग सेल" तयार करण्याचा एक नवीन निर्णय शासनाने घेतला आहे. सायबर कनेक्टीव्हीटी आणि सायबर मॉनेटरीग सेल, व्हाईस लॉगर्स इत्यादीसाठी तीन ते साडे तीन कोटी रुपयांची रक्कम देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे त्याचप्रमाणे बॉम्ब शोधक आणि नाशक ॅम्हणजेच बीडीडीएसचे एक पथक त्या ठिकाणी आहे.

अंधेरीला अशा बॉम्ब ठेवला असल्याची बातमी आली तर तेथे पथक पोहोचण्यास वेळ लागू शकतो त्यामुळे जवळजवळ 20 ठिकाणी बॉम्ब शोधक व नाशक पथक प्राधान्याने निर्माण् करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला असून जवळपास 16 कोटी रुपये त्यासाठी खर्च येणार आहे. त्याचबरोबर एनएसजी ॲडव्हान्स स्वरुपाची एमपी 5 ही गन वापरत असते तेव्हा जवळजवळ 250 अशा प्रकाराच्या गन्स घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे पोलीस दलासाठी लागणा-या अन्य साहित्याचा वा सामुग्रीचा तपशील मी या ठिकाणी देणार नाही परंतु प्रॅक्टीस करणा-या बुलेटसची संख्या कमी पडते त्यामुळे प्रॅक्टीसीग ग्राऊन्ड आणि प्रॅक्टीस करण्यासाठी लागणारी इतर व्यवस्था देखील अद्ययावत करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे . जवळजवळ 127 कोटी रुपये राज्य शासनाने वेगवेगळया कामासाठी देण्याचे ठरविले आहे. मुंबईमध्ये अतिरेक्यांकडून जो हल्ला
झाला होता त्यातून ज्या काही बाबी समोर आल्या आहेत त्या सर्व बाबीवर योग्य ती उपाययोजना करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे हा प्रयत्न करीत असताना जगाच्या पाठीवर जे काही उत्तम तंत्रज्ञान आहे ते तंत्रज्ञान मुंबईच्या आणि महाराष्ट्राच्या पोलिसांना मिळाले पाहिजे यासाठी राज्य सरकार काही पावले टाकत आहेत .सर्वच गोष्टीचा मी या ठिकाणी ताबडतोबीने उल्लेख करणार नाही. परंतु मुंबईच्या पोलिसांना आणि महाराष्ट्रातील पोलिसांना अद्ययावत साधने उपलब्ध असली पाहिजेत यासाठी प्रयत्न करण्यात येईल. अतिरेक्यांनी मुंबईवर केलेला हल्ला हा एक प्रकारे "अर्बन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ..

गोरील्ला वॉरच" होता असे म्हणायला हरकत नाही. अशा प्रकारच्या प्रसंगाला तोड देण्याची ताकद मुंबई आणि महाराष्ट्राच्या पोलीस दलामध्ये येण्याकरता जी काही साधने लागतील ती पूर्णपणे देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे . या संदर्भात तातडीने जे काही करावयाचे आहे त्या सबंधीचा हा प्लॅन आहे परंतु भविष्यकाळात असा प्रसंग येऊ नये यासाठी लॉग टर्म प्लॅन करण्याकरिता काही तज्ज्ञांचा एक गट तयार करण्यात आला आहे. मुंबई शहर त्याचबरोबर महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरे तसेच जो सीमेवरचा भाग आहे त्या ठिकाणी सुरक्षा करण्यासाठी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे हे ठरविण्यासाठी राज्य सरकार एक लॉग टर्म प्लॅन तयार करीत आहे जेणे करुन अशा प्रकारच्या कार्यवाहीत पुन्हा लूप होल्स राहणार नाहीत सागरी सुरक्षा गस्तीसाठी 36 वेगवान बोटी खरेदी करण्यात येणार आहेत त्यातील 12 बोटी तातडीने खरेदी करण्यात येणार असून त्यासाठी 49 कोटी रुपये खर्च येणार आहे. जे काही मुद्दे लक्षात आलेले आहेत त्या सर्व मुद्याचा पाठपुरावा करावयास पाहिजे. 26 तारखेपासून आता पर्यत मुंबई दलाने विशेष काळजी घेण्याचा प्रयत्न केला असून 406 कोम्बीग ऑपरेशन्स हातामध्ये घेतले होते मुंबई शहरात 1700 वेळा बॅरिकेटस् लावण्यात आले होते. ही सर्व व्यवस्था आपले संरक्षण करणारी आहे काय अशा प्रकारची शंका सामान्य माणसाच्या मनात तयार झाली आहे ती घालविणे आवश्यक आहे. मुंबई आणि महाराष्ट्रातील जनतेचे संरक्षण पूर्ण ताकदीने करण्याची धमक...

नंतर श्री.सुबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील .....

मुंबई आणि महाराष्ट्राच्या पोलीस दलामध्ये आहे ही भूमिका पुन्हा एकदा त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्याचा प्रयत्न राज्य सरकर करीत आहे. सभापती महोदय, मधाशी मी सांगितले की, हॉटेल्स आणि लॉजेस्चे चेकिंग जवळपास 1911 ठिकाणी केले आहे. वेगवगळ्या गोष्टी आहेत. त्यात कोस्टल एरियाच्या बाबतीत देखील आपण काळजी घेत आहोत. कोस्टल एरियातील 28 पोलीस ठाणी आहेत त्यातील जवळपास 21 ठाण्यांच्या अंतर्गत 41 लँडींग पॉईन्टस् आहेत. जेथे माणूस बोट घेऊन येऊन जमिनीवर येऊ शकतो. तेथेही सशस्त्र पहारा ठेवण्याची व्यवस्था आपण केलेली आहे. हे करीत असताना मुंबईला जो 55 कि.मी.चा सागरी किनारा आहे त्याची सुरक्षा करण्यासाठी ताबडतोबीन 3 बोटी भाड्याने आपण घेतलेल्या आहेत आणि आणखी अद्यावत बोटी देखील लवकरात लवकर आणण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. सभापती महोदय, खरे तर 11 सप्टेंबरला अमेरिकेमध्ये जो अतिरेक्यांकडून हवाई हल्ला झाला होता त्यानंतर 46 दिवसांनी त्यांनी अशा प्रकारे व्यवस्था करण्याच्या दृष्टीने हालचाल सुरू केली. परंतु आपण तातडीने या दृष्टीने पावले उचलली आहेत. मुंबई आणि महाराष्ट्रातील जी प्रमुख शहरे आहेत त्यांची काळजी घेण्याचा एक कॉम्प्रिहेन्सीव प्लॅन राज्य सरकारच्या वतीने तयार करण्याचे काम आम्ही सुरू केले आहे. मला खात्री आहे की, येणाऱ्या काही दिवसातच हा प्लॅन परिपूर्णपण महाराष्ट्रासाठी सज्ज झालेला असेल. खरे तर जगाच्या पाठीवर साधने आणि व्यवस्था अनेक आहेत. या सगळ्यांना या ठिकाणी आणत असताना एक बोल्टन किंवा आपल्या अमेरिकेमध्ये मी स्वत: जाऊन मागील दीड वर्षापूर्वी शिकागो येथील पोलीस दलाच्या कार्यालयास मुद्दाम भेट दिली होती. तेथील पोलीस दलाचा परफॉर्मन्स आणि अकौंटिबिलिटी कशी प्रूव्ह करतात, एखाद्याने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केल्यापासून त्या माणसाला त्या प्रकरणात न्याय देण्यापर्यंत तेथे कशा प्रकारे काम केले जाते याची माहिती घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. थोडक्यात सांगावयाचे तर जगातील उत्तमातील उत्तम व्यवस्था आम्ही आमच्या राज्यात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी मी हे सारे कशासाठी अभ्यासले असा आमच्या मित्रांना प्रश्न पडला असल्याने मी त्यांना सांगू इच्छितो की, एखाद्या विषयाची आवड असली की माणूस तो विषय समजून घेण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतो. त्याप्रमाणे मी केले आहे इतकेच. इतकेच नाही तर मी स्वत: राज्याच्या तत्कालीन गृहमंत्र्यांची, श्री.आर.आर.पाटील

..... 3ओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

यांची परवानगी घेऊन मुंबई पोलीस दलाचे आधुनिकीकरणाच्या दृष्टीने अभ्यास केला आहे, त्या दृष्टीने प्रयत्न केला आहे. मुंबई पोलीस दलाकडे आज असे कोणतेही प्रकरण नाही की ज्यात पोलीस दलाला आधुनिकीकरणासाठी पैसे दिलेले नाहीत. त्यासाठी आपण नेहमीच पोलीस दलाला पैसे दिलेले ाहेत. यामध्ये मुद्दा असा आहे की आधुनिकीकरण करणे आणि कोणत्या गोष्टींना कधी प्राधान्य द्यायचे याबाबतीत कदाचित तुमचे आणि माझे मतभद होऊ शकतात. परंतु आज मी येथे गृहमंत्री म्हणून उभा आहे आणि त्याबाबतीतील मला जो अनुभव आहे तो लक्षात घेता मी आपल्याला सांगतो की, माझ्याकडे पोलीस दलासाठी दिलेल्या निधीच्या फाईल्स आहेत आणि त्यामध्ये त्या त्या प्रस्तावाला मान्यता दिल्याची वा प्रस्ताव अमान्य केल्याची तारीखवार नोंद आहे. सभापती महोदय, यामध्ये कल्पना एवढीच आहे की, मुंबईच पोलीस दल समर्थपण उभे करणे. मुंबईतील जनतेने या सर्व बाबी झेलल्या आहेत, सहन केल्या आहेत आणि म्हणूनच मुंबईच्या जनतला मी त्रिवार अभिवादन करतो. ही घटना घडल्यानंतर या घटनेचे परिणाम म्हणून मुंबई शहरातील अनक बाबींच्या बाबतीत जी काळजी घेणे आवश्यक आहे त्याबाबतीत देखील मुंबईच्या जनतेने फार मोठी मदत केली आहे. त्यामुळे मी या निमित्ताने सभापती महोदय, आपल्या मार्फत मुंबईतील जनतेला आश्वासन देऊ इच्छितो की, यापुढे अशा स्वरूपाचा हल्ला वा नव्याने काही गोष्टी घेऊन असे प्रकार राज्यातील कोणत्याही भागात घडू दिल्या जाणार नाहीत किंबहुना घटना घडण्यापूर्वीच त्यांचा मुकाबला करण्याची ताकद कमाविण्याची जबाबदारी आमच्या राज्य सरकारने घेतली आहे. यासाठी केवळ वित्त मंत्र्यांबरोबरच नाही तर आम्ही एकत्रितपणे मंत्रिमंडळामध्ये याबाबत निर्णय घेतला आहे की, आर्थिकदृष्ट्या सक्षमपणे या कार्यक्रमासाठी पैसे दिले जातील. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3पी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

आणि या राज्याची सुरक्षितता वाढविण्यासाठी एक मोठा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. व्यापारी केंद्र असलेल्या या मुंबई शहराचे संरक्षण आणि सुरक्षितता वाढविणे याला सरकारने पहिला प्राधान्य क्रम दिला आहे. आणि पूर्ण ताकदिनीशी राज्य सरकार या कामामध्ये लक्ष घालीत आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण हे मुख्यमंत्री झाल्यापासून त्याबाबत सतत बैठका सुरु आहेत. त्यामध्ये या राज्याचे संरक्षण आणि राज्यातील सर्वसामान्य माणसाची सुरक्षितता वाढावी यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्याचे आम्ही ठरविले आहे. त्याकरिता सर्व साधने आणि यंत्रणा वापरुन या राज्यामध्ये यंत्रणा उभी केली जाईल. महाराष्ट्रातील आणि मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांमध्ये आपले संरक्षण करणारी समर्थ सेना पोलीस दलाच्या रुपाने आपल्या मागे आहे हा विश्वास पुन्हा एकदा निर्माण करण्याचे आपले काम राहील असा विश्वास पुन्हा एकदा व्यक्त करुन मी माझे लांबलेले भाषण याठिकाणी संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एखाद्या चांगल्या कथाकाराने कथा लिहावी. आणि एखाद्याने ती कथा सांगावी या पध्दतीचे माननीय गृहमंत्र्यांचे भाषण आज आम्हाला याठिकाणी ऐकायला मिळाले. जवळपास सव्वा तासापूर्वी या कथेला सुरुवात झाली आणि दीड तासांनी ही कथा संपली. माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या खात्याचा कारभार हातामध्ये घेऊन फार थोडे दिवस झाले आहेत. आणि यानंतर पोलीस खाते काय करणार आहे, हे त्यांनी सांगितले. परंतु मुंबईमध्ये ही महाभयंकर घटना घडली ती घडत असतांना राज्य सरकारने काय केले? हे मात्र सफाईदारपणे सांगण्याचे त्यांनी टाळले. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दृष्टीने ही काही पहिली नवीन घटना नव्हती. 1992-93 पासून बॉम्बस्फोटांची मालिका सुरु झाली. आणि आता माननीय गृहमंत्र्यांनी भाषणाला सुरुवात करतांना अचानक हल्ला झाला असा शब्दप्रयोग केला. मला असे वाटते की, या घटनेचे गांभीर्य आपण ओळखणार की नाही? हा हल्ला अचानक झाला तर मग 2007 पासून केंद्रीय आय.बी.कडून आलेल्या सूचना आपण एका ओळीमध्ये कशा वाचून दाखविल्या? आय.बी.कडून अशाप्रकारच्या सूचना आल्या होत्या. तर मग हा हल्ला अचानक कसा झाला? अनेक माननीय सदस्यांनी कालपासून सतत आठ तास चर्चा करुन आपली मते व्यक्त केली आहेत. आणि त्या चर्चेमधून काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्या प्रश्नांना मंत्रिमहोदयांच्या भाषणामधून सभागृहासमोर उत्तरे आलेली नाहीत. ही घटना घडण्यापूर्वी, अतिरेक्यांचा हल्ला होण्यापूर्वी केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री.जयस्वाल यांनी राज्य सरकारला सूचना केली होती की, समुद्र मार्गाने अतिरेक्यांचा हल्ला होण्याची शक्यता आहे. हे खरे आहे काय? ही घटना घडल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री मुंबईला भेट देण्यासाठी आले. आणि त्यांनी आपले इंटेलिजन्स ब्यूरो फेल्युअर गेल्याची कबूली दिली. हे खरे आहे की नाही? जर इंटेलिजन्स ब्यूरो फेल्यूअर झाले असेल तर त्याबाबत आपण काही कारवाई करणार आहात काय? संबंधितांना शिक्षा देणार आहात काय? केंद्रीय आय.बी. ने 2006 पासून आतापर्यंत केव्हा केव्हा सूचना दिल्या? यामध्ये 18/7 ची श्री. पसरीचा साहेबांची आलेली एकच सूचना आपण याठिकाणी वाचून दाखविली.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

मात्र ही सूचना दिली, ती सूचना दिली एवढेच आपण सांगितले. पण या ठिकाणी नेमके सांगितले पाहिजे असे मला वाटते. शेवटची सूचना आपल्याला केव्हा मिळाली हे सभागृहाला माहीत असले पाहिजे. आपल्या महाराष्ट्राचे गुप्तचर खाते 2006 चा रेल्वेचा बॉम्बस्फोट झाल्यापासून काय करीत होते ? गुप्तचर खात्याला याची कुणकुण लागली होती का ? गुप्तचर खात्याने यासंबंधीच्या काही सूचना सरकारला केल्या होत्या का ? गुप्तचर खात्याने आपल्या डी.जी.ला काही सांगितले होते काय ? त्यांनी डी.जी.ला सांगितले असेल तर डी.जीं.नी त्याबाबतीत काय कार्यवाही केली ? आपण एनएसजीच्या कारवाईबाबत आता सांगितले की, 9.00 वाजता ही कारवाई सुरु झाली. सभापती महोदय, महाभयंकर असा हल्ला सुरु आहे, गोळीबार सुरु आहे, बॉम्बस्फोट सुरु आहे, आगी लावणे सुरु आहे, मुंबई पोलिसांच्या ते आटोक्यात येत नाही आणि साडेअकरा वाजता ही सूचना जर एनएसजीला मिळाली आणि एनएसजीचे जवान जर 10 मिनिटाच्या आत तयार झाले असतील तर रात्री 12.00 ते सकाळी 9.00 वाजेपर्यंत एनएसजीच्या कारवाईला उशीर का झाला ? 26 तारखेला ज्यावेळी 9.30 वाजता हा हल्ला सुरु झाला तेव्हापासून 59 तास या सर्व कारवाईचे कंट्रोलींग कोण करीत होते ? त्यांचा समन्वय होता काय ? एनएसजी असेल, सीआरपी असतील, आपल्या राज्याचे कमांडो असतील, दहशतवादविरोधी पथक असेल, पोलीस असतील या सर्वांचे कम्युनिकेशन आणि कंट्रोलींग कोण करीत होते ? आपण ब्रुलेटप्रूफ बद्दल या ठिकाणी सांगितले. तो मुद्दा मी या ठिकाणी उपस्थित करणार नाही. पण समुद्र मार्गाचे नियोजन आपण गेल्या दोन वर्षात काय केले होते ? आपण सांगितले की, बोटी फुटल्या. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी भाषणामध्ये सांगितले की, बोटीच्या डिझेलचा तीन चार हजार रुपये खर्च कोणी करावयाचा यासंबंधी पोलिसात चिंतेचे वातावरण होते. माननीय श्री. जयंतराव पाटील, आपण 70 कोटी रुपयांच्या फाईल्स मंजूर केल्या परंतु पोलीस खात्याने तो खर्च केला नाही. 70 कोटी रुपये अखर्चित पडून राहिले याला कोण जबाबदार आहे ? याला जो जबाबदार असेल त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? या ठिकाणी संपूर्ण सभागृहाने मागणी केली की, याला जे डी.जी. जबाबदार आहेत, मुंबईसह महाराष्ट्राचे संपूर्ण कंट्रोल ज्या डी.जी.च्या हातामध्ये आहे त्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

डी.जी.ला बडतर्फ करण्याची मागणी संपूर्ण सभागृहाने केली असताना त्याच्याबद्दल आपण एकही अक्षरही बोलला नाहीत. त्याबाबत आपण काही सांगणार आहात काय ? पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करण्याचा मुद्दा मी या ठिकाणी मांडला होता. दोन अधिकाऱ्यांना बायपास करुन आपण डी.जीं.ची नियुक्ती केली त्या डी.जी.वर हायकोर्टाने ताशेरे ओढले. हायकोर्टाने सांगितले की, डी.जीं.ची नियुक्ती नियमानुसार झालेली नाही. श्री. अनामी रॉय यांच्यामध्ये अशी काय खासीयत आहे की, ज्यासाठी आपण सुप्रीम कोर्टात गेलात ? हाच डी.जी. कशासाठी पाहिजे ? बॉम्बस्फोट धडविण्यासाठी, ताज उडविण्यासाठी, ओबेराय उडविण्यासाठी पाहिजे का ? एका अधिकाऱ्यासाठी महाराष्ट्राचे संपूर्ण सरकार कामाला लागते. ज्या डी.जी.ने गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचा सत्यानाश केला, ज्या डी.जी.ने महाराष्ट्राच्या पोलीस खात्यामध्ये गटबाजी केली, गॅन्गवॉर केले त्या डी.जी. चे समर्थन आपण या ठिकाणी करता. म्हणून आम्ही जी मागणी केलेली आहे त्याप्रमाणे त्या डी.जी.ला बडतर्फ केले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई पोलीस कमिशनरबाबत मी सांगू इच्छितो. मी सकाळी माझ्या भाषणामध्ये एक अतिशय गंभीर मुद्दा सांगितला होता. घाटकोपरच्या बॉम्बस्फोटामधील ख्वाजा युनुसचे प्रकरण मी आपल्याला सांगितले. त्यामध्ये चार पोलीस अधिकारी सस्पेंड आहेत. माननीय श्री. जयंतराव पाटील, आपण सूत्रे हातामध्ये घेतलेली आहेत. जे जहाँबाज पोलीस अधिकारी होते, ज्यांनी या महाराष्ट्रातील आणि मुंबईतील गॅन्गस्टर संपवले त्यांना, भोसले सारख्या अधिकाऱ्याला पाच वर्षापासून सस्पेंड केलेले आहे. त्याला का सस्पेंड केले ? पाडवी नावाचा जो अधिकारी होता त्याचे सी.आर. लिहितांना आता जे मुंबईचे अधिकारी आहेत त्यांनी असे म्हटले आहे की,

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

हा जो पाडवी आहे त्या पाडवीची दाऊद इब्राहीमबरोबर मिलन इंटरनॅशनल हॉटेलमध्ये पार्टनरशिप आहे. गॅस्टस्टर्सचे तेथे कम्युनिकेशन होते, गॅगस्टर्सच्या तेथे बैठका होतात. हे तुमचे पोलीस महाशय त्या बैठकीला हजर असतात. असे जर पोलीस खाते पोखरलेले असेल तर पोलीस खात्यातील हे जे अतिरेकी आहेत त्यांना तुम्ही शोधून काढणार आहे की नाही ? त्याची फाईल का दाबून ठेवण्यात आली, ते सेवानिवृत्त होईपर्यंत त्याची फाईल दाबून ठेवण्यात आली. हे 5 अधिकारी मात्र सेवेतून घरी गेले. ते अधिकारी आज कामावर असते तर कदाचित यावेळी ते ऑपरेशनमध्ये कामाला आले असते.

सभापती महोदय, मघाशी मी 3-4 प्रश्न उपस्थित केले होते. पोलीस दलाचे राजकीयकरण होत आहे ते आपण थांबविणार आहात काय, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करणार आहात काय आणि राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबई पोलीस आयुक्त हे दोघेही या घटनेला जबाबदार आहेत. या दोघांनी 185 नागरिकांचे प्राण घेतले आहेत, मुंबई आणि महाराष्ट्राचे करोडो रुपयांचे नुकसान केलेले आहे, या कारणास्तव या दोघांना सेवेतून बडतर्फ करणार आहात काय असा माझा शासनाला सवाल आहे. मघाशी आपण पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा मुद्दा मांडला आहे. परंतु आज आपण जे बोललात ते केले तर मी पुढील काळात आपले निश्चितपणे अभिनंदन करीन. यांनी तत्कालीन गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या सभागृहामध्ये त्यांच्या भाषणामध्ये पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी काय केले जाणार आहे ते सांगितले होते त्याची सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आठवण करुन दिली. त्यांच्या भाषणातील एकाही गोष्टीची अंमलबजावणी झाली नाही. असेच जर हे भाषण असेल तर ही चर्चा राज्यातील जनतेसाठी वांझोटी ठरणार आहे. आमची मागणी आहे की, या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे, राज्याच्या पोलीस महासंचालकांना आणि मुंबई पोलीस आयुक्तांना ताबडतोब शासनाने बडतर्फ केले पाहिजे. पोलीस खात्याचे ताबडतोब आधुनिकीकरण केले पाहिजे, पोलीस खात्याचे राजकीयकरण ताबडतोब थांबविले पाहिजे. पोलीस खाते नि:पक्षपातीपणे चालले पाहिजे अशा आम्ही मागण्या केल्या आहेत. ज्या पोलीस अधिका-यांचे गॅंगस्टर्सशी संबंध

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर....

आहेत अशा अधिका-यांना शोधून काढून त्यांना पोलीस दलातून काढून टाकले पाहिजे, या मागण्यांसंबंधी शासनाचे काय म्हणणे आहे ते सभागृहाला समजले पाहिजे. केंद्रीय आयबीने राज्याच्या गृह खात्याला वेळोवेळी सूचना दिल्या होत्या त्या सूचनांचे सरकारने कसे पालन केले याचीही माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे तरच आपल्या उत्तराने आमचे समाधान होणार आहे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, आता निश्चितपणे शासनाकडून कारवाईसंबंधी आम्हाला उत्तर पाहिजे. शासनाने त्या आतंकवाद्यांचे फार कौतुक करुन आम्हाला सांगितले आहे. ते किती मस्त होते, ते हिरो होते, किती कि.मी.वरुन आले, त्यांनी किती त्रास घेतला, हे सर्व कौतुक आम्ही ऐकून घेतले आहे. सभापती महोदय, आपण म्हणालात की, सदस्यांनी मंत्री महोदयांचे उत्तर शांतपणे ऐकून घ्यावे, त्यामुळे आम्ही ते शांतपणे ऐकून घेतले. ते आतंकवादी कसे आले, त्यांनी कसे बॉम्बस्फोट केले अमूक केले, तमूक केले असे त्यांच्याकडून वर्णन करण्यात आले. मी माझ्या भाषणातून मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर पुढे येईल असे मला मघाशी उत्तराच्या वेळी बोलले. त्यावेळी टी.व्ही.वरुन श्री.साळसकर हे दिसत होते. श्री.साळसकर हे एके-47 घेऊन कायम फिरत असत. त्यांच्याकडील एके-47 रायफल श्री.अनामी रॉय यांनी काढून घेतली अशी त्यांनी जीवंतपणी मुलाखतीद्वारे सांगितले होते. त्यावेळी त्यांच्या हातामध्ये ती एके-47 असती तर त्यांच्या पायामध्ये गोळया गेल्या, छातीमध्ये गोळया गेल्या, आजुबाजूला गोळया गेल्या असे झाले नसते आणि तुम्हालाही आज ते सांगावे लागले नसते. कारण हे सर्व त्यांनीच केले असते. ज्यांच्या कृतीमुळे एका अधिका-यांचा हकनाक बळी गेला आहे त्यासंबंधी मंत्री महोदयांनी आज उत्तर देणे आवश्यक आहे. आपण यासंबंधी उत्तर देणार होता, पण ते दिले नाही. सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांकडूनही सांगण्यात आले होते की, पोलीस खात्यासंबंधी ज्या तरतुदी केल्या होत्या त्यांना अर्थ खात्याची मंजुरी मिळत नव्हती. ते उद्या समोर येईलच. तत्कालीन गृहमंत्र्यांनी याठिकाणी असे म्हटले होते की, 24 चेक पोस्टचे नुतनीकरण करणे, 35 नवीन चेक पोस्ट तयार करणे, 25 जीप व 28 स्पीड बोटी खरेदी करणे यासाठी हा खर्च होणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 18:30

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

आणि आपण गृहमंत्री म्हणून हे करणार आहोत हे आता सांगत आहात. जर दोन वर्षात हे केले असते तर आपण किती असुरक्षित आहोत हे सांगण्याची पाळी आज आपणावर आली नसती. माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी आपल्या निवेदनामध्ये या घटनेच्या संदर्भात कोणाला दोषी धरणार आहे हे सांगितलेच नाही. आपण उद्याच्या उद्या कोणाला सस्पेण्ड करु शकणार नाही. पोलीस आयुक्तांना आणि पोलीस महासंचालकांना सस्पेण्ड करा अशी आमची मागणी आहे. या मागणी बाबत आपण सांगाल की त्याबाबतीत प्रोसिजर आहे. पोलीस आणि पोलीस अधिका-यांनी केलेल्या शौर्याची आपण नोंद केली त्याचा मला खूप अभिमान वाटला. ते गेले म्हणून तुम्हा आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो. ते गेले. शौर्य गाजवून गेले. त्यांच्या शौर्यावर आपले राजकारण उभे करणार आहात काय ? ते मृत्यूमुखी का पडले याची चौकशी करणार आहात काय ? या हल्ल्यातील पोलिसांनी कारवाई केली त्या प्रमाणे सचिव पातळीवरच्या अधिका-यांची काहीच जबाबदारी नाही काय ? मी या ठिकाणी अभिमानाने असे सांगितले की, आदरणीय श्री. शरद पवारसाहेबांच्या हे लक्षात आले की, अधिकारी काम करीत नाहीत म्हणून ते माननीय पंतप्रधानांना भेटले आणि अधिका-यांवर कारवाई करण्याची त्यांना विनंती केली. पंतप्रधानांनी मुख्य सचिवांना तसे आदेश द्यावेत. याप्रमाणे केन्द्रापासून सर्व संबंधित अधिका-यांना दोषी धरली पाहिजे. को-ऑर्डिनेशन करण्याची जबाबदारी सचिव खात्याची नाही काय ? हा ॲडव्हाईस आला, तो ॲडव्हाइस आला असे सांगत आपण 8 ॲडव्हाईसची माहिती दिली. असे ॲडव्हाईस आल्यानंतर हे आतंकवादी कोणत्या मार्गाने येणार आहेत, त्यांचे कपडे कसे असणार आहेत, त्यांच्याकडे काय काय असणार आहे, ते ताज आणि ओबेरायमध्ये कधी येणार आहेत यासंदर्भात माहिती घेण्यासाठी आपले इण्टेलिजन्स कामाला लागायला पाहिजे होते.एवढी गंभीर घटना घडल्यानंतर सचिव पातळीवरच्या आय.ओ.एस. अधिका-यांच्या बाबतीत तुम्ही काही करु शकत नाही. तरी देखील त्यांना ताबडतोब घरी पाठवा. त्यासाठी केन्द्रकडे जा, राष्ट्रपतींकडे जा. त्यांची चौकशी करा. विजय साळसकर गेले, अशोक कामटे गेले, हेमंत करकरे गेले. त्यावेळी बाकीचे जबाबदार पोलीस अधिकारी कुठे होते असा प्रश्न मी विचारला होता. त्या खात्याचे प्रमुख व्यंकटेश कोठे होते ?आमचा बाप विचारणारे के.एल.प्रसाद कोठे होते. पोलीस महासंचालक श्री अनामी रॉय कोठे होते ? ते आपल्या पाकिटाला पिस्तुल लावून फिरताना दिसले असते तरी बरे वाटले असते. पण ते त्याठिकाणी गेले नाहीत.



17-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

पोलीस आयुक्त श्री. हसन गफूर हे त्यावेळी मशिदीमध्ये नमाज पढताना दिसले. या पैकी एकही अधिकारी पोलिसांचे मनोबल वाढवताना का दिसला नाही ? हल्ल्याच्या वेळी हे अधिकारी कोठे होते. ते त्या ठिकाणी का गेले नाहीत, ते कोठे होते असा माझा प्रश्न आहे. मी आपणाला विनंती केली होती की, अन्य अधिका-यांच्या नाकर्तेपणा बद्दल त्यांच्या विरुध्द न्यायालयीन चौकशी लावा आणि कारवाई करा. परंतु आपण चौकशी सुध्दा करायला तयार नाही. कुणालाही दोषी धरायला तयार नाही. आपण काहीच करायला तयार नाही. मी या ठिकाणी 1992-93मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांचा उल्लेख केला. हा संजय दत्त मेणबत्त्या लावतो. त्याच्याकडे ए.के.47 सापडली होती. तो सिध्द झालेला गुन्हेगार आहे. हा तुमच्या काँग्रेस पक्षातील माणूस आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

श्री. संजय दत्त हा बॉम्बस्फोटातील गुन्हेगार माणूस आहे. मुंबई शहरात जनतेला एकत्र करतो आहे. हा माणूस वेगवेगळया प्रकारची नाटके करतो आहे आणि ती नाटके तुम्ही खपवून घेत आहात. 1992-93 मधील बॉम्बस्फोटातील आरोपींना जी शिक्षा झाली आहे, त्या शिक्षेची तातडीने अंमलबजावणी करावी अशा पध्दतीची विनंती केली आहे. याबाबत सुप्रीम कोर्टासाठी चांगला वकील नेमून त्याबाबतीत वेळोवळी सुनावण्या घेऊन या आरोपींना शिक्षा करण्यासंबंधीची कार्यवाही राज्य शासनाकडून केली जाईल काय ? याबाबतीत राज्य शासनाने उत्तर दिले असते तर आम्हाला खूप बरे वाटले असते. (अडथळा )

श्री.जितेंद्र आव्हाड : श्री.संजय दत्त आणि कॉंग्रेसचा काय संबंध आहे ?

श्री. दिवाकर रावते : खासदार श्रीमती प्रिया दत्त तिकडे होत्या. त्या कोणत्या पक्षाच्या खासदार आहेत याची मला माहिती द्यावी. खासदार श्रीमती प्रिया दत्त गेट ऑफ इंडिया जवळ मेणबत्त्या लावण्यासाठी उपस्थित होत्या. राज्यकर्ते नालायक आहेत असे सांगण्यासाठी त्या तेथे उपस्थित होत्या. मी तुम्हाला दोष देत नाही. या लोकांना थांबविण्याची या राज्य सरकारमध्ये कुवत नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ही चर्चा वेगळया दिशेने चालली आहे. सन्माननीय सदस्यांनी आपापसातील वाद थांबवावा. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची माझी तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : खासदार श्रीमती प्रिया दत्त त्या ठिकाणी उपस्थित होत्या. त्या पब्लीक क्रायमध्ये आल्या त्याबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. आपण विषय समजून घ्यावा. प्रश्न असा आहे की, आम्ही आमची मते मांडताना शासनाला काही प्रश्न विचारले आहेत त्याची आम्हाला उत्तरे हवी आहेत. मी या ठिकाणी श्री.संजय दत्त यांचे नाव का घेतले तर तो 1993 साली झालेल्या बॉम्बस्फोटातील तो आरोपी आहे. तो आरोपी आहे असे सिध्द झालेले आहे. विधानसभेत माजी मुख्यमंत्री 1993 च्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात बोलले. त्यांनी सांगितले की, त्या बॉम्बस्फोटातील आरोपी मोकळे सुटले आहेत. ते आरोपी आहेत हे सिध्द झाल्यानंतर देखील त्यांना शिक्षा होत

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. भोगले 18:35

श्री. दिवाकर रावते...

नाही अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. 1993 चा बॉम्बस्फोटाचा खटला हा राष्ट्रद्रोहाचा खटला आहे. आम्ही यासंदर्भात राज्य शासनाला विनंती केली आहे, त्याबाबतीत माननीय गृह मंत्र्यांनी काहीही माहिती दिली नाही. माननीय गृहमंत्री महोदय, आपण अत्यंत महत्वाची माहिती आज उजेडात आणली आहे. महाराष्ट्रात एटीएसकडे एकूण कर्मचारी आणि अधिकारी आहेत याची माहिती दिली. एटीएसची सगळी स्ट्रेंथ 450 कर्मचा-यांची आहे. त्यांच्याकडे काय काय अत्याधुनिक शस्त्रे आहेत यासंबंधीची देखील माहिती या ठिकाणी आपण दिली. एटीएसकडे एके-47 देखील उपलब्ध करुन दिलेल्या आहेत अशीही माहिती दिली गेली. त्या दिवशी हेमंत करकरे यांना एके-47 घेता आली नसेल, त्यांना त्या प्रसंगी एके-47 का आणून देण्यात आली नाही ? एके-47 ही शस्त्रे पुजा करण्यासाठी घेतल्या आहेत काय ? माननीय मुख्यमंत्री ही काही तुमची जबाबदारी नाही. ही घटना घडली त्यामुळे आज तुम्ही मुख्यमंत्री म्हणून आला आहात. या घटनेच्या अनुषंगाने काहीच कार्यवाही केली गेलेली दिसत नाही. सदनातील सर्व सदस्यांना सांगू इच्छितो की, संकटात जी माणसे सापडलेली असतात, त्यांना आपण प्रथम बाहेर काढतो. त्यानंतर आपण एकमेका विरुध्द बोलतो. ही राजकारणातील घडण आहे. हा एक संस्कार आहे. घटना घडली त्यावेळी श्रीमती चित्कला झुत्सी मॅडम ओबेरॉय येथे उपस्थित होत्या. मी याबाबतीत कालच आक्षेप घेतलेला आहे. त्यांनी आपल्या पदाचा वापर करुन व्ही.आय.पी.ना सोडविण्यासाठी व्हॅन तेथे पोहोचली, त्यातून त्या बाहेर आल्या. ही बातमी लोकसत्ता या वृत्तपत्रात छापून आलेली आहे. ती बातमी मी वाचली आहे आणि म्हणून मी बोलतो आहे. त्या गाडीतून श्री. प्रभू देखील आले. त्या ठिकाणी 60 ते 70 लोकांना सोडून त्या स्वत: एकटया बाहेर आल्या ही गोष्ट अतिशय गैर आहे. श्रीमती झुत्सी मॅडम त्यावेळी त्या हॉटेलमध्ये होत्या की नव्हत्या एवढे तरी आपण या ठिकाणी जाहीर करावे. व्ही.आय.पी. पदाचा वापर करुन इतरांना न सोडविता जर त्या बाहेर पडल्या असतील तर त्यांचे विरुध्द शासनाने कारवाई केली पाहिजे. त्यांच्या विरुध्द राज्य शासनाला निलंबनाची कारवाई करता येत नाही याची मला देखील जाणीव आहे. परंतु त्यांना दीर्घ मुदतीच्या रजेवर तरी पाठवा...

यानंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

जनतेला काहीतरी सांगा, आम्ही गांभीर्याने घेतले आहे. कोणीतरी दोषी असेल की नाही? श्री.राकेश मारिया यांनी 1992-93 चा बॉम्बस्फोट खटला पूर्णत्वाला नेला. त्यांना कोणतेही मेडल मिळाल्याचे आम्ही ऐकले नाही. 100 लोकांवर गुन्हा दाखल झाला. काहींना फाशी झाली. देशात असा कोणताही खटला गाजला नाही. त्यांच्यावर सध्या काय जबाबदारी आहे मला माहिती नाही. एटीएसमध्ये असे अधिकारी असते तर तेही गेले असते. माझा त्यांच्याशी परिचय नाही. परंतु तुम्ही असे अधिकारी फुकट घालविणार का? कोणते नियोजन करणार आहात? पोलीस खात्याचे राजकीयकरण होता कामा नये. त्यांना मुक्त संचार करु दिला तर ते सर्व काही सुरळीतपणे करतील. आधुनिकीकरणाचे तुमचे सर्व धोरण कळले. केवळ साहित्य घेऊन उपयोग होणार नाही. एक पिस्तुल घेऊन आपला पोलीस बहादुरी करु शकतो एवढे ते बहादूर आहेत. परंतु झालेल्या घटनेबद्दल कोणीतरी दोषी असेल ना? याची चौकशी झाली पाहिजे. मोका कायदा आणावा अशी आम्ही विनंती केली आहे. त्याची आवश्यकता नसेल तर आंतकवाद्यांविरुध्द केंद्राने कडक स्वरुपाचा कायदा करावा अशी शिफारस करणारा ठराव दोन्ही सभागृहामध्ये पारित करुन तो केंद्राकडे पाठवावा. या संदर्भात काहीतरी बोलाल की नाही? कोणत्याही परिस्थितीत दोषींच्या संदर्भात आज घोषणा करावीच लागेल. अडचण असेल तर न्यायालयीन चौकशी जाहीर करावी लागेल एवढीच आग्रहाची विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री या सभागृहात चर्चा सुरु असताना पूर्णवेळ विधानसभेत उपस्थित होते. माननीय गृहराज्यमंत्री याठिकाणी मुद्दे लिहून घेत होते. या सभागृहात माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, श्री.दिवाकर रावते आणि मी जे मुद्दे उपस्थित केले त्या संदर्भात काहीच खुलासा आलेला नाही. सन्माननीय मंत्री श्री.नितीन राऊत यांनी लिहून घेतलेले मुद्दे मंत्रीमहोदयांना दिले नाहीत किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांनी नोंद केलेले मुद्दे त्यांना दिले नसावेत. मग विधानपरिषदेतील चर्चेला महत्व नाही का? असे असेल तर आम्ही चर्चा कशाला करायची? मी एक मुद्दा मांडला होता की, अन्सारी नावाच्या एल.ई.टी.शी संबंधित व्यक्तीला उत्तरप्रदेश सरकारने अटक केली. त्याच्यावर चार्जशीट दाखल केली. त्याच्याकडे ताज, ओबेरॉय, सीएसटी आणि इतर ठिकाणचे लोकेशन आणि हाताने काढलेले नकाशे सापडले होते. उत्तरप्रदेश सरकारशी महाराष्ट्र सरकारने कोऑर्डिनेशन केले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 18:40

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब)**

श्री.विनोद तावडे......

का? केले असेल तर सभागृहात तसे जाहीर करावे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे आता लोकांमध्ये चर्चा अशी आहे की, दहशतवादी हल्ल्याची चौकशी एटीएसमार्फत सुरु होती, ती विशेष कारणासाठी सीआयडीकडे दिली असेल तर या सदनाच्या माध्यमातून त्याबाबतचा खुलासा झाला पाहिजे. हा मॅसेज बाहेर केला तर पोलीस अधिकाऱ्यांमधील इगो युध्द चालले आहे त्याला युध्दविराम दिला जाईल. दहशतवादी खटल्याची चौकशी एटीएसकडे दिली. त्याबाबत कमिशनर आणि गृहखात्याची परवानगी घेतली होती का? ही तांत्रिक बाब आहे. परंतु तो पुढे पायंडा ठरु शकेल. म्हणून याबाबत सभागृहात खुलासा होणे आवश्यक आहे. मंत्रीमहोदयांनी जे काही वर्णन केले ते पाहूनच मी त्यांना हभप जयंत पाटील महाराज असे गंमतीने म्हणालो. कसाबने जी माहिती दिली त्या 90 टक्के माहितीच्या आधारे आलेले वर्णन आहे. आपण स्वत: जाऊन तिकडे चौकशी केली असे नाही. त्यांना पहिल्यांदा भारतात पाऊल टाकले ही माहिती कुणाची? ग्रेट कसाबची. त्याच्या आधारेच सुरस कथा सांगितली आहे. मी गेटवे परिसरात फिरत होतो म्हणून मला त्यातील बरीचशी माहिती आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

पण हे जे वर्णन केले ते त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे करण्यात आले. मुंबई पोलिसांना ही संपूर्ण माहिती नव्हती, कारण हा संपूर्ण प्लॅन त्यांचा होता आणि तो तिकडेच ठरविण्यात आला. येथे फक्त त्यांनी ठरल्याप्रमाणे पाऊल टाकले आणि काम करुन गेले त्यामुळे कुठलेही लॅप्सेस आपल्या पोलिसांमध्ये नाही हे सांगण्याचा जो प्रयत्न येथे करण्यात आला त्यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, जर हा पोलिसांचा लॅप्सेस नव्हता तर माजी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचा होता काय ? आणि दुसरा प्रश्न असाही निर्माण होतो की, हे लॅप्सेस मुंबई आणि महाराष्ट्र पोलिसांचेच नव्हते तर मग या राजकारण्यांचे तरी कसे असणार ? तरी त्यांना जावे लागले की नाही ? आपल्या उत्तरामध्ये एक स्पायरसी अशी आहे की, 54 एंट्रीज मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर उतरण्यासाठी असल्याचे आपण म्हणालात. त्या सर्व ठिकाणी आपण पोलीस चौक्या, किंवा हत्यारबंद माणसे आज उभी केली. पण जी काही ॲडव्हायझरी आपल्याकडे आली त्याच्या आधारे हे 54 पॉईंट आपल्या पोलिसांनी मार्क केले नव्हते काय, तेथे पोलिसांची गस्त ठेवली नव्हती काय आणि ती गस्त जर ठेवली नव्हती तर मग हे लॅप्सेस पोलिसांचे नाहीत तर कोणाचे आहे ? याचा खुलासा झालेला नाही. तसेच एवढा मोठा समुद्र किनारा असल्यामुळे सुरक्षा कशी करणार असेही आपण म्हटले आणि हा त्यामुळेच सागरी किनारा कंट्रोलमध्ये करणे शक्य नाही असे सांगितले. तसेच मुंबईच्या हद्दीबद्दल बोलताना म्हणालात की, 54 पॉईंट्स जे आहेत त्यासंबंधीची ॲडव्हायझरी आलेली असताना देखील ज्यावेळी हा अन्सारी नावाचा माणूस पकडला त्यावेळी हे समुद्रातून होणार असल्याचेही आपल्याला अगोदर कळले होते तर मग अशा 54 पॉईंट्सशी ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी संपर्क केला नाही ती त्याची जबाबदारी नव्हती काय ? तसेच आता हा हल्ला झाल्यानंतर आपण ते 54 पॉईंट्स मार्क केले कारण अशा प्रकारच्या घटना पुढे होऊ नयेत, त्या थांबाव्यात असे आपल्याला वाटले. परंतु हे 54 पॉइंट्स मार्क न करणारे जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांनाही आपल्याला पिन पॉईंट करावे लागणार आहे. आपण म्हणालात की, मुंबई पोलिसांनी धाडस दाखविले, रिस्पॉन्स दिला त्यामुळे हे सर्व कंट्रोलमध्ये आले. परंतु मला प्रामाणिकपणे असे सांगायचे आहे की, अतिरेक्यांचे ऑपरेशनच असे असते की, पहिल्या अर्ध्या तासातच जे करायचे ते करुन टाकायचे आणि नंतर एका ठिकाणी कोपऱ्यात जाऊन बसायचे व

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

तेथून पुढील सर्व करायचे. यासाठी 60 तास लागल्याचे म्हणालात परंतु एनएसजीचे ऑपरेशन असे असते की, ते प्रथम अतिरेक्यांकडिल शस्त्रसाठा किती आहे याचा ते अंदाज घेतात तसेच ओलिसांना वाचविण्याला प्राधान्य देतात, म्हणून त्याला 60 तास लागले. एक तर नक्की आहे की अशा पध्दतीचा हल्ला आता समुद्रमार्गाने अतिरेकी करण्याची शक्यता कमी परंतु तरीही काळजी घेतली पाहिजे. यापुढे कदाचित त्यांचा असाही प्लॅन असू शकतो की, 8-10 लोक मारण्यासाठी ते आरडीएक्सचा वापर करतील आणि अशा घटना होण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. यात प्रामुख्याने त्यांचे दोन उद्देश आहेत. ते म्हणजे दोन धर्मातील तेढ वाढवून दंगलीची परिस्थिती निर्माण करणे आणि देशातील महत्वाचे व आर्थिक सेंटर्स नेस्तनाबूत करणे. अशा प्रकारे यापुढे पूर्ण व मुंबईसारखे आर्थिक सेंटर्स आणि त्यातही हे आयटी सेंटर्स भविष्यात उभे राहणार, अशा आयटी सेंटर्सचे व जगाचे पूर्ण कनेक्शन तोडणे आणि त्यातून हजारो कोटीचे नुकसान करणे व आपली इकॉनॉमी पूर्ण कोलॅप्स करणे असाही प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गोष्टींचा विचार करुन आपण 5.5 कोटीची तरतूद केली असल्याचे सांगितले आहे, परंतु ही तरतूद अपुरी आहे. यामध्ये आपल्याला स्पेशलायझेशन म्हणून विचार करावा लागणार आहे. Next terrorist attack on our I.T. & It will collapse our economy, आणि यासंबंधी कुठल्याही स्वरुपात व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही ती करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ MMP/ प्रथम श्री. खर्चे.... 18:50

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी अनेक मुद्दे या ठिकाणी मांडलेले असल्यामुळे त्या सर्व मुद्यांची उत्तरे आम्हाला सन्माननीय गृहमंत्र्यांकडून ऐकावयाची आहेत. कायदा सुव्यवस्थेच्या संदर्भात पूर्वी ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्यासंदर्भात आम्ही समाधानकारक उत्तराची अपेक्षा आपल्याकडून करीत असतांना पूर्वीच्या त्रुटी का दुरुस्त झाल्या नाहीत याची जबाबदारी सन्माननीय गृहमंत्री झटकू शकता की, काय असा आमच्या मनात संभ्रम तयार होतो आहे. आपण पुढे काय करणार आहात असा माझा प्रश्न आहे. सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय गृहमंत्र्यांनी त्यांचा इरादा कसा नेक आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. कसाब कडून सर्व माहिती जमा करुन झाल्यावर आपण सध्याच्या परिस्थितीत अफजल गुरुच्या फाशीचे जे धिंडवडे बघतो आहे त्या पार्श्वभूमीवर या कसाबला कठारोतल्या कठोर शिक्षा देण्याच्या दृष्टिकोनातून कोणती पाऊले आपल्याकडून उचलली जाणार आहेत ? मला आपल्याकडून आश्वासन हवे आहे की, एक महिन्याच्या काळात कसाबच्या खटल्याचा निकाल लावून त्याला कठोरातली कठोर अशी जी फाशीची शिक्षा आहे ती झाली नाही तर परत इतर काही लोकांना अतिरेकी ओलीस धरुन कसाबच्या सुटकेची मागणी करतील म्हणून आपल्या कार्यक्षमतेची चुणूक तसेच आपल्या बांधिलकीची चुणूक आज, आता आणि या क्षणी या विधान परिषदेच्या सभागृहात आम्हाला पहावयास मिळेल काय असा मला प्रश्न विचारावासा वाटतो ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, गृहमंत्र्यांनी या सभागृहाला उत्तर दिले नाही तर त्यांनी आपल्या भाषणामधून भारतामधील सर्वसामान्यांच्या मनात असलेल्या संभ्रमाला उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या घटनेच्या संदर्भात बाहेर जे गोंधळाचे वातावरण आहे, ऐकीव माहितीच्या आधारे आमच्या मनात, सर्वसामान्यांच्या मनात जो संभ्रम होता त्याचे निराकरण करण्याचे काम आपल्या भाषणामध्ये आपल्या अधिका-यांकडून मिळालेल्या माहिती वरुन माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी केलेले आहे.

( अडथळा )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या आधारे मला माझे विचार मांडावयाचे आहेत. माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी झालेल्या चर्चेला उत्तर दिलेले आहे.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या मनात ज्या शंका आहेत त्या शंकाचे निरासरण करुन घेणे हा राईट ऑफ रिप्लायचा उद्देश आहे परंतु सन्माननीय सदस्य या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांना प्रशस्तिपत्रक द्यावयास निघाले आहेत.

**तालिका सभापती (ॲड. अनिल परब )** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आपण माझ याकडे बघून बोलावे. सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या आधारे बोलण्याची संधी मागितली असल्यामुळे मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली होती.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राईट ऑफ रिप्लायचा उद्देश एवढाच आहे की, सदस्यांनी रिप्लाय नंतर राहिलेल्या शंका आणि प्रश्न विचारावयाचे असतात की, शासनाला प्रशस्तीपत्रक विचारण्यासाठी राईट ऑफ रिप्लाय असतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय गृहमंत्र्यांनी जो रिप्लाय दिलेला आहे त्यामध्ये आपले जर समाधान झाले नसेल, काही शंका राहिली असेल तर त्यासंदर्भात आपण विचारु प्रश्न विचार शकता.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आमच्या शंकाचे माननीय गृहमंत्र्यांनी जे निराकरण केलेले आहे त्याबद्दल आम्हाला बोललेच पाहिजे. आमच्या ऐकिवात अशी माहिती होती की, ओबेरॉय ट्रायडन्टवर अटॅक होणार आहे असे आयबीने सांगितले होते अशी आमची माहिती होती. परंतु नंतर अशी माहिती कानावर आली की, आयबी आणि पोलीस ऑफिसरांची मिटिंग विमानतळावर 26 तारखेला दुपारी 2.00 वाजता झाली होती. एकंदरीत संभ्रमाचे वातावरण ब्लेम गेमच्या माध्यमातून चालू होते ते कोठे तरी संपुष्टात येणार आहे काय ? या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी ज्या 8 ॲडव्हायजरीज वाचून दाखवल्या त्यांसदर्भात सुध्दा मी काहीच बोलावयाचे नाही काय? जेव्हा माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणात मी अमुक अमुक गोष्टी सांगितल्या तसेच मी माझ्या भाषणात काय सांगितले हे या ठिकाणी बोलणे गरजेचे आहे. मी या या मुद्यावर बोलावे असे आपण सांगितल्यामुळे मला स्पष्टीकरण करावे लागले आहे.

**तालिका सभापती** : आपल्या मनात ज्या काही शंका असतील त्याचे निरसन करुन घ्या. आपण कोणत्या मुद्यावर बोलावे हे मी सांगितले नव्हते.

यानंतर श्री. अजित.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, इन्व्हीस्टीगेशनच्या माध्यमातून मिळालेली माहिती आणि त्यातून पाकिस्तानने केलेले कृत्य हे उघडकीस आल्यानंतर सभागृहाने आणि भारताने एकमताने पाकिस्तानाला टेरर स्टेट घोषित करावे. तसेच भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाकडे तशा प्रकारची मागणी करावी हा मुद्दा सभागृहाने पुढे आणावा असे माझे मत आहे. तो सर्वानुमते पुढे जायला हवा. दुसरी गोष्ट अशी की, आपल्या माध्यमातून आम्ही ज्या शंका व्यक्त केल्या त्याबद्दल आम्ही याठिकाणी दिलगिरी व्यक्त करायला पाहिजे. काल आम्हाला वाटत होते की, आमचे अधिकारी कुठेच नव्हते. परंतु आज माननीय गृहमंत्र्यांनी जे सांगितले त्यावरुन सत्य काय ते समजले. सर्वसामान्य जनतेला असे वाटत होते की, हेमंत करकरे, अशोक कामटे आणि विजय साळसकर हे एकही गोळी न मारता मरण पावले. पण माननीय गृह मंत्रिमहोदयांनी सांगितले कामटे आणि करकरे यांनी अतिरेक्यांवर गोळ्या झाडल्या. परंतु अतिरेक्यांकडे असलेले हत्यार आणि आपल्या अधिकाऱ्यांकडे असलेले हत्यार यामध्ये मोठा फरक होता.....अडथळा...सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही त्यांचे अर्ध्या-अर्ध्या तासाचे प्रबोधन शांतपणे ऐकतो. तेव्हा आम्ही आपणास डिस्टर्ब करीत नाही. आपले प्रत्येक म्हणणे आम्ही ऐकतो.

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की त्यांचे म्हणणे लवकर संपवावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या विषयावर सत्ताधारी आणि विरोधी असे दोन्ही बाजूचे सदस्य बोलतील असे ठरले होते. त्सेच काही कक्षा ठरल्या होत्या. त्यामध्ये अफजल गुरुचा विषय काढायचा नाही असे ठरले होते. माननीय गृहमंत्री महोदयांच्या उत्तरानंतर झालेल्या प्रश्नांमध्ये आजही अफझल गुरुचा विषय निघतो. पोलिटीसायझेशन ऑफ पोलीस फोर्स निघतो, कम्युनलायझेशन ऑफ पोलीस फोर्स निघतो. डिमोरलायझेशन ऑफ पोलीस फोर्स निघतो आम्ही त्यावरही बोलायचे नाही काय ? .... अडथळा......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापती स्थानी माननीय उपसभापती )**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांना काही प्रश्न आहेत. त्यांनी काही मुद्दे कौशल्याने टाळले. आपण अर्थसंकल्पावरील चर्चेस अतिशय शांतपणे उत्तर देता. पण याठिकाणी परिस्थिती वेगळी आहे. जेव्हा एखादी मोठी घटना घडते त्यावेळी तीन प्रश्नांची उत्तरे सत्ताधाऱ्यांनी द्यायची असतात. ती आपण दिली. वस्तुस्थिती काय झाली आहे ती आपण ऑफीशिअली रेकॉर्डवर आणली. प्रिव्हेन्टीव्ह मेजर्स आणि ही घटना का झाली हे सांगायेच असते. असे आम्हाला पार्लमेन्टची प्रोसिडीग्ज वाचून जे कळले त्यावरुन सांगत आहे. आपण हरीनामाचा गजर करुन आम्हाला टाळ वाजावायला बोलाविले आहात काय ? माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, 2006 मध्ये ॲडव्हाझरी आली, ती काय आली ती सांगावी. फेब्रुवारी 2007 मध्ये ॲडव्हाझरी आली ती सांगितली नाही. मे 2008 मध्ये पुन्हा ॲडव्हाझरी आली ती आपण सांगितली नाही. ऑक्टोबर 2008 मध्ये ॲडव्हाझरी आली ती आपण सांगितली नाही. तेव्हा ही सर्व माहिती गृह मंत्र्यांनी द्यावी तसेच प्रिव्हेन्टीव्ह मेजर्सबाबत सांगावे. मी या ठिकाणी पार्लमेन्टमध्ये झालेल्या चर्चेचा वृत्तांत देतो. श्री. जैयस्वाल यांनी स्पष्ट सांगितले की, आम्ही महाराष्ट्र राज्याला व अन्य राज्यांना कशाप्रकारे हल्ला होणार आहे हे सांगितले होते.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..

त्याचबरोबर केन्द्र सरकारचे संरक्षण सल्लगार श्री. नारायणन् यांना ज्यावेळी माहिती मिळाली त्यावेळी त्यांनी आपल्याकडे ती दिली होती. दिनांक 19 आणि 20 नोव्हेंबर 2008 रोजी त्यांना " आम्ही 9 वाजता पोहोचणार आहोत, 11 वाजता पोहोचणार आहोत " अशी सॅटेलाईटवर झालेल्या संभाषणाची माहिती मिळाली होती ती त्यांनी आपल्याला दिली होती तेव्हा ही माहिती आपल्याकडे आली होती किंवा नाही याबाबतीत खुलासा करण्यात यावा. त्यानंतर कसाबने दिलेली जबानी बाहेर कशी काय आली ? त्यासासठी कोण दोषी आहे? याही बाबतीत उत्तर देण्यात आले नाही. त्याच बरोबर श्रीमती रश्मी शुक्ला, श्री.जावेद अहमद आणि श्री.पी.के. जैन हे अधिकारी घटनास्थळी वेळीच का आले नाहीत ? श्री पी.के. जैन 2.30 वाजता आले, श्रीमती रश्मी शुक्ला नंतर आल्या होत्या. सगळे सैनिक फिल्डवर असताना सेनापती का आले नाहीत.....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी आपणा सर्वाचे ऐकत असतो तेव्हा मी काय सांगत आहे हे देखील आपण ऐकून घ्यावे राईट ऑफ रिप्लायच्या संदर्भात काही मर्यादा असतात हे तुम्हाला माहीत आहे.

एक सन्माननीय सदस्य :आमच्या प्रश्नाला मंत्र्यानी उत्तर दिलेले नाही.

**उपसभापती** :उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय अजून उभेच राहिलेले नाहीत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलले आहेत. गट नेते बोलल्यानंतर आता पुन्हा प्रत्येक सन्माननीय सदस्य जर प्रश्न विचारणार असतील तर यावरील चर्चा पुन्हा सुरु केल्या सारखे होईल. तेव्हा या विषयाचे गांभीर्य ओळखून सन्माननीय सदस्यांनी मर्यादित स्वरुपात प्रश्न विचारावा.

डॉ.दीपक सावंत :आमच्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.जयंत पाटील :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यानी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याला उत्तर देण्यासाठी मी येथे उपस्थित आहे. अजून मी सभागृहाबाहेर गेलेला नाही. ही चर्चा चालू आहे तेव्हा शांतपणें आपण चर्चा करावी.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण :आपण ही चर्चा संपवली आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने महत्वाच्या विषयावरील चर्चा आपण संपवत आहात. मला अजून दोन प्रश्न विचारावयाचे आहेत.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य उभे राहतात )

श्री.जयंत पाटील : सभापती महोदसय, जवळ जवळ पाच सहा सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे आहेत.........

श्री.विनोद तावडे :आपण व्यवस्थित उत्तर न दिल्यामुळे आम्ही पुन्हा प्रश्न विचारण्यासाठी उभे आहोत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या विषयावर जेव्हा चर्चा चालू होती तेव्हा मी सभागृहात उपस्थित नव्हतो. सन्माननीय सदस्यांकडून जे मुद्दे मांडण्यात आले होते त्याचे एक जिस्ट माझ्याकडे माननीय राज्यमंत्रयानी दिले होते .......

श्री.मधुकर चव्हाण : आपण दिशाभूल करीत आहात.

श्री.जयंत पाटील :दिशाभूल करण्याचा प्रश्न नाही आपण मांडलेल्या प्रत्येक मुद्याचे मी उत्तर देण्यास तयार आहे. माझ्याकडे जे जिस्ट देण्यात आले होते त्यातील महत्वाच्या मुद्यासंबंधी मी खुलासा केलेला आहे.श्री.फाईम अन्सारी यांचा येथे उल्लेख केला होता......

श्री.विनोद तावडे :आमच्या भाषणात त्यांचा उल्लेख केला होता.

श्री.जयंत पाटील :मी काय सांगत आहे ते आपण ऐकून घ्यावे. ऐकून घेण्याची सहनशीलता आपण वाढवली पाहिजे. आपल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे देण्याची माझी इच्छा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे.

श्री.मधुकर चव्हाण : मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भावना मांडल्या आहेत. मी त्यांना अशी विनंती केली होती की एक दोन सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला तर ते ठीक आहे.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय,मला शेवटचे दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. स्थानिक पोलिसांचा यामध्ये कोणताही सहभाग नाही हे पोलीस आयुक्तांनी का सांगितले नाही. त्याचबरोबर ही घटना गंभीर स्वरुपाची असल्यामुळे त्यासबंधी न्यायालयीन चौकशी करुन त्रृटीच्या संदर्भात सत्य बाहेर आले पाहिजे. तेव्हा न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता माननीय मंत्री महोदय आपल्या प्रश्नांना उत्तरे देण्यास सुरूवात करतील. ... आता मी सगळ्याच सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यासाठी बोलण्यास परवानगी देऊ लागलो तर मग या चर्चेला काही अर्थच राहणार नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या अगदी प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यास तयार आहे. दुसरी गोष्ट अशी की, मी या सभागृहामध्ये या चर्चेच्या वेळी संपूर्णवेळ हजर राहिलो असतो तर मला सदस्यांच्या सर्व मुद्यांवर उत्तरे देता आली असती ....

( काही सन्माननीय सदस्य बोलण्याची परवानगी मागत असतात ... )

**उपसभापती** : मी आपणा सर्वांनाच बोलण्याची परवानगी देईन. पण मी प्रामाणिकपणे सांगतो की, येथे हे जे काही चालले आहे ते मला पटलेले नाही. मी माननीय विरोधी पक्षनेता आणि सन्माननीय सदस्य श्री.रावते या दोघांनाही याबाबत विनंती केली आहे आणि त्यांना प्रश्न विचारण्याची मुभा देखील दिली होती. आता दोन प्रातिनिधिक स्वरूपात आपले नेते बोलले आहेत त्यानंतरही सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना मी बोलण्याची संधी दिली. अशी संधी मी प्रत्येक सदस्याला देऊ लागलो तर चर्चेला काही अर्थच राहणार नाही. माझ्या जागी तुम्ही कोणीही असता तर तुम्ही काय केले असते याचा आपणच विचार करावा. असो. आता मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना प्रश्न विचारण्याची परवानगी देतो. तसेच इतरांनाही मी परवानगी देईन मात्र प्रत्येकाने अगदी थोडक्यात प्रश्न विचारावेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी जे काही सांगितले तो जो त्या कसाबचा इंटरव्ह्यू लोकसत्तेमध्ये आला होता. कसाब हा इतका मोठा कल्प्रिट असताना देखील अशा एखाद्या माणसाचा इंटरव्ह्यू लोकसत्ता सारख्या दैनिकात कसा काय डिट्टो छापून येतो.? हा माझ्यापुढील पहिला प्रश्न आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी जे काही सगळे सांगितले ते त्याच इंटरव्ह्यूमधील सांगितले आहे. सभापती महोदय, दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आपण आता सांगितले की, आम्ही सर्व काही इक्विपमेंटस् घेतली. तर मग 2006 सालामध्ये आपण फुल बॉडी प्रोटेक्शन्स कीटस् घेतलेली आहेत तर मग त्यावेळी ही कीटस् कोठे गेली होती ? आणखी एक प्रश्न म्हणजे एकंदर गेल्या वर्षभरामध्ये आपल्याकडे किती ॲडव्हायजरी आल्या ? तसेच आपण इंटेलिजन्ससाठी ज्या नव्याने नेमणुका करणार आहात त्यासाठी एमपीएससीचा निर्णय आपण रिलॅक्स करणार आहात तर मग त्यासाठी आपण कॅबिनेटमध्ये अंतिम निर्णय घेतला आहे काय ?

..... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कमांडो ट्रेनिंगबाबत सांगितले. पण हे प्रशिक्षण देण्यासाठी म्हणून जो कालावधी लागणार आहे त्या दरम्यान आपण काय व्यवस्था केलेली आहे ? दुसरे म्हणजे अशा प्रकारचे बॉम्बस्फोट होण्यामध्ये येथून कोठलेही लोकल असिस्टन्स त्यांना बिलकूल मिळालेच नव्हते का ? तसे आपले मत आहे का ? आणि मिळाले असेल तर त्याबाबतीत शासन काय धोरण नक्की करणार आहे ? कारण बऱ्याचवेळा आम्ही ऐकतो की, दाऊदच्या नेटवर्कींगशिवाय असे प्रकार, घातपात घडत नाहीत. याबाबतीतील 1993 चा अनुभव घेऊन आपण अशा बाबतीत दाऊदचे साम्राज्य उखडून काढण्यासाठी आपण काय हालचाली करता आहात ? आणि अशा प्रकारच्या कारवाईमध्ये जे शहीद होतात असे जे गरीब आपले कर्मचारी आहेत की जे आपले धैर्य दाखवून या प्रकारांना सामोरे जातात, अशांसाठी आपण आता जी 25 लाखांची योजना जाहीर केली आहे आणि त्यांना कायम स्वरूपी घर देणे हे शासनाचे या बाबतीतील धोरण म्हणूनच जाहीर आपण करणार का ?

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांना एकच प्रश्न विचारू इच्छितो. माननीय मंत्री महोदयांनी इंटेलिजन्स डेव्हलप करण्यासंबंधात 85 नेमणूका करण्याचे सांगितले. परंतु आपण हे जे बाहेरचे फोर्सेस येतात त्यांना इंटर्नली म्हणजे आतून जी मदत मिळते त्यांच्यावर कंट्रोल करण्यासाठी आपण काय करीत आहात याबाबत काहीच खुलासा मंत्री महोदयांच्या उत्तरातून आला नाही. आतून रसद मिळाल्यामुळेच ही एवढी मोठी धाडसे केली जात आहेत. एवढे मोठे हल्ले होऊ शकतात. तेव्हा अशा प्रकारांना आतून जी मदत मिळते आहे मग ती प्रशासनातून असेल वा समाजातून मिळणारी असेल ते उखडून काढण्याच्या संदर्भात कोणती ना कोणती यंत्रणा आपण उभी केली पाहिजे. तर त्याबाबतीत मंत्र्यांनी काही निवेदन करावे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सागरी आयुक्तालयाची आपण निर्मिती करणार आहात का ? अनेक सदस्यांनी त्यादृष्टीने मागणी केलेली आहे. दुसरे म्हणजे कुलाब्याच्या कोळीवाड्यामध्ये जी बोट उतरली त्याबाबत तेथील लोकांनी जवळच्या पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली आहे त्याची चौकशी का झाली नाही ? त्याबाबत वर्तमानपत्रातून आम्ही जे सगळ्यांनी वाचले आहे की, ज्या ठिकाणी हे सगळे अतिरेकी उतरले तेव्हा त्यांचा संशय येऊन ....

( यानंतर श्री.सरफरे .... 4ए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

तेथील लोकांनी जवळच्या पोलीस स्टेशनला तक्रार केली अशाप्रकारची माहिती याठिकाणी आली आहे. त्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनने चौकशी कां केली नाही? तिसरा प्रश्न असा की, या हल्ल्यामध्ये जे लोक मरण पावले आणि जखमी झाले आहेत त्यांना शासनाची मदत फार उशिराने मिळते. त्यांचे वेळेवर पुनर्वसन होत नाही. त्यासाठी हे शासन कालबध्द कार्यक्रम जाहीर करणार आहे काय?

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, पकडण्यात आलेल्या कसाब नावाच्या अतिरेक्याने त्याच्या जबानीमध्ये शस्त्रे विकत घेतली आणि प्रशिक्षण घेतल्याचे सांगितले. हे प्रशिक्षण केंद्र मधमाश्यांच्या पोळयांसारखे आहे. मधमाश्यांच्या पोळयाला हात लावल्यानंतर एकेक किलोमीटर त्या मधमाश्या लोकांना पळवून लावतात. जे मधमाश्यांना कळते ते आपल्याला कळले पाहिजे. म्हणून महाराष्ट्राच्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव करुन अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याबाबत केंद्र सरकारला सांगणार काय? सभापती महोदय, दुसरी दु:ख वाटणारी महत्वाची घटना अशी की, या अतिरेक्यांना पोलिसांची गाडी सापडली म्हणून हे अतिरेकी सापडले. त्या पोलिसांच्या वाहनांची जी दुर्दशा झाली आहे त्याकडे आपण लक्ष देणार आहात काय? आणि शेवटचा प्रश्न असा की, ही घटना घडल्यानंतर केंद्रीय गृहमंत्र्यांना, महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना शिक्षा झाली, त्याप्रमाणे या हल्ल्यामध्ये निष्काळजीपणा दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांना सुध्दा शिक्षा झाली पाहिजे, ती आपण करणार काय?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, सन 2000 मध्ये 15 मरीन पोलीस स्टेशन तयार करण्यात आले. त्या मरीन पोलीस स्टेशनमध्ये असणाऱ्या पोलिसांना समुद्रमार्गे अतिरेकी आल्यानंतर त्यांच्यावर कशाप्रकारे हल्ला करावा यासंबंधीचे प्रशिक्षण आपण दिले आहे काय? याबाबत मी माझे उदाहरण सभागृहाला सांगतो. मांडव्याला मरीन पोलीस स्टेशन काढण्यात आले आहे. तेथून एक किलोमीटरवर माझी बोट बुडाली. त्यावेळी मी साडे सात तास अडकून पडलो होतो. त्यावेळी श्री. भुजबळ साहेबांना मी फोन केला होता. मी समुद्रामध्ये बुडत असतांना एकही पोलीस त्याठिकाणी मला वाचविण्यासाठी आलेला नाही. मी स्वत: फोनवर पोलिसांशी बोललो. आजूबाजूच्या कोळीवाडयातील लोकांनी येऊन मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. जयंत प्र. पाटील...

साडे सात तासानंतर बाहेर काढले. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, हे मरीन पोलीस स्टेशन करीत असतांना तेथील पोलिसांना वेगळया प्रकारचे ट्रेनिंग दिले जाईल काय? स्पीड बोटीबाबत सांगू इच्छितो की, आपण अर्थमंत्री असतांना या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. आपण ज्या 15 स्पीड बोटी घेतल्या आहेत त्या फायबरच्या आहेत की, ॲल्युमिनियमच्या आहेत? आता त्या तात्पुरत्या स्वरुपात घेतल्या आहेत काय? त्याठिकाणी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना मरीन इंजिनिअरींगचे नॉलेज आहे काय? त्यामध्ये लोएस्ट कुठले आणि हाएस्ट कुठले हे बघता आले पाहिजे. त्यामुळे तांत्रिक ज्ञान असलेली माणसे आपण त्याठिकाणी ठेवणार काय? तसेच, या ज्या बोटी घेण्यात येणार आहेत त्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी ड्राय बॉक्स आणि सीपवे या तांत्रिक गोष्टींचा आपण विचार करणार आहात काय? याचे कारण ज्या बोटी खरेदी केल्या जातील त्या सहा महिन्यानंतर बंद पडतील. त्यांची देखभाल करण्यासाठी चांगली तांत्रिक माणसे आपल्याकडे नाहीत. मी स्वत: या व्यवसायामध्ये असल्यामुळे मला त्याचा अनुभव आहे. दुसरी गोष्ट अशी की, लष्कर-ए-तोयबाचा या हल्ल्यामध्ये संबंध असल्याचे सांगितले जाते. त्याचबरोबर दाऊद इब्राहीमचा सुध्दा या हल्ल्यामध्ये संबंध होता काय? 1993 मध्ये दाऊदने मुंबईत बॉम्बस्फोट केले. या राज्याचे माजी मुख्यमंत्री या हल्ल्यामध्ये दाऊदचा संबंध असल्याचा आरोप करतात. आणि दाऊदच्या गँगमधील माणसे मंत्रिमंडळात असल्याचा आरोप करतात. यामुळे महाराष्ट्रामध्ये एक वेगळा मेसेज जात आहे. आम्ही या सभागृहामध्ये बसलेले प्रतिनिधी कुणाचे प्रतिनिधीत्व करीत आहोत? या राज्याचे माजी मुख्यमंत्री या विधीमंडळामध्ये भाषण करीत असतांना असे सांगत आहेत की, दाऊदचे हस्तक या मंत्रिमंडळामध्ये आहेत याचेही स्पष्टीकरण याठिकाणी झाले पाहिजे.

(यानंतर श्री.बरवड)

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, 26 नोव्हेंबरला जी घटना घडली त्या घटनेच्या अगोदर चार तासांपूर्वी शहीद झालेले एटीएसचे प्रमुख श्री. हेमंत करकरे राजीनामा देण्यासाठी गृहमंत्र्यांकडे गेले होते, ही गोष्ट खरी आहे काय ? परवा गृह मंत्र्यांनी असे सांगितले की, आपला बडेजावपणा दाखविण्यासाठी ज्यांनी पोलीस संरक्षण घेतलेले आहे ते आम्ही काढून घेणार आहोत. ही कारवाई शासन किती दिवसात पूर्ण करणार ? पोलिसांच्या निवृत्तीचे वय कमी करण्याचा विचार आहे काय ?

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या सगळ्या घटनाक्रमानंतर माननीय गृहमंत्र्यांनी या सभागृहामध्ये आपले उत्तर दिलेले आहे. मला माननीय गृहमंत्र्यांना आपल्यामार्फत विचारावयाचे आहे की, या सगळ्या प्रकरणामध्ये प्रसिध्दी माध्यमाकडे जाण्याची गृह खात्याची जी धावपळ आणि धडपड होती त्यामधून काही वेळा ज्या चुकीच्या गोष्टी गेल्या त्यामुळे हा एकप्रकारचा प्रसिध्दीचा अतिरेक गृह खात्याकडून कमी करण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, या 26 नोव्हेंबरच्या घटनेच्या अनुषंगाने या ठिकाणी चर्चा झाली. मी दोन सूचना या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. ज्या प्रकारे बॉम्ब हल्ले, उग्रवाद्यांचे हल्ले, आतंकवादी हल्ले आपल्या राज्यामध्ये आणि देशामध्ये होत आहेत त्यामध्ये आपण बधतो की, बहुतेक मोठ्या शहरांमध्ये हे हल्ले होत आहेत.. अशा परिस्थितीमध्ये आपण पाहिले की, या वेळेला एनएसजीला त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी काही काळ लागला. त्यांना दिल्लीवरुन मुंबईला यायला आणि मुंबईच्या एअरपोर्टवरुन परत शहरामध्ये येण्यासाठी वेळ लागला. इंटर्नल पोलीस फोर्सला सुध्दा त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी पाऊस तास, एक तास, दीड तास एवढा वेळ लागलेला आहे. आपण सांगितले की, बॉम्ब विरोधी पथक निर्माण करणार आहोत. माझी अशी सूचना राहील की, आपण एअर लिफ्टींगची प्रोव्हीजन करणे खूप गरजेचे आहे. पथक कोठेली असले, मग ते एनएसजीचे पथक असेल, बॉम्ब विरोधी पथक असेल किंवा जे फोर्स अशा परिस्थितीला तोंड देणार आहेत त्यांना त्या स्पॉटवर नेण्यासाठी हेलिकॉप्टरची तरतूद, जे हेलिकॉप्टर आपण रात्री किंवा दिवसा वापरु शकतो अशा प्रकारची एअर लिफ्टींग ट्रान्सपोर्टेशनची व्यवस्था करणे खूप गरजेचे आहे. त्याचीही तरतूद आपण करावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या चर्चेमध्ये काल दिवसभर दोन्ही बाजूकडून मिडियाच्या बाबतीत खूप मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. त्या ठिकाणी मिडियाने घेतलेली जी भूमिका होती त्यामध्ये काही बाबी स्वागतार्ह होत्या पण काही बाबी आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने चुकीच्याही होत्या. त्याबाबतीत शासन काय भूमिका घेणार आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, मिडियाला याबाबत आपण काय दुरुस्त्या दुरुस्ती सुचवावयास पाहिजेत ? त्यांचे जे जाणारे प्रतिनिधी असतात त्यांच्या सुरक्षेच्या बाबतीत काय करणार ? कोणत्याही घटनेचे चित्रण ज्या पध्दतीने करावयास पाहिजे आणि लोकांना दाखवावयास पाहिजे त्याबाबतीत शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे याबाबतही माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तराची अपेक्षा आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सगळ्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे सर्व सन्माननीय सदस्यांनी पोटतिडिकीने आपल्या भावना या ठिकाणी मांडल्या आणि त्याचे काही ठळक मुद्दे मला देण्यात आलेले आहेत. ज्याचा उल्लेख आपण केला त्यातील काही मुद्दे राहून गेलेले दिसतात. त्यामुळे ते मुद्दे माझ्या भाषणात मधाशी कव्हर झालेले नाहीत. पण या ठिकाणी मला हे सांगितले पाहिजे की, हा जो कसाब सापडलेला आहे त्याच्या बाबतीत मघाशी सांगावयाचे राहिले. कसाबच्या बाबतीत दोन महिन्याच्या आत चार्जशीट दाखल करण्यात येईल अशी व्यवस्था आपण करीत आहोत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

स्पेशल कोर्टासाठी मुख्य न्यायाधीश यांच्याशी मी बोललो आहे. स्पेशल कोर्ट स्थापन करुन त्याची ट्रायल करुन कारवाई करण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि ॲड.उज्वल निकल यांना सरकारी वकील म्हणून किंवा स्पेशल प्रॉसिक्यूटर म्हणून नेमले जाणार आहे. यासंदर्भात मुख्य न्यायमूर्तींशी चर्चा झालेली आहे. या प्रकरणात दोन महिन्यामध्ये चार्जशीट दाखल करुन कोर्टाचा योग्य तो निर्णय लवकरात लवकर बाहेर येईल अशी व्यवस्था होणे आवश्यक आहे. त्याला कोणती शिक्षा दिली पाहिजे याबाबत त्याबद्दल मी आज स्टेटमेंट करणे बरोबर होणार नाही. कोस्ट गार्डसंबंधी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला होता. त्यासंदर्भात पोलीस आयुक्तालय स्थापन करणार नाही, परंतु सागरी किना-यावर जी पोलीस स्टेशन्स आहेत त्यांची रेंज सागरामध्ये गस्त घालण्यापर्यंत वाढवून त्यांना बोटी देणे आणि त्यांचा सागरावर इफेक्टनेस वाढविला जाईल. त्यासाठी 36 बोटी खरेदी करीत आहोत त्यापैकी 12 बोटी ताबडतोब खरेदी करीत आहोत. या बोटींना बाहेरच्या बाजूने मेटलचे किंवा ॲल्यूमिनियमचे प्रोटेक्शन असण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात 2-3 वर्षापूर्वी मी माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्याशी चर्चा केली होती. या 12 बोटींसाठी निधी मंजूर झाला आहे असे मी मघाशीच सांगितले आहे. यामध्ये काम करणारे पोलीस कर्मचारी, अधिकारी असतील त्यांना कोस्ट गार्डकडून प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्याचा निर्णय संयुक्त बैठकीमध्ये झालेला आहे. याठिकाणी फूल बॉडी प्रोटेक्शन किटचा उल्लेख केला होता. ते किट रॉयट कंट्रोलसाठी वापरले जाते. ते किट आरसीपी युनिटकडे देण्यात आलेले आहे. ते यासाठी वापरले जात नाही. फाईम अन्सारी हा माणूस जामपूर, लखनौजवळ आहे, त्याला आजच मुंबईमध्ये आणण्याची व्यवस्था केलेली आहे. आज तो येईल. त्याबद्दलचा मी मुद्दाम उल्लेख टाळत आहे. कारण या प्रकरणाच्या चौकशीची प्रक्रिया सुरु आहे. काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की यामध्ये दाऊदचा हात आहे काय, ग्राऊंडवरुन त्यांना सपोर्ट मिळाला काय, याबाबत तपास चालू आहे. लोकल सपोर्टच्या बाबतीत अशी कोणतीही गोष्ट समोर आलेली नाही. तपास चालू असल्यामुळे आज बोलणे योग्य नाही. लोकल सपोर्ट मिळाला आहे अशी माहिती समोर आलेली नाही. मी त्याबाबत बोललोही नाही. जी माहिती समोर आलेली नाही त्याबाबत आयुक्त तरी कसे बोलतील ? शासन एकदम अंतिम निर्णयापर्यंत लगेच येऊ शकत नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : आपण आता म्हणत असलात तरी पोलीस आयुक्तांनी यामध्ये स्थानिक लोक नाहीत असे सांगितले आहे.

श्री.जयंत पाटील : मी आपल्याला सांगत आहे की, याबाबत तपास चालू असून त्यामध्ये आतापर्यंत अशी कोणतीही माहिती पुढे आलेली नाही. कसाबकडून जे इन्ट्रोगेशन झाले आहे त्यातूनही अशी माहिती समोर आलेली नाही.

सभापती महोदय, ॲडव्हायजरींसंबंधी महत्वाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. मी सगळया ॲडव्हायजरींचा उल्लेख करणार होतो. पण त्यात जास्त वेळ गेला असता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील....)

दिनांक 18.7.2006 ला ॲडव्हायजरी आली. त्यामध्ये असे म्हटलेले होते की, "Intelligence inputs reveals that L.E.T modules may attack one of the following targets in the near future- B.A.R.C., Night Clubs, Bars, religious yatras. I request you to take immediate steps to prevent any such action." हे दि. 18.7 ला श्री.पसरीचा यांनी पोलीस आयुक्तांना कळविले. हे ॲडव्हायजरीचे स्टेटमेंट आहे "For some time, the Ministry of Home Affairs has been advising the State Governments to streamline and strengthen the security of National Leaders, sensitive and vital establishments, religious places and places of public importance & economic infrastructure, in view of the specific inputs of the likely subversive and terrorists activities and terrorists outfits particularly Lashkar-e-toiba in various parts of the country. In this context a detailed advisory dated 29th May, 2005 has been sent to all the States. Similarly in the wake of unsuccessful attacks of terrorists on the Ram Janma Bhoomi - Babri Masjid complex in Ayodhya, a advisory was sent. Another detailed advisory was sent on 18th July, 2005, following the major incidents of terrorists violence in Delhi, Varanasi, Bangalore and unsuccessful attacks on RSS Headquarters, Nagpur. Yet another advisory was sent on 2.6.2006, 'available input reveal as under : targeting RSS Offices and their leaders in each State of India is an important L.E.T plan.' Operational plans of the L.E.T now also includes spreading its activities and establishing its network in India and in the interior villages to edify like minded Muslims and pro jihadi Muslim organisations. Another advisory is " The LET has planned to target markets, public places and transport systems. Another important target is to attack critical infrastructure facilities." या मध्ये सर्व डिटेल्स आहेत . त्यानंतर 7 ऑगष्टला जी





(श्री. जयंत पाटील....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲडव्हायजरी आली ती भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर बाबत आहे. " Terrorists are collecting details of Religious yatras. The LET has conducted reconnaissance of power grids of Mumbai as possible target for attacks." माझे असे म्हण्णे आहे की हे डिटेलमध्ये वाचणे योग्य नाही. आपल्या मार्फत माझी प्रेसलाही विनंती आहे की, कृपया बाहेर प्रिंट मिडीयाने हे छापू नये. वर्षा-दीड वर्षापूर्वीच्या हया ॲडव्हायजरी आहेत. हया सर्व ॲडव्हायजरी मी वाचून दाखवू शकतो. परंतु त्यामुळे विनाकारण समाजामध्ये ज्या गोष्टी माहिती होऊ नयेत त्या होऊ शकतील. म्हणून मी मघाशी थोडासा स्पर्श केला.

..नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय, ॲडव्हायझरीमधील माहिती आपण वाचू नका. त्याच्या प्रती तुमच्याकडे आणि आमच्याकडे देखील उपलब्ध आहेत. यात स्पेसिफीक म्हटले आहे की, अतिरेकी समुद्रमार्गे येऊन हल्ला करतील अशा प्रकारची शक्यता आपल्याला वर्तविली होती. या शक्यतेबाबत राज्य शासनाने काय प्रिकॉशन्स घेतल्या आहेत ? सुतावरुन स्वर्ग गाठणे हे इंटेलिजन्टचे काम आहे. "त" म्हणता त्यांना "ताक" ओळखता आले पाहिजे. त्यालाच तर इंटेलिजन्ट म्हणतात. इंटेलिजन्टमध्ये काम करणारे नाक्यावर उभे राहणारे पोलीस नाहीत. ॲडव्हायझरीत स्पष्टपणे म्हटले आहे की, अतिरेकी समुद्रमार्गे येतील आणि मुंबई शहरावर हल्ला करतील अशी शक्यता आहे. या शक्यतेबाबत राज्य शासनाने काय प्रिकॉशन्स घेतल्या ? या प्रश्नाचे आम्हाला उत्तर हवे आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी एक ॲडव्हायझरी वाचण्यास हरकत नाही असे मला वाटते. दिनांक 27 फेब्रुवारी, 2007 रोजी एक ॲडव्हायझरी आली होती. त्यांनी असे म्हटले आहे की," Use of Sea route for infiltration and smuggling of terror hardware into India and pose threats to vital installations and industries, focus of terrorists outfits is on Gujarat and the costal areas are the new zones for them with target being South India. You are therefore, advised to maintain regular and effective watch." गुजरात आणि साऊथ इंडियामधील सर्व राज्यांना ही ॲडव्हायझरी देण्यात आली होती. माझा मुद्दा असा आहे की, स्पेसिफीक ॲडव्हायझरी नसली तरी जनरल स्वरुपाचे ॲडव्हायझरीचे नेचर ब-याच वेळेला आलेले आहे. समुद्रमार्गाने हल्ला होईल आणि तो अशा स्वरुपाचा हल्ला होईल अशा स्वरुपाची स्पेसिफीक ॲडव्हायझरी दिलेली नाही. परंतु जनरल ॲडव्हायझरी यापूर्वी आलेल्या आहेत. हा प्रसंग घडलेला आहे, या घटनेत जे सिक्वेन्स आले, ज्या गोष्टी झालेल्या आहेत, त्याप्रमाणे आपण दक्षता घेतच असतो. पण सध्या जी घटना घडली त्या अनुषंगाने उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय मी या ठिकाणी घोषित करतो. सभापती महोदय, झालेला घटनाक्रम, यातून निर्माण झालेले लॅप्सेस, लॅप्सेस नंतर यात कोणी अडचण केली असेल तर, त्या लॅप्सेसमधून जे लॅक्यूनाज् तयार होतील, ते क्लब करण्यासाठी पूर्णपणाने उच्चस्तरीय चौकशी नेमण्यात येईल. उच्चस्तरीय चौकशी करुन यासंदर्भात जे काही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

लुपहोल्स आहेत, ते पुन्हा निर्माण होणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल.या चौकशीत कोणा अधिका-यावर जबाबदारी फिक्स झाली तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई अंतिमदृष्टया केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या घटनेची आम्हाला न्यायालयीन चौकशी हवी आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे अशी आम्ही मागणी केलेली आहे. 1993 या वर्षी झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणासंबंधी न्यायालयीन चौकशी झाली होती. या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे. माननीय गृहमंत्र्यांनी या घटनेच्या बाबतीत न्यायालयीन चौकशीची घोषणा करावी, अशी आमची विनंती आहे. महाराष्ट्रातील जनतेला चांगला मॅसेज द्यावयाचा असेल व या घटनेची चौकशी पारदर्शी करावयाची असेल तर न्यायालयीन चौकशीच झाली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संपूर्ण जगाचे या घटनेकडे लक्ष लागलेले आहे. या घटनेचे गांभीर्य या सरकारला वाटत नाही काय ? न्यायालयीन चौकशी करण्यास राज्य सरकारला काय अडचण आहे ? या घटनेच्या संदर्भात लोकसभेमध्ये 18 तास चर्चा झाली आहे. या घटनेच्या बाबतीत हे सरकार न्यायालयीन चौकशी नेमणार नसेल तर सरकारच्या मनात कोणाला तरी वाचविण्याबद्दल काळबेरं असावे, असा आमचा आरोप आहे. याचा अर्थ सरकार कोणाला वाचवू पहात आहे. यवतमाळ प्रकरणाच्या चौकशीत सब इन्स्पेक्टरने साहेबांची चौकशी करावयाची अशा प्रकारची चौकशी या सरकारने लावली. जो साहेबाला रोज सलाम करतो, तो व्यक्ती साहेबांची चौकशी करु शकतो काय ? अशी परिस्थिती गृह खात्यात आहे. या घटनेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले आहे, अशा घटना पुढे घडतील काय याबाबतीत जनतेमध्ये मोठया प्रमाणात चर्चा सुरु आहे. या घटनेच्या बाबतीत सभागृहात एवढी प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतरही सरकार न्यायालयीन चौकशी करण्यास तयार होत नाही याचा अर्थ कोठे तरी पाणी मुरते आहे. यासंदर्भात सरकारची तोंड देण्याची मानसिकता नाही, असे यावरुन स्पष्टपणे दिसून येते. सरकारला कोणाला तरी वाचवावयाचे आहे. न्यायालयीन चौकशीत काही माहिती बाहेर आली तर आपले काय होईल, या

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

भीतीपोटी व भविष्यातील निवडणुका डोळयासमोर ठेवून जर कोणाला वाचविण्यासाठी न्यायालयीन चौकशी करणार नसाल तर ती गोष्ट निषेधार्ह आहे. या घटनेच्या बाबतीत न्यायालयीन चौकशी झालीच पाहिजे अशी आमची पुन:श्च मागणी आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आणि म्हणून न्यायालयीन चौकशी जाहीर झाली पाहिजे हा आमचा आग्रह आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी ज्या दोन अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली ती कारवाई ताबडतोब झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 18 डिसेंबर, 2008 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीमध्ये आजच्या कामकाज पत्रिकेतील पुरवणी मागण्यांवर चर्चा होईल व सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींच्या आसनासमोर घोषणा देत असतात)

( सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 35 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 18 डिसेंबर, 2008 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही